
बाबा
कदम

पाषाण

कादंबरी

बाबा कदम

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.®
२५१ क, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०

प्रकाशक
राजीव दत्तात्रय बर्वे
मॅनेजिंग डायरेक्टर,
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.,
२५१ क, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०.

© सौ. कुमुदिनी वीरसेन कदम
'आनंद', बालक मंदिराजवळ,
ताराबाई पार्क, कोल्हापूर.

नवीन आवृत्ती - १ डिसेंबर २००७

ebook : जुलै २०२०

प्रकाशन क्रमांक - १५४३

मुखपृष्ठ - अनिल उपळेकर

website : www.diliprajprakashan.in
email: info@diliprajprakashan.in

माझ्या ज्ञात
आणि अज्ञात
असंख्य वाचकांस!

- बाबा कदम

एक

ढालगावच्या नाक्यावरचं बापूरावांचं हॉटेल हे गावातलं एकमेव हॉटेल होतं. बापूरावांशी ईर्षा करण्याच्या इराद्यानं दत्तू कोळ्यानं आपल्या राहत्या घरासमोर देवदारी खोक्याचं पार्टिशन करून हॉटेल सुरू करण्याचं ठरवलं. पेठला जाऊन डझन-दोन डशन कप-बशा, ॲल्युमिनियमचे पेले, शेव-चिवड्याच्या बशा, चमचे, चहा तयार करण्यासाठी छोटासा बंब, शेगडी असं साहित्य आणलं आणि 'श्री दत्त भुवन' अशी पेठेतल्या ज्ञानू सुताराच्या पोराकडून पाटी रंगवून शेडच्या समोर उभी करून हॉटेलचा मुहूर्त केला. सत्यनारायण घातला. मनात कामना धरली- बापूरावांच्या हॉटेलला मार देण्याची!

पण चार महिन्यांतच दत्तोबा मेटाकुटीला आले. गावच्या लोकांना दत्तोबांनी हॉटेल सुरू करताच प्रेमाचा अचानक उमाळा फुटला. त्याला दत्त्या कोळी म्हणणारे भुजंगराव पाटील, "काय दत्तोपंत!" म्हणून सकाळ-संध्याकाळ श्री दत्त भुवनाच्या समोरच्या बाकड्यावर मुक्काम ठोकू लागले. भुजंगराव तिथं बसू लागले म्हटल्यावर गावची चांडाळचौकडी आपोआच तिथं जमू लागली. बापूराव चौगुल्याला शिव्या देत, त्याच्या हॉटेलातल्या चहाला "गुळवणी" ची उपमा देत, अर्धा-एक तास घालवला की दत्तोबाला आभाळाला डोकं टेकल्यासारखं व्हायचं. जमलेल्या मंडळींना चहा, भजी, चिवडा मुक्त हस्तानं वाटला जायचा. चहाचा छोटा बंब रिकामा व्हायचा. पण बिनडोक दत्तोबाला आपण धंद्याला नालायक आहोत, हे समजत नव्हतं. पुढं पुढं सारा धंदा आतबट्ट्यात येऊ लागला, तेव्हा मात्र दत्तोबा थोडा विचार करू लागला.

"च्या आयला, हे कंत्राट आतबट्ट्यात का चाललंय? सकाळपास्नं हॉटेलात गिराक म्हणावं तर दम खात नाही! मग गल्ला का जमत न्हाई?" आणि असा शांत चित्तानं विचार केल्यावर दत्तोबाला कळून चुकलं, की हॉटेलात येणारं चहा-भजी खाणारं प्रत्येक माणूस आपणाला पैसे देऊन जातंच असं नाही. कोणी दोन तासांचा वायदा सांगतं, तर कोणी दोन दिवसांचा. पण वायदा सांगणारं गिऱ्हाईक पुन्हा आठ-पंधरा दिवस आपल्याकडं फिरकत न्हाई!

"काय न्हाई; उद्यापास्नं उधारी बंद-" दत्तोबानं निर्णय घेतला आणि काय आश्चर्य! दत्तोबाचं हॉटेल ओस पडलं. भुजंगराव पाटलांची चांडाळचौकडी नेहमीप्रमाणे संध्याकाळी फळकुटावर ठाण मांडून बसली. भुजंगराव डोक्याचा पटका मांडीवर ठेवीत म्हणाले, "काय दत्तोबा, आज काय नाराज दिसतायसा?"

"काय करनार ओ? सगळा धंदा गाडवागतीनं झाला!" टाळूवरची टोपी मागं सारून डोकं खाजवीत दत्तू कोळी उद्गारला.

"आसं का म्हंता राव? आवो, धंदा म्हनलं का अशी लुकसानी हुनारच! जरा दम खावा आन् मग बगा की ह्या बाप्याला दिवाळं काढून गाव सोडायची पाळी येतीया का न्हाई?"

"त्येच्यावर येतीया का माज्यावर येतीया, कुनास ठावं!" कानातली बिडी ओठात धरून ती पेटवीत दत्तोबा उद्गारले.

"असा धीर सोडू नका दत्तोबा! तुम्ही काय करा, ठावं हाय का?" "काय?"

"हे च्या-पान्याचं हॉटेल बंद करून टाका!"

"आनि करू काय?"

"जेवणाची खानावळ काडा. शिवाजी म्हराटा खानावळ - झनझनीत रस्सा-भाकरी!

बगा तुमी... आओऽऽ-'' दत्तोबाच्या कानाजवळ तोंड नेत भुजंगराव म्हणाले. ''दारूबंदी झाल्यापास्नं, न खानारीबी चोरून प्याला शिकल्यात. खारकांडंबी दाबत्यात. पर कुटं? तकडं इसलामपुराकडं जाऊन! तुमी गावातल्या गावात मटनाची खानावळ करा सुरू. वर्साभरात हितं बंगला न्हाई उठला, तर बगा!''

''खरं म्हंतासा काय?''

''तर काय लबाड सांगतोय? आवो बाप्या काय च्या-भज्यावर गब्बर झालंय म्हंतासा?''

''मग?''

''बाप्याबी खारकांड तयार करतंय! चोरून पिनारी त्येच्या हाटेलातनं डब्बं भरून न्हेत्यात. वाटीभर रश्शाला दीड रुपाया लावतंय!''

''पर हाटेल आपनास्नी जमलं न्हाई, तर ते कसं जमनार हो ऽऽ?'' भोळसर दत्तू कोळी म्हणाला.

''हाटेलचं सोडा वो, ह्या च्या-भज्यात मिळणार हाय काय? एक जेवान गेलं का अडीच रुपये पाटशिरी काडतंय गिराक खिशातनं. पेठंच्या त्या लंगड्या मुजावरनं गेलं साली टरक कशावर घेतला?''

''कशावर?''

''हाटेलवरच की! मागच्या दाराला दारू इकायची आन् म्होरच्या दाराला जेवणाची खानावळ! पूना-बेंगलूर रोडवरचा एक तरी शिकडा ततं ''पिंटाक'' मारल्याबिगार म्होरं जातुया काय?''

''त्यंची जागा मोक्यावरची हाय पाटील!''

''आपून बी घिऊ या. मजावरला काय टिळा लावलाय काय? पर आगुदर हॉटेलाचं 'प्र्याक्टीस' हुयला नगं?''

''तेबी खरंच हाय म्हना!'' विचार करीत दत्तोबा म्हणाला.

आणि दत्तोबानी 'धी शिवाजी मराठा खाणावळ' ढालगावच्या नाक्यावर सुरू केली. पण याही वेळी तेच घडलं. त्यावेळी फुकट चहा-भजी खाऊन लोक गेले; यावेळी ते फुक्कट जेवून ढेकरा देत जाऊ लागले. दत्तोबाचं अवसान ढळलं. कुठल्याही प्रकारचं हॉटेल चालवायला अन् चार पैसे कमवायला आपण नालायक आहोत, ही दत्तोबाची खात्री होऊन चुकली आणि 'धी शिवाजी मराठा खानावळ' कायमची बंद पडली!

हा सारा प्रकार सूक्ष्म नजरेनं न्याहाळणारे बापू चौगुले मात्र गालातल्या गालात हसत होते. बापूंना ठाऊक होतं, या गावात आपल्याशी स्पर्धा करायला लावणारा असा एकही 'मायेचा पूत' अजून जन्मलेला नाही.

ढालगाव हे पूना-बेंगलोर रोडपासून पश्चिमेला सुमारे तीन मैलांवर वसलेलं होतं. ज्यावेळी गाव वसलं, तेव्हा गावाचं खास असं काही वैशिष्ट्य नव्हतं; पण पुढं पुढं गावाला महत्त्व येऊ लागलं, ते अनेक कारणांनी. गुरांचा बाजार मोठ्या प्रमाणावर भरू लागला. त्यातल्या त्यात शेळ्या-मेंढ्या, बोकडं यांचा साप्ताहिक शुक्रवारचा बाजार इतक्या मोठ्या प्रमाणावर भरू लागला की, कोल्हापूर, कऱ्हाड, सातारा, पुणे येथूनचे खाटीक माल खरेदीसाठी ढालगावाला दोन दोन दिवस येऊन मुक्काम ठोकून राहू लागले. गावाला पाझर तलावाची योजना मंजूर झाली. शेकडो मजूर रात्रं-दिवस प्रचंड बंधाऱ्याच्या कामाला लागले. ढालगावच्या पश्चिमेला डोंगरात उगम पावलेली सीना नदी आजपावेतो कधी आटलेली नव्हती; पण सीनेच्या पात्रात पावसाळ्यात येणारं पाणी फुकट वाहून जात होतं. तेव्हा बऱ्याच वर्षांपासून सीनेला

कुठंतरी अडवावं, धरण बांधावं ही योजना चर्चिली जात होती. शेवटी एकदा ती कार्यान्वित झाली. इंजिनियर आले, नकाशे तयार झाले. ट्रक-ट्रॅक्टरचे तांडे जमा झाले आणि सीनेला धरण बांधायच्या कामानं गती घेतली.

शेकडो लोक कामाच्या निमित्तानं ढालगावात येत होते आणि बापूराव चौगुलेच्या हॉटेलात पाय ठेवायला जागा मिळेनाशी झाली. गल्ला हजारानं जमा होत होता. बापू चौगुले बघता बघता एक बडी असामी झाली.

असं दैव एखाद्यावर भाळलं की अनेकजण त्याचा मत्सर अन् हेवा करू लागतात, याची जाणीव कदाचित बापूरावाला नसावी. गावात ठिकठिकाणी बापूरावांची कमाई हा चर्चेचा विषय होऊन गेला होता. अनेकांना हेवा वाटत होता, अनेकांना उगीचच मळमळ वाटायला लागली होती; तर अनेकांनी तोंड फाटेपर्यंत बापूरावांचं गुणगान करायला सुरुवात केली होती.

पण बापूराव चार गावाचं पाणी पिणारा नसला तरी चार गावच्या चार लोकांना पाणी पाजणारा खासच होता. सगळ्यांना पुरून उरणारा असा दमदार असामी होता तो. त्यानं पाह्यलं, जग बोलत आहे ते कोणत्या हेतूनं!

"किती झालं तरी बाप्या कप-बशाच धुणार!" ही टीका जेव्हा बापूरावांच्या कानावर आली, तेव्हा मात्र बापूरावाला काहीसं वाईट वाटलं. प्रतिष्ठा केवळ पैशानं मिळत नाही हे बापूरावनं ओळखलं आणि त्यानं ठरवलं, ढालगावच्या परिसरात आठ-दहा एकर जमीन खरेदी करायची, शेतात विहीर बांधायची, राहायला एक छोटेखानी बंगला, जीप! आणि मग बघू टीका करणाऱ्यांची काय हिंमत होते ती!

बापूराव रान खरेदी करणार आहे ही वार्ता ढालगावच्या परिसरात वाऱ्यासारखी पसरली. बापूरावांची जमीन पाहण्याची मोहीम सुरू झाली.

0-0-0

दोन

ढालगावात आपल्या अद्ययावत बांधलेल्या बंगल्यात बापूराव आरामखुर्चीत विचार करीत होते, ''दगडूतात्यांनी मला त्या दिवशी हॉटेलातून हाकलून दिलं असतं तर आज हे दिवस मला दिसले असते का? तात्यांनी माझ्यावर केवढे प्रचंड उपकार करून ठेवलेत?''

बारा वर्षांपूर्वीचा तो उन्हाळा! ऊन रणरणत होतं. पाणी कधीही न आटणारी सीना नदीदेखील रोडावली होती. सगळं वर्ष कसं निभावून जायचं ही चिंता आख्ख्या महाराष्ट्राला भेडसावत होती. ढालगावच्या नाक्यावर तुराटीच्या कुडाचं आणि पन्हाळी पत्र्यांचं छप्पर घालून ''बजरंगबली हॉटेल'' अशी वाकड्या-तिकड्या अक्षरात पाटी रंगवून बसलेले दगडूतात्या चिंताग्रस्त झाले होते. पाणीच नाही म्हटल्यावर लोकांच्या तोंडचं पाणी पळायला कितीसा वेळ लागणार? सारं काही ख्यालीखुशालीत असलं तरच माणसाला जराशी चैन करायची लहर येते; पण या दगडूतात्यानं हॉटेल सुरू करायला आणि अवर्षणाचा फेरा यायला एकच गाठ पडली.

दगडूतात्या हताश झाले ते गिऱ्हाईक जादा येत नाही म्हणून नव्हे; तर हॉटेलात काम करायला एकही पोऱ्या मिळत नाही म्हणून! कायतर दगडूतात्याच्या हॉटेलात काम करणं म्हणजे सीनेला अर्ध्या मैलावर जायचं, वाळूत झरा काढायचा आणि नारळाच्या करवंटीनं घागरीत पाणी भरून घ्यायचं. एक घागर भरायला कमीत कमी अर्धा तास! खाली तापलेल्या वाळूत पायात घालायला वहाणा असल्या तर ठीक; नाहीतर तव्यात पाय ठेवल्यासारखी धग सहन करीत, वरून उन्हाची पेटलेली किरणं अंगावर घेत, तासन् तास हे घागरी भरण्याचं आणि वाहण्याचं काम करायला पोरं मिळत नव्हती! आणि पाण्याचं असं दुर्भिक्ष झालं तर हॉटेल चालायचं तरी कसं?

दगडूतात्या असे चिंताग्रस्त होऊन बसले होते. हॉटेलात शुकशुकाट होता, तोच दारात एक चौदा-पंधरा वर्षांचं तरतरीत पोर येऊन उभं राह्यलं.

''काय पाह्यजे रे तुला?'' तात्यांनी विचारलं.

''नोकरी!'' कपाळावरचा घाम तर्जनीनं निपटून काढीत ते म्हणालं.

''नोकरी? मला हितं दिवाळं काडायची पाळी आलीय आन् तुला कसली रं नोकरी दिऊ?''

''कशाची बी द्या. पानी आनायचं दिकून काम करतो!'' एका दमात ते म्हणालं.

"पानी आनतोस? मग आन तर!" दगडूतात्या बोलून गेले. "रोजचं चार आने दीन बग!"

"काय दिशील ते द्या. पोटाला निस्तं घातलंसा तरी चालंल मला!" असहायपणे पोर म्हणालं.

"नाव काय रं तुजं?"

"बाप्या म्हनत्यात मला!"

"गाव कंचा?"

"येलूराचा हाय मी, चाऊलग्याचा!"

"चाऊलगा? कंचा रं, दत्त्या चाऊलगा का सिद्या चाऊलगा!"

"रामू म्हंत्यात बगा आज्ज्याला माज्या!"

"हां ऽ ऽ ऽ! रामू चऊलग्याचा नातू म्हन तू! तुजा बा म्हमयला गिरनीत हुता, आगीनगाडीत घावून मेला त्यो!"

"व्हय! आनी तवापासनं आसं पोटावारी हिंडतोय मी. गेलं साली आई बी गुजरली."

"एकलाच हैस म्हन!"

"व्हय. पाटची भैन झाली हुती खरं; पण जलमली आनी लगोलग मेली!"

"म्हंजे काळतोंड्या हैस म्हन! बा गेला, आई हरवलीस, भन दिकून जगली न्हाई. बाप्या, मलाबी लौकर शेनी-लाकडं गोळा करायला लावतोस वाटतं?"

"न्हाई-न्हाई तात्या! तुमचं नाव आयकून लई आशानं आलोय हितपातोर!"

"बरं बरं, घे ती घागर आन् जा पान्याला!"

असा बापू प्रथम ढालगावला आला. ज्याचा पायगुण अवलक्षणी असं दगडूतात्यांना वाटलं, तो बापू एका आठवड्यातच शुभशकुनी असं तात्यांना वाटू लागलं. सारी धरणी उष्णातेनं तडकली होती, झाडांची पानं गळून पडली होती, अंगाची लाही उडत होती; आणि अशातच तुफान सोसाट्याचा वारा सुटला. कोणा तरी दिव्य शक्तीला पृथ्वीवरच्या हतबल जीवाणूंची दया आली होती. त्यांच्या दु:खावर जणू तो फुंकर घालू पाहत होता. प्रथम जोराचा वारा, वाऱ्यांनी आणली मेघमालिका आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली. चारी दिशांनी पावसाच्या सरी कोसळू लागल्या. ढालगावचं नव्यानं बांधलेलं धरण सीनेला अडवायला असमर्थ ठरेल असं वाटू लागलं; पण सुदैवानं तसं काही घडलं नाही. अहोरात्र असा आठ दिवस पाऊस कोसळला धो ऽ धो ऽ धो!

सारी धरणी तृप्त झाली. तिची तृप्तता, सर्वांगावर फुललेले रोमांच हिरव्या तृणांकुरानी साकार झाले. ढालगावचा परिसर मोहरला, बहरला. गाव सोडून जाणारे ग्रामस्थ परतले. सारं काही आबादीआबाद झालं.

बापूला फार काळ चटके खावे लागले नाहीत आणि दगडूतात्यांच्या अंधश्रद्धावादी मनाला वाटत होतं, पोर अवलक्षणी नसून पोरं आहे सुलक्षणी! बाप्या आला आणि येताना पाऊस घेऊन आला. पण पाऊस काही केवळ ढालगावच्या परिसरातच झालेला नव्हता, सर्वत्र झाला होता; पण तात्यांनी मात्र पावसाची आणि बापूच्या आगमनाची सांगडच घालून टाकली. त्याचा परिणाम झाला असा की बापूकडं बघण्याची त्यांची दृष्टी आमूलाग्र बदलली.

हॉटेलला भरभराटी आली. बापू हळूहळू गल्ल्यावर बसत होता. दगडूतात्यांना बापूचा फार मोठा आधार वाटू लागला. अन् तोही त्यांच्याशी तितक्याच आदराने वागू लागला.

तलावामुळं गावचं रूपच पालटलं. पावसावर अवलंबून राहावं लागणाऱ्या जमिनीला तलावाचं पाणी सात-आठ महिने मिळू लागलं. ढालगावची उजाड, ओसाड रानं बाराही महिने

नयनरम्य दिसणार होती.

बापू आता केवळ हॉटेलातला पोऱ्या राह्यला नव्हता; तो दगडूतात्यांच्या घरातलाच एक घटक झाला होता. दगडूतात्यांनी खूप खूप स्वप्न रंगवली. बापूला मोठं करायचं, सुंदरशी बायको करून द्यायची आणि आपण दोघं नवरा-बायकोंनी हिंदुस्थानातली असतील-नसतील तेवढी सर्व देवळं पालथी घालायची! पण नेमकं नको त्या वेळी घडतं त्याचं नाव दुर्दैव! तेच आड आलं. हॉटेलात खुर्चीवर बराच वेळी बसलं तर पायात मुंग्या येत; पण त्या तात्पुरत्या. उठून एक चार पावलं चाललं की सारं ठाकठीक. पण त्या दिवशी दगडूतात्यांना आपल्या पायात कसल्यातरी विलक्षण मुंग्या येताहेत असं वाटू लागलं. तरीही ते खुर्चीवरून उठले. पण यावेळी उभं राहण्याऐवजी ते धाडकन् जमिनीवर कोसळले. त्यांच्या डाव्या पायातली सर्व संवेदनाच नष्ट झाली होती. अर्धांगाचा झटका केव्हा नि कसा येऊन त्यांच्या पायाला निर्जीव करून गेला हे त्याचं त्यांनादेखील समजलं नव्हतं.

बापू आधारासाठी धावला. त्यानं त्यांच्या खांद्यात हात घालून उभं करीत म्हटलं, "तात्या, असं का?"

"पायातला जीव गेला पोरा ऽ ऽ! अं ऽ ऽ चल, घराकडे न्हे मला-"

तात्यांना बैलगाडीतून गावात आणलं. हौसाकाकूनं हंबरडा फोडला. आयाबाया जमा झाल्या. कुणाकुणाला वाटलं; तात्या संपलेच वाटतं! आणि तसं पाहिलं तर खरोखरच संपले होते.

मोठ्या धडाडीने गावात हॉटेल सुरू करण्याचं धाडस करणारे तात्या फक्त त्याबाबतीतच धाडशी होते अशातला भाग नव्हता. गावात दांडपट्टा फिरविण्यात त्यांचा हात कोणी धरू शकत नव्हता. ते लहान असताना गावात रामोश्यांचा दरोडा पडला होता. दगडांचा वर्षात करीत तोंडानं बोंब ठोकीत पाचपन्नास रामोशी ढालगाववर चालून आले. मध्यरात्रीचा समय. त्यांची ती किंचाळल्यासारखी ओरड ऐकून बाया-पोरांची काळजं हलली. मोठी पुरुष-माणसंदेखील जीवाच्या भीतीनं पुढं जायला धजली नाहीत. आणि अशात दगडू उठला. परड्याच्या दारानं गावाच्या वेशीकडं येऊन हातातला दांडपट्टा घेऊन अंधारात लपून राहिला. गावातली दोन गब्बर घरं फोडून रामोशी आरडाओरडा करीत परत निघाले आणि अशात हातातला दांडपट्टा फिरवीत दगडू त्यांच्या कळपात घुसला, ते विजेच्या चपळाईनं. काय होतंय हे कळायच्या आतच दहा-पाच रामोशी रक्तबंबाळ झाले. कुणाचा डोळा फुटला, तर कुणाचा कान गेला; तर कुणाच्या पाठीतून रक्ताची धार उडाली. एक जण तर जागच्या जागीच कोसळला होता. हातातला ऐवज टाकून कापलेल्या जखमांचं रक्त थोपवत, रामोश्यांना पळता भुई थोडी झाली.

दुसऱ्या दिवशी पोलीस आले, डी.एस्.पी. आले. मरून पडलेल्या रामोश्यांच्या प्रेताचा पंचनामा झाला. ते प्रेत कुठल्या रामोशाचं हे तात्काळ ओळखता आलं. त्यावरून त्याच्या रामोशीवाड्यावर धाड घातली, तेव्हा त्यातले कित्येकजण फरारी झाल्याचे दिसून आले. हो, नाहीतर अंगावरच्या जखमांनी ते तात्काळ ओळखता आले असते. तरीही फार काळ ते लपून राहू शकले नाहीत. शिराळ्यांच्या डोंगरघळीतून त्यांना जेरबंद करून आणण्यात आलं.

तो खटला फार फार गाजला. सरकारनं दगडूतात्याला पाच हजार रुपये दिले, इनाम म्हणून! दगडूतात्यांनी अशी धाडसाची छोटी-मोठी अनेक कामे केली; शेवटी आधार असावा म्हणून सीनेच्या काठी त्या पैशात चार एकर जमीन घेतली. पण दुर्दैव! सरकारने सीनेवरच बांध घालून तलावाची योजना आखली. दगडूतात्यांनी पाच हजार रुपये मोजून घेतलेली जमीन पाणबुडीत जमा झाली. गावाला मामलेदार येऊन ज्यांच्या ज्यांच्या जमिनी पाण्याखाली

बुडाल्या आहेत, त्यांना नुकसान-भरपाई मिळेत असा दिलासा देऊन गेले. पण योजना पूर्ण झाली तरी नुकसान-भरपाईची रक्कम हाती पडेना, तेव्हा लोकांनी मामलेदार कचेरीवर मोर्चा नेला. पण दगडूतात्या मोर्चात सामील झाला नाही. तो म्हणाला होता, "पिढ्यान् पिढ्या गावात दुष्काळ पडायचा-पाण्याचा थेंब घावायचा न्हाई. सीनाबाई सदान्कदा फसवायची. आता तिला बांदून घाटली. माजं एकल्याचं रान गेलं खरं; पण कैकजनांची रानं भिजतील ह्ये काय कमी हाय व्हय?"

पण लोकांना दगडूतात्यांचं हे तत्त्वज्ञान पचण्यासारखं नव्हतं. ते ओरडतच राह्यले. कोणी धरणाला सुरुंग लावून धरण उडवून देण्याची भाषा करू लागले; पण दगडूतात्यांनी त्यांना सांगितलं, ते थोड्या परखड भाषेत. तो म्हणाला, "रांडंच्यांनो, डोस्की बिगाडल्यात की काय तुमची?"

"आमची रानं आमास्नी पायजेत!"

"आरं येड्यानू, गावाला हे सीनामाईचं पानी लाभलं. तुमची पोरं-बाळं सुका-समाधानात ऱ्हातील."

"पर आमचं पैशे तरी दिवू द्यात की!"

"देतील-देतील. जरा सबुरीनं घ्या ऽ...!"

"तुला ना पोर ना बाळ! तू सांगणारच की असं!" एकजण मोठ्या संतापानं उद्गारला.

पण शेवटी शासनाची लाल फीत एकदाची ढिली झाली. नुकसानभरपाईची रक्कम मामलेदार कचेरीत आल्याची वार्ता आली. ढालगावच्या ज्या ज्या रयताच्या जमिनी तलाव योजनेत बुडाल्या होत्या, ते सर्वजण मोठ्या आशेनं तालुक्याला धावले. त्यांची घोर निराशा झाली. रक्कम मिळाली; पण किती? जमिनीच्या किमतीच्या चार आणेदेखील नाही. खुद्द दगडूतात्याला आठशे रुपये मिळाले. त्याच जमिनीसाठी त्यानं पाच हजार रुपये मोजले होते!

आलेले पैसे त्यानं शेवटी हॉटेलात गुंतवले. थोडे दिवस हॉटेल चाललं बरं; पुढं ते अवर्षणाचं वर्ष आलं नि सारा व्याप गळ्यात यायची वेळ आली. पण बापू आला नि दगडूतात्याला एक नवीनच चैतन्य मिळालं. पुत्रप्राप्तीसाठी इतके दिवस झुरणाऱ्या हौसाकाकूला देवानं एकदम लहानाचा मोठा करून पुत्र धाडला असं देखील वाटलं. पण दगडूतात्यांना अर्धांगाचा झटका आल्यानं बापूवर अचानक मोठीच जबाबदारी येऊन पडली. हॉटेल सांभाळायचं, तात्याला औषधपाणी बघायचं आणि दिवस-रात्र डोळ्यांतून टिपं गाळणाऱ्या हौसाकाकूला दिलासा द्यायचा!

तात्याच्या औषधासाठी कुणी सांगितलं, रानटी कबुतराचं रक्त लावावं व त्याच पक्ष्याच्या मांसाचं सूप काढून प्यायला द्यावं; अर्धांग हटतो. बापूनं फासेपारधी बोलावून शे-दीडशे कबूतरांना कापलं; पण तात्यांचा अर्धांगवायू त्यांच्या शरीराची अधिकाधिक गात्रं दुर्बल करू लागला होता. तोंडदेखील वाकडं होणार अशी चिन्हं दिसू लागली, तेव्हा तात्यांनी बापूला आपल्याजवळ बोलावून म्हटलं, "बापू... पोरा, आता माझा काय भरवसा नाही!"

"आसं का म्हणता तात्या?"

"खरंच बापू, आता मला जगवायची धडपड नगं करू!"

"तात्या, तुम्ही यातनंसुद्धा बरे व्हाल!"

"येडा हैस. मी चाललो आता. आता तुज्या काकूला मातोर यवस्थित संभाळ!"

दाराआडून त्या दोघांचं संभाषण ऐकणाऱ्या हौसाकाकूंना हुंदका आवरता आला नाही.

पुढं जेमतेम चार दिवस उलटले असतील, दगडूतात्या झोपेतच मरण पावले होते. बापूनं मात्र दिलेलं वचन तंतोतंत पालन केलं. अखेरपर्यंत त्यानं हौसाकाकूंना जपलं, अगदी

आई मानली.

बजरंगबली हॉटेलचा मालक बापू झाला. काळ झपाट्यानं पुढं झेपावत होता. ढालगावला तलाव झाल्यापासून गावाचं अंतरंग बदलत होतं. गावात पाण्याखाली येणाऱ्या जमिनीत असंख्य प्रकारची बागायत होत होती. टोमॅटो, कोबी, फ्लॉवर अशा भाज्यांसोबत अनेक प्रकारच्या पालेभाज्या ढालगावहून ट्रकनं मोठमोठ्या शहरांना रवाना होत होत्या. ट्रक्स येणार म्हटल्यावर रस्ते झाले. रस्ते झाले म्हटल्यावर एस्. टी. आली आणि एस्. टी येणार म्हटल्यावर स्टँडही आलं... आणि ते कुठं? तर बजरंगबली हॉटेल समोरच्या वेगळ्या माळ्यावर! तीन रस्त्यानं आलेला प्रवासी अगोदर यायचा तो या हॉटेलसमोर. गाडीला वेळ असला, तर तिथं चहा-भज्यांची ऑर्डर द्यायचा. दुपारची वेळ असली आणि गाडीला तासभर अवकाश असला तर जेवणाची ऑर्डर सोडायचा!

बापू चौगुले ही ढालगावच्या आबालवृद्धांना परिचित अशी व्यक्ती झाली. इतक्या तरुण वयात अशी धडाडी दर्शवणाऱ्या बापूला आपली मुलगी द्यावी या हेतूनं अनेकजण ढालगावच्या वाऱ्या करू लागले. इतके वधूपिते ढालगावला आले; पण बापूच्या नशिबात होती ती लक्ष्मी - रेठऱ्याच्या इनामदारांची लेक. या इनामदारांनी आपली मुलगी बापूला देण्यापूर्वी एक अट घातली, ''बापू, तुला चार एकर जमीन पाहिजे. दोन एकर झाली तर तो जमीनदार होतो; पण लाखो रुपये कमावणारा हॉटेलवाला मात्र कप-बश्या धुणाराच राहतो.''

बापूला हा सल्ला पटला असावा. त्यानं जमीनखरेदीसाठी मोहीम सुरू केली. बापूला हवी होती ती ढालगावच्या कॅनॉल स्कीमखाली आलेली जमीन; पण आता अशी आठ-नऊ महिने सतत पाणी मिळणारी जमीन. ढालगावची रयत त्या जमिनीला काळजाचा तुकडा मानत होती. बापूला मनासारखी जमीन मिळेना. पण शेवटी कोरडी जमीन घ्यायची अन् त्यात विहीर काढायची या हेतूनं बापूनं आठ एकर जमिनीचे खरेदीपत्र करून टाकले. इनामदारांची लेक बापू चौगुल्याची पत्नी झाली.

बापूंना इतक्या वर्षांनी आज हा सारा गतकाल आठवत राहिला.

0-0-0

तीन

हळूहळू बापूंनी ढालगावात आपला एक छोटासा बंगला बांधला. साताऱ्याच्या आर्किटेक्टकडून प्लॅन तयार करून आणला. पाचपन्नास हजार रुपये खर्ची पडले. बापूंचा बंगला झाला तो नजर लागण्यासारखा. घराचं वास्तूक झालं तेव्हा सारा ढालगाव जिलेबी आणि मसालेभाताच्या ढेकरा देत घरी परतला.

लक्ष्मीला दिवस गेले. इमानदारांनी प्रचंड डोहाळे-जेवण घातलं. आजकाल ढालगावचा विषय निघाला, तर शेवटी चर्चा बापूच्या ऐश्वर्यावर येऊन ठेपायची. देवानं दिलं तर अगदी छप्पर फाडून-फाडूनसुद्धा देतो, याचं प्रत्यंतर येत होतं.

सडपातळ दिसणारे बापू आता किंचित स्थूल दिसू लागले. चेहऱ्यावर समाधानाची छटा स्पष्ट उमटली होती. आता बापूंना "हॉटेलवाला" म्हणायचं कुणाचं धाडस उरलं नव्हतं. इतकं सर्व झालं तरी बापूंना मनातून एक रुखरुख लागून राह्यली होती. खरेदी केलेल्या आठ एकर जमिनीत पाणी नव्हतं. बरं, कॅनॉलचं पाणी घ्यावं म्हटलं, तर तेही शक्य नव्हतं. कारण जमीन कॅनॉलपासून दूर अंतरावर होती. तेव्हा जमिनीत विहीर काढणं हाच एकमेव उपाय शिल्लक होता. मग जमिनीतलं पाणी शोधणारे पाणके शोधायला सुरुवात झाली.

बारामती भागातला प्रसिद्ध पाणक्या लखू ढालगावला आला. दोन दिवस बापूरावाकडं राह्यला. तिसऱ्या दिवशी बापूरावसमवेत जमिनीकडं आला. सारी जमीन त्यानं फिरून पाहिली. ठिकठिकाणी दगडगोटे रोवून त्याला कान लावला, टिचक्या मारल्या, माती चाखून बघितली आणि मान नकारदर्शी हलवून म्हणाला, "बापूसाहेब, सांगितलं तर राग मानू नका!"

"म्हणजे?"

"जमिनीखाली पाण्याचा थेंब नाही!"

"काय सांगता?"

"हो ऽ ऽ ऽ! आज चाळीस साल धंदा करतो आहे. साठीच्या वर उमर आली. आपला अंदाज चुकणार नाही!"

"पण लखूमामा, या जमिनीत पाणी आहे असं बरेचजण म्हणतात!"

"मला वाटत नाही. हो ऽ ऽ ऽ! उगाच तुम्हाला पाणी आहे म्हणून सांगायचं आणि तुम्ही विहिरीसाठी दहा-पाच हजार खर्च करायचे आणि शेवटी निराश व्हायचं! असला आपला धंदा नाही! या जमिनीखाली ठणठणीत पाषाण आहे पाषाण!"

"तिकडं पलीकडच्या सातवाच्या मळ्यात विहिरीला बारमाही पाणी असतं. इकडं

मांगलेकरांच्या शेतातही पाणी भरपूर आहे. पलीकडे सातवांच्या जमिनीतली विहीर उन्हाळ्यातदेखील आटत नाही आणि इकडं जगदाळेनानांच्या मळ्यातल्या विहिरीचं पाणी शेजारच्या शेतकऱ्यांनासुद्धा देतात.''

पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर सर्व बाजूंच्या मळ्यातल्या विहिरींची माहिती पुरवून बापू पुढे म्हणाले, ''लखोबा, तुम्ही मागाल तितका पैसा देण्यास मी तयार आहे; पण माझ्या शेतात काही झाले तरी विहीर ही झालीच पाहिजे!''

हसून लखोबा म्हणाले, ''पैसा द्याल हो तुम्ही; पण खाली कोरडा ठणठणीत पाषाण आहे त्याला काय करायचं, सांगा ना?''

''तुम्ही आणखी एकदा तपासून बघा. ओझरती शंका जरी आली पाण्याची तरी सांगा. मी उकरायला सुरुवात करतो उद्यापासून!''

''आता कसं समजून सांगावं तुम्हाला, समजत नाही मला! बापूसाहेब, हा पाण्याचा नाद सोडा. हवं तर शेजारच्या सातवांच्यातून पाणी घ्या!''

''सातवांच्यातून? शक्य नाही. माझ्या शेताला माझ्याच विहिरीचं पाणी हवंय!''

''ते या जन्मी तरी शक्य होईलसं वाटत नाही मला. उगाच पाण्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करून बसाल बापूसाहेब!''

''लखोबा, मी मोठा ईर्षेबाज माणूस आहे. आजपर्यंत जे जे म्हणून मी मनात आणलं, ते घडल्याशिवाय राहिलं नाही आणि आता या जमिनीत विहीर काढून बागाईत केल्याशिवायही राहणार नाही. प्रतिज्ञा आहे माझी; पाषाणासही पाझर फोडेन!''

''माणसानं अशी ईर्षा जरूर बाळगावी; पण निसर्गाविरुद्ध ईर्षा बाळगणाऱ्याला शेवटी पश्चात्तापाची पाळी येते. बरं, येतो मी. इथून आणखी दोन-तीन गावांना जायचं आहे!''

लखोबा जमिनीत विहीर काढण्याचा प्रयत्न करू नका असं स्पष्ट सांगून निघून गेले; पण बापूंना चैन पडेना. अन्नावरची वासना उडाली. धड झोपदेखील लागेना. तशात लखोबाचे शब्द आठवत होते, ''हवं तर शेजारच्या सातवाकडून पाणी घ्या; पण तुमच्या जमिनीत मात्र शेवटपर्यंत कोरडा ठणठणीत पाषाण आहे. पाण्याचा थेंबदेखील नाही!''

''हे शक्य नाही! तो थेरडा काय सांगतो? तो काय ब्रह्मदेव आहे काय? चोही बाजूला भरपूर पाणी असणाऱ्या विहिरी ढळढळीत दिसताहेत आणि बुढ्ढा म्हणतो, इथे पाण्याचा थेंबही मिळणार नाही. काही नाही. उद्या दुसरा पाणक्या बोलवायचा. हिंदुस्थानात असतील, नसतील तेव्हढे पाणके बोलवायचे. नेमकं कुठं पाणी आहे एवढं कळलं की पुरे! लगेच उकरायला सुरुवात करायची! तो लखोबा काय जमिनीत शिरला होता थोडाच! काही झालं तरी शेवटी माणूसच आहे आणि माणूस म्हटलं की मर्यादा आलीच! काही झालं तरी या जमिनीत विहीर होणारच. विहिरीवर बागाईत होणार! मग एक गुंठाभर जमीन भिजली तरी चालेल!''

बापूंनी केलेली प्रतिज्ञा एव्हाना साऱ्या ढालगावाला ठाऊक झाली होती. बापूंचं आजपर्यंत कसं सुरळीत चालल्याचं पाहून अनेकांना आतून मत्सराची गांधीलमाशी एकसारखी डसत होती. त्यांना तेवढंच कारण पुरेसं होतं. मग चर्चा सुरू झाली.

''काय चौगल्यानं वसाड माळ घेटलाय?''

''त्यात काय म्हनं हीर काडनार हाय!''

''हीर काडंल मस; पर पनी नगं का? का उगीच डबरा काडून ठेवायचा हाय?''

''काडू दे की! वडारास्नी रोजगार तरी मिळंल!''

''व्हय! कुनाचं हाटेल, मालक कोन झाला? उगी नशिबानं हात दिला म्हणून चार पैसं खुळखुळत्यात. घालू दे की हिरीपाटनं पैसं!''

पण बापूंना ही मंडळी असं बोलताहेत हे समजल्यावर अधिक चेव आला, "रानात हीर काढून दाखवीन तर चौगल्याच्या पोटचा म्हणून सांगीन!"

झालं! मग काय, रोज एक पाणक्या येत होता. बापूच्यात राहून-जेवून-खाऊन, "हितं काडा-तिथं काडा" म्हणून काहीतरी लावलिजाव करून जात होता. पण बापूही काही कमी वस्ताद नव्हते. त्यांनी पाच-सहा पाणक्यांना वेगवेगळ्या जमिनी दाखवल्या. त्यातल्या बहुसंख्य लोकांनी जी जागा दर्शविली, त्या जागी खुदाईला सुरुवात झाली. भूमिपूजन झालं, नि पहिली कुदळ पडली. शंभर-दीडशे वडार कामाला लागले.

बघता बघता मातीचा प्रचंड ढिगारा दिसू लागला. प्रथम काळवट रान संपलं. मग आलं मुरमाचं ठिसूळ रानं. तेही संपलं आणि खाली काळाकभिन्न फत्तर दिसू लागला. वडारांच्या अणकुचीदार पहारी सुरुंगासाठी त्या फत्तरास घर करू लागल्या. सुरुंग उडू लागले. प्रत्येक सुरुंगानंतर बापू धावत येऊन कुठं पाण्याची धार दिसते का ते डोकावून येऊन पाहत होते. उडालेल्या सुरुंगाच्या दारूचा कुबट दर्प नाकात शिरत होता, धुरानं डोळे चुरचुरत होते; तरीही बापू काठावर उभा राहून, डोकावून पाहात आणि आत उतरणाऱ्या वडारांना मोठ्यानं ओरडून सांगत- "अरे ऽऽऽ भिम्या, कुठं जिव्हाळा दिसतोय का बग रे!"

पण प्रत्येक वेळी त्यांची घोर निराशाच होत होती. जितकं फोडेल, तितका कोरडा ठणठणीत खडकच दिसत होता. ओलसरपणाचा लवलेशदेखील नव्हता. पण बापू ईर्षेला पेटले होते. जमीन पाताळापर्यंत फोडावी लागली तरी हरकत नाही; पण विहिरीला पाणी लागलंच पाह्यजे!"

बघता बघता दीड-दोनशे फूट खोली झाली; पण कुठं जमिनीला पाझर फुटण्याची लक्षणं दिसेनात. याच बरोबर गावात बापूच्या या योजनेचं हसं होत होतं. टवाळखोरांना एक चांगलाच खुसखुशीत विषय मिळाला होता. आता विहिरीसाठी म्हणून खोदलेल्या खड्डयाकडं पाह्यलं की डोळे गरगर फिरत होते. वडार काम करायला तयार होईनात. खोदलेले देगडाचे ओझे वर ओढून घेण्यासाठी काठावर सिमेन्टचा बावकडा बनवला होता. रहाटाचं चाक बसवलं होतं. दोर बांधला होता घमेल्यांना; पण चार-दोन वेळा दगडांच्या ओझ्यानी दोर तुटले. एक-दोन वडारी जखमी झाले. शेवटी वडाऱ्यांनी खोदण्यास व काम करण्यास स्पष्ट नकार दिला.

पाताळापर्यंत उकरत जाण्याची प्रतिज्ञा बापूंना अर्ध्यातच सोडून द्यावी लागली. लक्ष्मीवैनी बाळंतपणासाठी माहेरी चालल्या. त्या बापूंच्या जवळ येऊन म्हणाल्या, "पाणी लागणार नसेल तर उगाच कशाला त्रास करून घेता?"

"मी मनाशी ठरवून टाकलेलं आहे!"

"आपल्या नशिबी नसेल तर कसं लागेल पाणी?"

"दुबळी माणसं नशिबावर अवलंबून राहतात!"

"ते खरं हो, पण आताशी तुम्ही सरळ जेवत नाही, झोपदेखील लागत नाही. अशानं प्रकृतीवर परिमाण होईल आपल्या!"

"काही झालं तरी हरकत नाही. शेतात विहीर निघालीच पाह्यजे आणि तिला पाणी लागलंच पाह्यजे!"

त्यावर लक्ष्मी अधिक काही बोलली नाही. खाली मान घालून उभी होती. बापूंनी निसर्गाविरुद्ध मांडलेली ही स्पर्धा त्यांना पसंत नव्हती. पण त्या पडल्या बाईमाणूस! बापूरावसारख्या इर्षेबाज माणसाला त्या मन:स्तापकारक निर्णयापासून परावृत्त करायला असमर्थ ठरल्या.

त्या गेल्यानंतर बापूंनी हॉटेलात गल्ल्यावर बसण्यासाठी नवीन नोकर नेमला आणि

आपण शेतावरच मुक्काम टाकला. इतके दिवस खोदलेला खड्डा बुजवून टाकला आणि दुसऱ्या एका पाणक्यानं दाखवलेली जागा खोदण्याला प्रारंभ झाला.

पण याही वेळेस प्रथमसारखाच प्रकार! खूप खोल खोदलं; पण पाण्याचा मागमूस दिसेना. असं लागोपाठ चार वेळा शेताच्या चारही दिशेला झालं आणि शेवटी बापूंना चालवलेला हा अट्टाहास थांबवावा असं वाटू लागलं.

पण त्याही निर्णयाला मन सहजासहजी राजी होईना. आपली आजवरची सारी प्रतिष्ठा धुळीला मिळाली असं त्यांना वाटू लागलं.

त्या रात्री बापू कमालीचे अस्वस्थ झाले. घरात लक्ष्मी नव्हती. घर सुनं सुनं होतं आणि तशात बापूंना भेटायला एक ग्रामस्थ आला.

"रामराम बापूसाब!"

"रामराम, याऽऽ"

"घर बांधायला काडलं हुतं!"

"कोणी?"

"मीच की ऽऽ!"

"बरं मग?"

"जरा, फाडी, दगडं कमी पडल्यात. कोन म्हनलं, तुमी खान सुरू केलीया. दगडं इकतायसा म्हनून इचारायला आलो. एक चार गाडी फाडी घावंल का?"

"कोन रांडंचा म्हणतो मी खान सुरू केलीय म्हणून?" बापू संतापून म्हणाले.

"आता त्यो काय एकटा-दुकटा हाय व्हय? सारं गाव म्हनाया लागलंय!"

"म्हणातयं? जा, माझ्याजवळ फाडी नाहीत!"

"राग मानू नगासा बरं का बापूसाब. व्हय! आता उकरून वर काढल्याला दगूड ठिवून तुमी तरी काय करणार हैसा? रानाला पानीच न्हाई ह्यात तुमची काय चुकी हाय? जातो मी."

तो येऊन गेल्यानंतर बापूंना मस्तकावर कोणीतरी घणाचे घाव घालतो आहे असं वाटू लागलं. गावात आपलं हसं झालं, अब्रू गेली, निष्कारण ईर्षेला पेटून वीस-पंचवीस हजारांचं नुकसान करून घेतलं याची जाणीव झाली. आता यातून मार्ग कोणता?

पण बापूंना ही आपण गमावलेली प्रतिष्ठा परत मिळण्याचा मार्ग शोधायला कुठं जावं लागलं नाही. तो आपोआपच त्यांच्यासमोर येऊन उभा ठाकला.गावचे दहा-पंधरा पुढारी दुसऱ्या दिवशी बापूंना भेटायला आले. त्यात साठी ओलांडणारेदेखील दोघे-तिघे होते.

"बापूसाब, आमी एका कामापायानं आलतो!"

बापूंना वाटलं काय, एकजण खाणीचे दगड द्या म्हणून गेला. या सर्वांची तीच तर मागणी नसावी? पण प्रकार तसा नव्हता.

गावचे पुढारी श्यामराव पाटील किंचित खाकरून म्हणाले, बापूसाहेब, आम्ही आलो ते एक विनंती करायला-"

"बोला...!"

"तुमच्यासारखा जिद्दीचा माणूस हताश झालाय हे समजतं आम्हाला. पण तुम्ही हताश होऊ नका. दैवात नाही म्हणून पाणी लागलं नाही. म्हणून तो विषय आता डोक्यातून एकदम काढून टाका. आणि...!"

"आणि काय करू म्हणता?"

"यंदा गावची निवडणूक आहे पंचायतीची. ती लढवायची. तुम्हाला सरपंच करायची इच्छा आहे आम्हा सर्वांची!" श्यामराव सोबत आलेल्या सर्वांकडं पाहत म्हणाले. त्या सर्वांनी

होकारदर्शक माना डोलावल्या.तेव्हा बापूसाहेब किंचित स्मित करून म्हणाले, ''मला कशाला पाडता त्याच्यात? हॉटेलचा धंदा करणारा माणूस मी. मला राजकारणातलं काय कळतंय?''

''राजकारणात पडलेल्या सर्वांना राजकारण कळतंय असं तुम्हाला कोणी सांगितलं?''''तसं नाही पण तुम्ही लोक आहातच की. मी आणि येऊन काय अधिक करणार आहे?''

''तसं न्हाई!'' एक वृद्ध दम खात म्हणाले. ''ज्याच्या घरात खायला आन न्हाई आसा मानूस राजकारणात पडला का आपली तुंबडी भरून घेतो. मग लोकांचं वाटुळं का हुईना; त्येला येत न्हाई दया!''

''म्हणून आम्ही म्हणतो, तुमच्यासारख्या स्वत:च्या कष्टावर सधन आणि समर्थ झालेल्या माणसानं निदान गावच्या कारभारात तरी लक्ष घालावं!'' श्यामराव युक्तिवाद करण्याच्या इराद्यानं म्हणाले, ''हां ऽ आनी हिरीला पानी लागलं न्हाई म्हनून डोक्यात राक घालून घ्यायचं कारनबी न्हाई!''

दमानं बोलणारे आजोबा दम घेऊन म्हणाले, ''तुमी गावात आलासा; तवा काय झालं हुतं ठावं हाय न्हवं? दुकाळ दांडगा पडला हुता. पान्याचा ठ्यांब न्हवता. मरनाऱ्याची जीब वल्ली करावं म्हनलं तरी पानी न्हवतं. तुमी आलासा आनि पाऊस पडला. दगडूनं मला सारं सारं सांगिटल्यालं हुतं! आवो, तुमच्या पायगुनानं गावाला ह्यो तलाव झाला.''

''ते खरं हो, पण माझ्या शेतात चार ठिकाणी खोदलं तरी पाण्याचा मागमूस नाही. कसला पायगुण घेऊन बसलात तुम्ही माझा?''

''आसंच आस्तं! उपकार करणाऱ्याला कदी सूक मिळत नस्तं. ह्यो ह्यो सुर्व्य! साऱ्या दुनिव्याला उजेड देतो खरं; सोता मातोर रातध्याड आग्नीनं जळत आस्तो! तसंच हाय बगा! डोस्क्यातनं याड काडून टाका आता.''

''मग उद्या फॉर्म भरायला आणू का?'' श्यामरावनी विचारलं.

त्या मंडळींच्या आगमनानं खरोखरच बापूसाहेबांना बराचसा दिलासा मिळाला होता. आपल्या अपयशाकडं सहानुभूतीच्या स्नेहार्द्र दृष्टीनं पाहणारी काही माणसं या गावात आहेत हे पाहून त्यांना खूपच आनंद वाटला. इतकंच नव्हे, तर गावाला झालेला तलाव आपल्या आगमनामुळं झाला, ही भावना त्यांच्याजवळ आहे असं पाहून बापूसाहेबांची विषण्णता लोप पावली. चहापान झाल्यानंतर बापूसाहेबांनी आपण सर्वांच्या विनंतीला मान देण्याचा निर्णय घेतल्याचं सांगून टाकलं.

0-0-0

चार

बापूसाहेब चौगुले ढालगावचे सरपंच झाले अन् जादूची कांडी फिरवावी तसं गावचं अंतरंग बदलू लागलं. शाळेपासून पंचायत-समितीच्या कार्यालयापर्यंत सर्व इमारती नव्या झाल्या. गावातले अरुंद रस्ते, बोळ आजवर जनावरांच्या शेणामुतांनी भिजलेले असायचे; तेसुद्धा डांबरी झाले. गटारं झाली. तलाव गावापासून सुमारे दीड मैलावर होता, कॅनॉलवर शेतं भिजत होती; पण गावाला पिण्याचं पाणी अजूनही विहिरीतून ओढावं लागे. पाणी-पुरवठ्याची योजना अमलात आणली. टाकीच्या उद्घाटनाला कोणी मंत्री उपस्थित राह्यले. त्यांनी गावच्या झपाट्यानं बदलणाऱ्या परिस्थितीचे जनक म्हणून बापूसाहेबांचा गौरव केला. खुद्द मंत्र्यांनी बापूसाहेबांच्या गळ्यात गलेलठ्ठ हार घालताच गावच्या जमलेल्या आबालवृद्धांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

बापूसाहेबांना त्या रात्री अस्मान ठेंगणं झाल्यासारखं वाटलं आणि तशातच निरोप आला- "लक्ष्मी प्रसूत होऊन पुत्ररत्न झाले." बापूसाहेबांनी बँड लावून आख्ख्या ढालगावला पेढे वाटले. दुसऱ्या दिवशी सकाळीच लक्ष्मीच्या समाचाराला जायचं त्यांनी ठरवून टाकलं.

"काय म्हणतोस? विहिरीला पाणी लागलं?" धावत धावतच येऊन ती सुवार्ता देणाऱ्या पिऱ्या धनगराला कडकडून मिठी मारून बापूसाहेब म्हणाले.

"बिरोबाच्यानं! धनी, ह्यो मुशींडा. आतापातोर हीर भरली दिकून आसंल!"

"चल, चल, बगू या. आई जगदंबा पावली. पिऱ्या, तुला शंभर रुपये इनाम!"

बापूसाहेबांना पायात वहाणा घालायचंदेखील भान राह्यलं नव्हतं, पिऱ्या त्यांच्या मागोमाग धावत होता.

वाटेत रस्त्यावरचे शेतकरी हात उंचावून ओरडून बापूसाहेबांचं अभिनंदन करीत होते, "भले भाद्दर चौगुले, शेवटाला ईर्षा पुरी केली!"

पण बापूसाहेबांचं त्याकडं लक्ष नव्हतं. ते धावतच होते. वाटेत पायाला खडे टोचत होते, ठेचा लागत होत्या, खड्ड्यात पाय मुरगळत होते; पण बापूसाहेब धावतच होते. अर्ध्या तासात शेतावर पोहोचणाऱ्या बापूसाहेबांना आज हे अंतर मैलच्या मैल दूर असं वाटत होतं. जाता जाता ते लखोबा नवल्याच्या तीन-तीन पिढ्यांचा उद्धार करीत होते. "हरामखोर भोसडीचा! म्हणतो कसा, पाण्याचा थेंब दिसणार नाही. ह्याच्या बापानं धंदा केला होता पाणक्याचा! आता येऊन बघ म्हणावं! माझ्याकडून घेतलेले तीनशे रुपये घेतो आता त्याच्याकडून वसूल करून! माझ्या पैशाला काय किंमत नाही? का चोरी-घरफोडी करून मिळवलाय मी?"

बापूसाहेब धावतच होते. तोंडाला कोरड पडली होती. आजूबाजूच्या शेतावर इलेक्ट्रिक मोटारी पाणी खेचत होत्या, पाण्याचा लोट पाटातून वाहत होता; पण बापूसाहेबांना आज आपली तहान शमवायची होती ती आपल्या कामातल्या विहिरीच्या पाण्यानं!

पिऱ्या जाता-येता पळून थकला होता. तो रेंगाळत मागून येत होता. बापूसाहेबांनी थांबवून त्याला ओरडून म्हटलं, "भडव्या. दमायला काय झालं? पाय उचल. आज रात्री तुला किती बाटल्या पाह्यजेत तेवढं तरी सांग-"

"बाटल्या? मालक नुसती बाटली न्हाई. संगं आख्खं याक कोंबडं बडीवनर हाय मी!"

"बरं बरं, कोंबडं का मागतोस? बार बकरी कापून कंदूरी करतो की! चल, उचल."

पिऱ्याला आता हाताला धरून बापूसाहेब शेताच्या रोखाने निघाले होते. शेवटी एकदाचं शेताच्या बांधावरचं गोटी आंब्याचं झाड दिसलं. झाडाच्या पलीकडं शे-दोनशे माणूस जमलं होतं. बापूसाहेबांनी चौथ्यांदा खणायचं सोडून दिलेल्या विहिरीभोवती चिक्कार गर्दी झाली होती. लाखो मधमाशा घोंघाव्यात तशी गुणगुण उडाली होती.

बापूसाहेबांना कोणीतरी पाह्यलं आणि विहिरीच्या काठावरची गर्दी एकदम बाजूला झाली. बापूसाहेबांना वाट करून देण्यात आली. बापूसाहेब अतिवेगाने काठाकडे निघाले. कदाचित् त्यांचा झोक जाईल म्हणून त्यांच्या शेजारचा शेतकरी त्यांचा शर्ट धरून त्यांना मागे खेचू लागला.

बापूसाहेबांनी ओणवून पाह्यलं, खरोखरच विहिरीच्या तळातून जोराचा उमाळा उसळला होता. बुडबुडे उठत होते. पाणी फेसाळून उकळी आल्यासारखं थय्थय् नाचत होतं! बापूसाहेबांना इतका आनंद झाला, इतका आनंद झाला अन् ते मोठ्याने ओरडले!

त्यांचा आवाज ऐकून त्यांचा नोकर धनाजी माडीवर धावून आला अन् त्यानं दिवा लावला. बापूसाहेब अंथरुणावर उठून बसले होते. छातीची धडधड वाढली होती. नोकर विचारत होता, "धनी, काय झालं? काय झालं! लई मोठ्यानं वरडलासा?" धनाजीनं घाबरून विचारलं.

"च्या आयला स्वप्न! भयंकर स्वप्न!"

"पर असं कधी वरडत उठला नव्हतासा!"

"जरा पाणी दे, तहान लागलीय!"

धनाजीनं टेबलावरच्या तांब्यातलं पाणी ग्लासात ओतून बापूसाहेबांच्या समोर धरलं.

"कुठलं रे हे पाणी?"

"कुठलं म्हणजे? नळाचं! परवाच्याला तुम्ही नाही का टाकी सुरू केलीसा!"

"तळ्याचं पाणी हे! बेचव लागतंय!"

मग एक घोट पाणी घेऊन बापूसाहेबांनी हातातला ग्लास भिंतीवर फेकला. काचेचे तुकडे तुकडे झाले. धनाजी "आ" वासून त्यांच्याकडं पाहत राह्यला.

भिंतीवरच्या घड्याळात तीनाचे टोले पडले. धनाजीनं धाडस करून विचारलं, "धनी, सपान चकोट हुतं का वंगाळ?" आणि तो फुटलेल्या ग्लासाचे तुकडे वेचू लागला. धनाजीच्या प्रश्नाचं उत्तर न देताच बापूसाहेब दोन्ही हातांनी डोकं घट्ट धरून बसून होते. अंमळशानं ते म्हणाले, "करायचंय् काय ते घेऊन तुला? बोलून चालून स्वप्नच ते!"

"तसं नव्हं धनी, फाटंच पडल्याची सपनं खरी हुत्यात म्हणून इचारतो!"

"काय म्हणालास?"

"फाटंची सपनं खरी हुत्यात खरी!"

"पण मला पडलेलं स्वप्न खरं होण्यासारखं नाही रे धनाजी! फार विचित्र, फारच विचित्र!"

"हे बगावं धनी, काल वैनीसाबास्नी पोरगा झालाय. त्येचा पायगुन आसला आणि तुमास्नी सपन पडल्यालं आस्लं तर खरं हुईल. कुनी सांगावं?"

"धनाजी, आता झोप येणार नाही. चहाला ठेव. लवकरच निघू. तंबाखू आण भाजून जरा अगोदर-"

धनाजीनं काचेच्या पेल्याचे सर्व तुकडे एकत्र केले. जुन्या पेपरमध्ये गुंडाळले आणि तर्जनी तोंडात घालून तो खाली निघाला. त्याच्याकडं लक्ष जाताच बापूसाहेब म्हणाले, "धना, काय झालं रे? कापलं का?"

"व्हय. उगी जरा हाय!"

"सकाळी काढता आलं नसतं? तुझी घाईच दांडगी!"

"आनि आंदारत तुमचा पाय पडला आन् भळाभळा रगत आलं तर?"

बापूसाहेबांना पुन्हा एकदा ते स्वप्न आठवलं. ते पिरा धनगरासोबत धावत होते, तेव्हा पायाला सड लागून पाय रक्तबंबाळ झाले होते. आणि आता इथं धनाजीनंही नेमकं पायाला रक्त येण्याची भाषा करावी हे पाहून त्यांना कमालीचं आश्चर्य वाटलं. स्वत:च्या दोन्ही तळव्यावरून त्यांनी हात फिरवून उगीचच पाह्यलं. हाताला काही लागलेलं नव्हतं; पण त्यांना मात्र रक्त लागलंय का काय, हे पाहण्याची जिज्ञासा लागून राह्यली होती.

0-0-0

पाच

बापूसाहेबांनी मोटर घ्यावी अशी जरी त्यांची स्थिती होती तरी त्यांनी उगाच छानछोकीचं प्रदर्शन नको म्हणून एक टांगा बनवून घेतला होता. विलीन झालेल्या एका संस्थानिकाला आपल्या पदरी असलेले रेसचे घोडे पोसणं अशक्य झालं म्हणून त्यानं ते विक्रीला काढले होते. बापूसाहेबांनी त्यातला एक उत्तम काळा कुळकुळीत, अरबी मूळ असलेला घोडा खरीदला होता. पेठेच्या रमजान नालबंदकडून टांगा बनवून घेतला आणि तो टांगा पिवळसर पांढऱ्या रंगानं रंगवून घेतला. टांगा हाकायला स्वत: बापूसाहेब बसायचे. घोड्याला चाबूक न मारता वरच्यावर सू ऽऽऽ सू ऽऽऽ अशी चाबकाची काठी घुमवली तरी घोडा धावायचा. कदाचित गतीनं धावण्यासाठी चाबकाचा फटकारा खाणं हे मानहानीचं आहे असं त्या उच्चकुलोत्पन्न अश्वाला वाटत असावं!

त्या दिवशी बापूसाहेब रेठऱ्याला निघाले होते. अजूनही डोक्यात पहाटेच्या त्या विलक्षण स्वप्नातले प्रसंग तरळत होते. धनाजीचे शब्द आठवत होते- ''फाटंची सपनं खरी हुत्यात!''

घोडा टापांच्या तालावर धावत होता. ढालगाव ते रेठरं आठ-दहा मैलांचं अंतर सहजच तासा-दीड तासात काटलं जाणार होतं. जाता जाता बापूसाहेबांनी कोटाचा खिसा चाचपून पाह्यला. गाव सोडताना बासू सोनाराच्यातून घेतलेली सोन्याची मोहोर नेमकी कोणत्या खिशात ठेवलीय, हे आठवलं नव्हतं.

रेठऱ्याला जाणारी सडक बरी होती; पण वाहनाला जावं लागे ते तीन डोंगरांना वळसा घालून, शेवटी म्हसोबाच्या खिंडीतून! ही म्हसोबाची खिंड एके काळी फारच मशहूर होती. खिंडीत दाट, गर्द झाडी आणि मध्ये भलेमोठे हत्तीचा कळपासारखे प्रचंड खडक होते. या खिंडीत राहायचे चोर-लुटारू. पूना-बेंगलोर रस्त्यापासून ही खिंड साधारण सहा मैलांवर होती. रात्री-बेरात्री लग्नाच्या मोसमात बैलांच्या गळ्यातले घुंगरू वाजले की लुटारू बाजूच्या मोठमोठ्या वडाच्या आडोशानं दबा धरून हळूहळू पुढे सरकायचे आणि अचानक गाड्यांवर हल्ला करून वऱ्हाड लुटायचे. पण आताशी ही धाडशी मंडळी एका चांगल्या धंद्याला लागली होती- हातभट्टीच्या! सगळ्या म्हसोबाच्या खिंडीतून रसायनाचा दर्प येत होता. पण अशातही एकदा रामोशी आपल्या वाडवडिलांच्या नावाला जपण्यासाठी अधून मधून एकदा धाडशी डाका घालीत होता; एखादी वाटमारी करीत होता. पण त्याचं एक वैशिष्ट्य होतं. ढालगाव आणि आसपासच्या खेड्यातील लोकांना ते कधीही लुबाडत नसत. कारण त्यांनी जर मनात आणलं, तर म्हसोबाच्या खिंडीत आश्रय घेणं दुरापास्त झालं असतं.

बरेचसे रामोशी बिनभांडवली, अफाट नफ्याच्या धंद्याला लागले तरी पेठेचा रानबा रामोशी चार गावचे चार ''ठगे'' गोळा करून कधीतरी कुणाला तरी लुबाडायचा. पण त्याहीपेक्षा गावोगावचे लुटारू रानबाकडं ''ट्रेनिंग'' घ्यायला यायचे असं म्हटलं, तर फारसं अतिशयोक्तीचं होणार नाही. रानबा त्यांना धडे द्यायचा आणि त्यांच्याकडून एखादी वाटमारी,

एखादी घरफोडी करवून घ्यायचा आणि त्यात ते "उत्तीर्ण" झालेत की नाही हे अजमावयाचा.

बापूसाहेबांचा टांगा खिंडीतून चालला होता आणि धप्पदिशी वडाची एक भली मोठी फांदी रस्त्यावर पडली- या कडेपासून त्या कडेपर्यंत. फांदीच्या आवाजानं घोडं बिथरलं आणि किंकाळू लागलं. बापूसाहेबांनी लगाम खेचून त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला, तोच सात-आठ काळेढोंब रामोशी येऊन बापूसाहेबांनां चोहोबाजूनं त्यांनी घेरलं. तात्काळ त्यांचे हात बांधले. घोडा टांग्यापासून अलग केला आणि दोन्ही बाजूच्या गर्द झाडीत नेऊन लपवून ठेवले.

बापूसाहेबांना ढकलीत ढकलीत ते सुमारे फर्लांगभर आत घेऊन आले. समोर एका झाडाखाली रानबा बसलेला. बापूसाहेबांना त्या अवस्थेत बघताच तो ताडकन् उठला आणि त्यांना बांधून घेऊन येणाऱ्यांच्या अंगावर खेकसला, "रांडंच्यांनो, तुमची आई मेली ती! कुनाला धरून आणलंसा?" असं म्हणून त्यानं स्वत: बापूसाहेबांचे हात सोडले आणि स्वत: हात जोडून बापूसाहेबांकडे क्षमेची याचना करून म्हणाला, "काय बी म्हणा, आताच्या पोरास्नी डोस्कीच न्हाईत!"

"पण तू हे असं अजून किती दिवस चालवणार आहेस रानब्या?"

"मी काय करतोय बापूसाहेब ? ही येडी येत्यात, उगी घळ घलत्यात!"

"साठी उलटली. आता सोड हे!"

"खरं सांगू बापूसाब, ह्या दारूत लई मोप पैसा घावतोय. खरं ह्यो धंदा करतानं गंमतच वाटत न्हाई!"

"कसली गंमत?"

"रातचं दूर आंदारात मैलांच्या मैल जायाचं, जीव धोक्यात घालून एकाद्याचं घर फोडायचं, डल्ला मारून सुसाट पळत सुटायचं! मग पोलिसांची बोंबाबोंब सुरू व्हायची. हेला धर, त्येला धर. करणार एकटा आणि पोलीस संशोव धरून धरणार दुसऱ्यालाच! आपुन आपलं त्येंची गंमत बघत बसायचं!"

"रानब्या, ही गंमत होय रे? सोड आता सगळं हे!"

"सुटत न्हाई बापूसाब! कवातरी अंगात येतंयाच म्हनंनासा! बरं, सकाळच्या पारी कुटं दौड मारलीसा?"

बापूसाहेबांना पकडून आणणाऱ्यांच्या अंगावर खेकसून रानबा म्हणाला, "रांडंच्यांनो, टांगा जुपून तयार ठेवा. कुनाला आडवावं, कुनला नगं; कळतंय का तुमास्नी? हं, काय म्हनतो मी? असंच हुतंय बगा, बोलता बोलता आसं ध्यानच तुटतंय!"

"कुठं चाललो होतो हे विचारत होतास."

"हां ऽऽऽ! बगा. खरं ते मी इचाराय नगो हुतं!"

"का?" "मला म्हाईत हाय. काल तुमाला पोरगा झाल्याची आवई आईकली हुती! खरं न्हवं? मग आज सोन्याची म्हवर लेकावरनं उतरायला चाल्ला आस्शीला?"

"रानबा, फार पक्का हं तू. ही बघ मोहोर!"

असं म्हणून बापूसाहेबांनी खिशातली गुलाबी चिरमुरी कागदात गुंडाळलेली मोहोर काढून रानबाला दाखवली. रानबानं ती हातावर वजन केल्यासारखी एक-दोन वेळ वर-खाली केली अन् म्हणाला, "वाश्याच्यात घेटलीसा?"

"होय!"

"फसलासा!"

"ते कसं?"

रानबानं ती मोहोर जवळच्या एक गुळगुळीत दगडावर घासली आणि बाजूला उभा

असलेल्या एका मध्यम वयाच्या रामोशाकडं वळून म्हणाला, "सैत्या, त्या नगमल मारवाड्याच्या बायकूची पुतळ्याची माळ घे रं जरा!"

सैत्यानं दगडाच्या बेचक्यात हात घालून एक बोचकं बाहेर काढलं. त्यातून लखलखणारी वीस पुतळ्यांची माळ घेऊन रानबासमोर धरली. रानबानं खसकन् त्यातली एक पुतळी उपसून त्याच दगडावर घासली. अन् बापूसाहेबांसमोर तो दगड धरून म्हणाला, "बगा, ह्यो फरक! सगळी हयात गेली सोनं पारकून. बापूसाब, वाश्या लई माजलाय. पितळंचा पैसा करायला लागलाय. आवो, पोरावरनं सोनं उतरून टाकायचं तर ते शंबर नंबरी आसावं. बनावट आसू ने. न्ह्या जावा ही पुतळी!"

बापूसाहेबांनी रानबाला दिलेली मोहोर त्यानं झाडीत दूर फेकून दिली.

"बरेच दिवसात कुठं हॉटेलाकडं आला नाहीस?"

"कशाला येवावं?

"का?"

"तुमी तकडं रानात डबरं काढत बसला हुतासा की!"

"खरंच रानबा, ते एक डोक्यात वेडच होतं बघ!"

"आस्सं आस्सं; पण खरं सांगू बापूसाब, समजा हिरीला पानी लागलं तर काय हुनार हाय?"

"अरे, तिथं मळ्यात बंगला बांधीन, विहिरीवर मोटार बसवून सारी बागायत करून टाकीन!"

"म्होरं?"

"आणि काय? तिथं जाऊन राहायचं विश्रांतीसाठी. चार जनावरं राहतील असा गोठा बांधायचा, कोंबड्या पाळायचा!"

"त्याला "फार्म हौस" म्हनत्यात न्हवं का?" रानबानं डोकं खाजवून अचूक शब्द काढला.

"बराच आहेस की रे!"

"कवातरी, कुठंतरी आईकल्यानं! बरं, आता एक सांगू तुमास्नी?"

"काय ?"

"तुमच्या रानाला पानी लागनार न्हाई!"

"का?"

"ते तुम्ही इचारू नये!"

"पण का?"

"ते रान भेडताकांचं हाय. ज्यो कोन ते रान घील, त्यो गोत्यात येतो. तुम्ही गिराक मिळालं तर सगळं रान दिऊन टाका, जावा!"

"पण रानबा, माझी इच्छा होती...!"

"हीर काडावी ऽऽ न्हवं का? बापूसाब, सोडा त्यो नाद. त्या रानात बेडकीच्या मुताएवढं दिकुन पानी लागणार व्हाई!"

"पण रानबा ऽ ऽ...!"

"ठाव आहे मला! लई पैका घातलास हीर काडाय पायजे; पण तुमाला याक सांगू?"

"सांग की!"

"देवाला मानतायसा?"

"जरूर ! देवावर नितांत श्रद्धा आहे माझी!"

"त्यो देव म्हंजे कोण हाय वाटतं तुमाला?"

"म्हणजे?"

"आवो, त्यो म्हंजे सुतार हाय सुतार!"

"काहीतरीच बोलतोस रानबा!"

"आवो, गळ्याच्यान्. त्यो देव म्हंजे सुतार हाय. आन् ह्यो सुतार निस्तं काय तयार करतो; ठावं हाय का?"

"काय ?"

"आवो. त्यो निस्तं पाचर तयार करतो!"

"पाचर?"

"व्हय. आनी बरमदेवानं तयार केलेल्या मानसात याक याक पाचर मारून सोडतोय. कुनाला पोरबाळ न हुनारी पाचर. कुनाला लोबीष्टपनाची तर कुणी पाण्यासारखा पैका घाटला तरी बी हिरीला पानी लागत न्हाई ऽऽऽऽ!" रानबा मोठ्यानं हसून पुढं म्हणाला. "म्हनून जेनं तेनं आपल्यात त्येनं काय पाचर मारलीय ते वळकावं आनि नाद द्यावा सोडून. खरं का न्हाई?"

"पण रानबा. मला अजूनही वाटतं...!"

"येडं हैसा बापूसाब. आओ, सोन्यासारखा धंदा दगडूनं तुमच्या सोदीनं केला. घरदार बांधलासा. चार पैसे कमीवलंसा आनि त्या रानात न्हाई पानी लागलं तर काय हुनार हाय?"

"तेवढी एक आशा अडकून राहिलीय रानबा!"

"मी काय कोण मोठा सादुसंत न्हाई बापूसाब. पर याक सांगतो. त्या हिरीचा नाद सोडा. मला ठावं हाय ते रान लई आपेशी हाय!"

"आरं ए लक्या ऽ ऽ ऽ ऽ, टांगा जुपला का ऽ ऽ ऽ!"

"व्हय ऽ ऽ ऽ!" रस्त्याकडून आवाज आला.

बापूसाहेब उठले. रानबा पोहोचवायला आला. बापूसाहेब टांग्यात बसले. तेव्हा रानबा म्हणाला, "बापूसाब, राग मानू नगा हं. पोरं परमुलकातली हैत!"

"असू द्यात; पण आता या इकडं धंदा करू नका म्हणावं. मी सरपंच आहे; ठाऊक आहे ना तुला!"

"नसायला काय झालं? आज-काल राजं-महाराज इसरलं तर चालतील, पर सरपंच कोन, उपसरपंच कोन, इसरून कसं भागंल बापूसाब?"

बापूसाहेबांना त्या बोलण्यातली खोच समजली नसावी. ते फक्त मोठ्यानं हसले. रानबाही हसला आणि हसता-हसता बापूसाहेबांनी चाबूक हवेत फिरवला आणि त्यांचा घोडा इतक्या उशिराची भरपाई करण्यासाठी की काय भरधाव वेगानं धावू लागला.

रेठरे गावची शीव नजरेच्या टप्प्यात येताच बापूसाहेबांनी टांग्याची गती मंद केली. मुलाचं तोंड पाहण्यासाठी जरी ते आतुरले होते, तरी पहाटेचं स्वप्न आणि रानबानं दिलेला विहिरीचा नाद सोडायचा सल्ला काही केल्या त्याच्या डोक्यातून जायला तयार नव्हता.

0-0-0

सहा

बऱ्याच वर्षांपूर्वी ढालगावात तमाशा आला होता. तमाशा होता तिकडचा नगरकडचा; पण तमाशातली नाचणारीण होती पुण्याची-मैना पुणेकरीण. या मैनेचं नाव फार दुमदुमत होतं. मैना नाचायला लागली की प्रेक्षक बेहोष होऊन जात. तशी मैना गायचीही मोठी मंजुळ. मोठमोठ्या शहरी मैनेची बारी आली म्हणजे बंदोबस्तासाठी पोलीस पार्टी बोलवावी लागे आणि अशा मैनेचा तमाशा ढालगावात आला असताना एक अनुचित प्रकार घडला होता.

ढालगावात मीरासाहेबांचा उरुस होता. उरुसासाठी चार तमाशे आले होते; पण गर्दी झाली ती मैनेच्या तमाशासाठी... अफाट गर्दी.

त्यावेळी गावात एक दांडगेश्वर होता. शिवाप्पा पैलवान. हा शिवाप्पा कधीकाळी पैलवानकी करीत होता; पण नंतर त्याची पैलवानकी सुटली. एकदा मैदानात तो हरल्याचा निर्णय देताच त्यानं संतापानं त्या पंचाला उचलून आपटला. तेव्हापासून पैलवानी पेशाच्या लोकांनी त्याच्यावर जवळ जवळ बहिष्कार घातला. त्याच्याशी कुस्ती करायला कोणी तयार होईना. तालमीत सरावासाठीदेखील त्याला कोणी बोलवेना. त्यानंही पैलवानकी बंद करून टाकली. लोक त्याच्याविषयी काय बोलत होते, याकडं तो लक्ष देत नव्हता. कदाचित् कुस्ती खेळताना थपडांनी फुगलेले त्याचे कान, त्याची बदनामी त्याच्या कानाच्या पडद्यापर्यंत पोचवायला असमर्थ झाले असावेत.

असा हा एकलकोंडा शिवाप्पा काही काळ रानबाच्या संगतीत होता. रानबानं त्याला लुटमारीचे थोडे धडेही दिले; पण लुटमार करणाऱ्याच्या अंगी जी चपळाई लागते ती शिवाप्पाकडं मुळीसुद्धा नव्हती. पैलवानकी सोडल्यापासून शिवाप्पा रेड्यासारखा सुटला होता. रानबानं त्याला सरळ उपदेश केला, "शिवा, तुजं काम नव्हं हे. कवाकाळी पोलिसास्नी घावलास तर तुजं मांदं पागळून टाकतील!"

पण शिवाप्पाला हा देखील अपमान वाटला. "धडाडीचं एकादंही काम करण्यास मी असमर्थ नाही? ह्य गावाला दाखवून देतो या शिवाप्पाची ताकद काय आहे ती!"

आणि मग शिवाप्पा साऱ्या गावाला थक्क करून सोडण्यासारखी एखादी संधी शोधू लागला. याच सुमारास उरुस भरला. मैनेची बारी आली. शिवाप्पानं मैनेला भर बारीतून पळवून नेण्याचा मानस केला.

तमाशा ऐन रंगात आला होता. गणगौळण झाली. मग सवाल-जबाब सुरू झाले. सोंगाड्या आला आपल्या ग्रामीण आणि अश्लील कोट्यांनी उरुसास जमलेल्या खेडूतांना हसवू लागला. मग मथुरेच्या गौळणींचा पेटंट वग सुरू झाला. तेव्हा मैना बाजूच्या तट्ट्याच्या छपरात

कपडे बदलण्यासाठी गेली. पण ती बराच वेळ बाहेर आली नाही म्हणून तमासगीर त्या छपरात गेले. तर तिथं मैना नव्हती. त्यांच्या तोंडचं पाणी पळालं. "मैना गेली... मैना गेली" बघता बघता प्रेक्षकांपर्यंत ही कुणकुण पोहोचली आणि जमाव एकदम संतप्त झाला. डांबराचे टीप ठेवून त्यावर फळ्यांचं केलेलं स्टेज केव्हाच कोलमडून पडलं. गॅसबत्त्यांचा फुटून चक्काचूर झाला. दंगल तासभर सुरू होती. कित्येकजण त्या अंधारात आणि धांदलीत चेंगरून अर्धमेले झाले.

इकडं शिवाप्पा बैलगाडीतून मैनेला पळवून नेत होता. मैना धडपडत होती, ओरडत होती. बोचकारत होती; पण व्यायामानं कसलेल्या शरीरावर त्याचा काडीमात्र परिणाम होत नव्हता. ढालगावच्या पश्चिमेला डोंगरात एक पडका किल्ला होता. त्यात महादेवाचं देवालय होतं. गडाच्या पायथ्याला गाडी सोडून शिवाप्पानं मैनेला लहान मुलाला उचलावं तसं उचलून गडावर आणलं. गडावरच्या थंडगार वाऱ्यानं की शिवाप्पाच्या मर्दानी स्पर्शानं कुणास ठाऊक, मैनेची धडपड किंचित् थंडावली. पंख कापलेल्या "मैने" सारखी ती शांत बसून राह्यली.

देवळाच्या समोर प्रशस्त दगडी फरशीचं अंगण होतं. मैनेला समोर बसवून शिवाप्पानं एक नि:श्वास सोडला.

"काय मिळीवलंस मला इथं आनून?"

"आजून मिळवायचं हाय!" शिवाप्पा हसत हसत म्हणाला.

"आशी जबरदस्ती का केलीस?"

"का केली ते मला तरी कुठं म्हाईत हाय?"

"खरं, हे कडंला जानार न्हाई. लई वंगाळ काम केलंस!"

"मैने, मी अजून लगीन केल्यालं न्हाई. गावचं कोन मला पोरगी द्यायला तयार न्हाईत!"

"म्हणून मला भर तमाशातनं आनलीस व्हय?"

"हं! गाववालं म्हणत हुतं, माज्यात न्याट न्हाई "

"पर तुजं न्याट दावायपायी मीच दिसली व्हय तुला?"

"मैने, तुजं नाव लई दीस आयकत हुतो. पाचसा डाव तुजा तमाशाबी बगिटला आनि मग मनानं ठरीवलं, बायकू करीन तर तुज्यासारखीच!"

"मग?"

"लई-लई पोरी बगिटल्या; अगदी पार सातारा-कोल्हापुरापातोर; पर तुझ्यासारकी मातोर कुटं नजरंला दिसलीच न्हाई! मग म्हटलं, तुलाच न्ह्यावी उचलून!"

"आरं, पन एवढा तमाशा तरी हून द्याच हुतास!"

"मग त्यात काय ऱ्हायलं? इकत्याजनांच्या डोळ्याम्होरनं पळीवन्यातच गंमत हाय!"

"धा गावचं मानूस जमल्यालं हुतं. त्या सव्र्यांची मनं का बरं दुकावलीस?"

"जास्त बोलू नगं रागूवानी. तू हैस मैना. मैनंवानी मंजुळ बोल" असं म्हणत शिवाप्पानं तिला आपल्या पोलादी मनगटांनी जवळ ओढून छातीशी कवटाळून धरलं.

"सोड, आरं सोड!"

पण तिला तशी सरळ सोडण्यासाठी शिवाप्पानं तिथपर्यंत आणलं नव्हतं. तिची धडपड थंडावली.

रात्रीचे दोन वाजले. गडावरून खालचा सर्व भूप्रदेश दिसत होता. ढालगावच्या उरुसातला कोलाहल इथंपर्यंत चार-पाच मैलावरदेखील ऐकू येत होता.

गडावर थंड हवा सुटली होती. वर आकाश तारकापुंजांनी दाटलं होतं. गलितगात्र

झालेल्या शरीरानं मैना शिवाप्पाकडं अंधारात पाहत होती. आता पुढं काय होणार हे मैनेला कळत नव्हतं. काही काळ असाच अबोल्यात गेला अन् मैनेनं हलकेच विचारलं.

"आता म्होरं माजं काय करनार हैस?"

"लोंचं घालून बरणीत ठिवनार हाय अन् रोज जरा जरा तोंडी लावनार हाय!"

"राक्षस हैस!"

"मैने, आपून आता गाव सोडून कुठंतरी लांब जाऊ!"

"आणि?"

"राजा-रानीवानी ऱ्हाऊ!"

"आस्सं! माजा मालक गप्प ऱ्हाईल वाटतं तुला?"

"काय करील?"

"आरं, मी गेले म्हंजे त्येच्या तमाशाला कोन कुत्रं जाईल का?"

"मग कुठंतरी दूरच्या देशाला जाऊ!"

"पैलवान आर्धा डोस्क्याची अस्त्यात म्हनं ते खरं हाय बग. आरं, खायाचं काय पोटाला?"

"मी काय दुबळा हाय व्हय? लागलं तर हमाली दिकुन करीन की!"

पण ही शिवाप्पाची अंधाऱ्या रात्री कल्पिलेली सारी स्वप्नं दिवस उजाडताच धुळीला मिळाली. पेठेच्या फौजदारानं बैलगाडीच्या मागावरून शिवाप्पाचा अन् मैनेचा ठावठिकाणा शोधून काढला आणि व्यभिचारासाठी मैनेला पळवली असा त्याच्यावर आरोप दाखल करून कोर्टात खटला पाठवला. शिवाप्पाला सात वर्षांची शिक्षा झाली. मैना परत तमाशात आली; पण तिला फार दिवस काही नाचता आलं नाही. शिवाप्पाचा अंश तिच्या उदरात वाढत होता. तमाशाच्या मालकानं तिला "रिकामी" करण्याचा प्रयत्न केला; पण तो गावठी वैदूकडून! मैनेचा त्यातच अंत झाला.

तेव्हापासून ढालगावला तमाशाचा फड म्हणून कधी फिरकला नाही. मीरासाहेबांचे किती तरी उरुस त्यावर उत्साहानं साजरे झाले; पण त्यानंतरच्या कुठल्याच ऊरुसात तमाशा ढालगावकडं फिरकला नाही.

आता त्या गोष्टीला किती तरी वर्षे झाली, तरी तमासगिरांच्या जगात एक भीती निर्माण झाली होती. तमाशातली बाई ढालगावात नाचली की मरते! त्यामुळे तिकडं इतकी वर्षे कोणीही तमासगीर फिरकले नव्हते.

काळ झपाट्यानं बदलत होता. जुन्या रूढी आणि अंधश्रद्धा माणसांना पूर्वीइतक्या भेडसावत नव्हता. अर्थात, ढालगावच्या उरुसात एकदा जावं असं काही नवीन तमासगिरांना वाटू लागलं होतं. त्यापैकी एकजण होता खुद्द ढालगावतलाच सुदाम कांबळे!

ढालगावच्या भीमनगरात राहणारा हा सुदाम नाकीडोळी इतका तरतरीत होता की थोडा शिकलासवरला असता तर नक्कीच नाव कमावता; पण केवळ मराठी सात इयत्तेवरच त्याचं तट्टू अडलं. पेठेला जाऊन तो भजनं म्हणायला शिकला. भजनं करता करता दंग होऊन तो नाचतदेखील असे. हळूहळू त्याचं नाव त्या भागात पसरलं आणि एका तमासगिरानं त्याला उचललं. गाणं, अभिनय आणि दिसायला तरतरीत यामुळं तो अल्पावधीत लोकप्रिय झाला.

प्रसिद्धीबरोबर अमाप पैसा सुदामाच्या मागे लागला. भीमनगरात त्यानं दोन मजली घरही बांधलं. चार एकराचा एक डाग घेतला आणि आता त्याच्या लग्नाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. गावोगाव तमाशातून फटाकड्या पोरींच्या सहवासातून वावरणारा सुदाम एखादी छकडी छबी घरात घेऊन येईल या भीतीनं त्याच्या बापानं त्याच्या लग्नाची घाई करायला

सुरुवात केली होती.

पण सुदामा लग्नाला तयार होईना. त्यालाही एक कारण होतं. भीमनगरातल्या रंगा लिंगाड्याची लेक यशोदा त्याच्या मनात भरली होती.

रंगा लिंगाडे जातीनं हरिजन खरा; पण त्याचा उजळ रंग, स्वच्छ भाषा, वागण्या-बोलण्यात तरी तो इतका सुसंस्कृत वाटे की तो हरिजन आहे हे सांगूनही कुणाला खरं वाटत नसे. रंगावर असे सुसंस्कृत संस्कार व्हायलाही सबळ कारण होतं. आपण अस्पृश्यता मानीत नाही हे दर्शविणारे काही संस्थानिक होते. त्यातल्या एका संस्थानिकानं रंगाला आपल्या पदरी नोकरीला ठेवून घेतला होता. वाड्यातले सारे संस्कार रंगाच्या अंगी भिनले होते. पण संस्थान विलीन झाली आणि रंगा परत ढालगावला आला. रंगाची लेक यशोदा त्या हरिजनवाड्यात जरासुद्धा खपू शकत नव्हती. तिला सारा हरिजनवाडा "बामणीन" म्हणत होता. आणि ही यशोदा भरली होती सुदामच्या मनात! पण रंगा लिंगाड्यानं सुदामची ही मागणी साफ धुडकावून लावली. भीमनगरातल्या एका-दोघांनी रंगाला सुदामचं स्थळही सुचवलं; पण रंगा म्हणाला, "माझी लेक नाच्याला देणार नाही. परत मला कोणी त्याबाबतीत विचारू नये!"

सुदामला जेव्हा हे कळलं तेव्हा त्याचा अहंकार दुखावला गेला. आपल्या अमाप प्रसिद्धीकडं आणि पैशाकडं पाहून रंगा त्या मागणीला संमती देईल ही सुदामला आशा होती, ती फोल ठरली.

यशोदा, जिला सारा हरिजनवाडा "बामणीन" म्हणायचा, तिच्याही मनावर रंगाप्रमाणे शहरी संस्कार झाले होते. ती रोज सकाळी न चुकता अंघोळ करायची, वेणीफणी नित्यनियमानं, डोकीत फुलं माळायची. आणि इतरांच्या घरी कधी कधी जायची; पण तिथं काही खायची मात्र नाही. मोठ्या जनावराचं मांस खाणं तिला मुळीसुद्धा पसंत नसे. कधी एकादा म्हातारा झालेला बैल किंवा अपघातात पाय गमावलेला पाडा हरिजनलोक सामुदायिकरीत्या पैसे घालून खरेदी करायचे आणि तक्क्याजवळ नेऊन कापायचे. सारं भीमनगर वाट्यासाठी जमा व्हायचं. यायचं नाही कोणी, ते लिंगाड्याचंच फक्त!

यशोदा सात यत्ता शिकली आणि रंगा गावाकडं परतला. पुढं शिकायची इच्छा असूनही तिला शिकता आलं नाही. गावात कधी कधी सुदामा यायचा, तो तंग पँट, चट्ट्यापट्ट्याचं बनियन घालून. तोंडानं शीळ घालीत हिंडायचा. यशोदानं त्याला अनेक वेळा पाह्यलं; पेण तिच्याही मनात त्याच्याविषयी कोणतंच आकर्षण निर्माण झालं नव्हतं.

आज रात्री ढालगावात सुदाम आणि पार्टीचे लोकनाट्य होणार म्हणून लाऊडस्पीकरवरून जाहीर करण्यात आलं. इतक्या वर्षांनी गावात परत तमाशा होणार म्हटल्यावर तुफान गर्दी झाली. बरंचसं भीमनगर तर लोटलंच; पण गावचे सरपंच बापूसाहेब आणि ग्रामपंचायत सदस्यदेखील त्या खेळाला हजर राहिले.

लोकनाट्य फारच रंगलं. सुदामाला कृष्णाचं "मेकअप" करण्यात आलं होतं. बाजाराची वाट अडवण्याचा तो "पेटंट" सीन मात्र त्या खेळात नव्हता. सुदाम (कृष्ण) अर्जुनाला लढाईस प्रवृत्त करण्याचा प्रसंग ग्राम्य विनोदाने सादर करण्यात आला. अर्जुनाला प्रवृत्त करताना त्यानं सर्व अर्वाच्य शिव्यांचा वर्षाव केला होता. सर्वांत कडी म्हणजे लढाईला प्रवृत्त व्हावं या हेतूनं शेवटी कृष्णानं त्या अर्जुनाच्या सरळ तोंडात ठेवून दिली.

गोपिकांचं नृत्य झालं, शृंगारिक विनोद झाले; पण ढालगावच्या त्या रांगड्या लोकांना ते कितपत कळले कुणास ठाऊक! एकूण काय, तर बऱ्याच वर्षांनी असला प्रकार पाहायला मिळाला म्हणून लोकांना आनंद वाटला, एवढंच!

सरपंचानी स्टेजवर जाऊन सुदामाचं अभिनंदन केलं, तेव्हा भीमनगरातल्या प्रेक्षकांनी

टाळ्यांचा गजर केला. अस्पृश्यता नष्ट झाल्याचं ते ढालगावापुरतं जिवंत उदाहरण होतं.

दुसऱ्या दिवशी बापूसाहेब चौगुल्यांनी सुदामाच्या सर्व पार्टीला आपल्या वाड्यावर नेऊन जेवण दिले.

असे दिवस चालले होते. अन् बापूसाहेब आपल्या मनाला झालेली जखम हळूहळू विसरल्यासारखे दिसत होते. पण मध्येच एखादा असा प्रसंग निर्माण होई की त्या जखमेवरची खपली टपकन् निखळून पडे आणि भळभळ रक्त वाहू लागे. काही केल्या ते थांबतच नसे.

0-0-0

सात

बापूसाहेब गावच्या राजकारणात बरेच रंगले. गावात आताशा कुठल्याही, कुणाच्या घरी एखादं कार्य निघालं की सर्वप्रथम आमंत्रण जाई ते बापूसाहेबांकडे. आणि भीमनगरातल्या गणपा कांबळेपासून ते ढालगावातल्या धोंडीनाना डोईफोडे यांच्यासारख्या सधन सावकारापर्यंत सर्वांना आपल्या घराच्या कार्याला बापूसाहेब हवेत असं वाटे. यामुळे झालं काय, तर बापूसाहेब हजर नसतील ते कार्य शोभा देत नाही, असा बऱ्याचजणांचा समज होऊन चुकला ! शिवाय बापूसाहेबांना बोलवण्यात झाला तर फायदाच व्हायचा; तोटा कधीच नाही. लग्नाच्या आहेराला बापूसाहेबांनी शंभराच्या खाली कधी आहेर केला नव्हता.

तसंच कुणी अडलं-नडलं, तर उठावं आणि बापूसाहेबांच्या दारात हात पसरून उभं राहावं. रित्या हातानं कधीच परत यायची पाळी कुणावर आली नव्हती. फूल ना फुलाची पाकळी हातावर पडत असे.

चार वांझोट्या विहिरी काढूनही बापूसाहेबांकडे अजून अमाप पैसा होता. आता तर काय, त्यांचं हॉटेल धुमधडाक्यानं चाललं होतं. एक केरळचा स्वयंपाकी मिळाला होता. तो दक्षिणी पद्धतीचं मांसाहारी जेवण इतकं स्वादिष्ट बनवायचा की पुण्याहून बंगलोरला जाणारे आणि बेंगलोरहून पुण्याला येणारे ट्रकवाले शीख, पंजाबी, आपली भरलेली लिलँड, मर्सिडिज सोडून कपाळावर बांधलेला फेटा झटकावीत बापूसाहेबांच्या वँâटीनकडे जेवणासाठी येत. योगायोगानं वाटेत गाड्या बंद पडणारे ड्रायव्हर्स आणि क्लीनर्स यांनी तर ते हॉटेल भरलेलंच असायचं! ढालगावच्या हॉटेलात चहा, भजी आणि मिसळ यांचीच गिऱ्हाईकं येत; म्हणून बापूसाहेबांनी हे ''हाय-वे वँâटीन'' पेठेच्या नाक्यावर सुरू केलं होतं.

संध्याकाळी ट्रकचा तांडाच्या तांडा बापूसाहेबांच्या हॉटेलसमोर उभारलेला असे. म्हसोबाच्या खिंडीत, दऱ्याखोऱ्यातून तयार होणारी ''रानबा स्पेशल'' नाक्यावर गॅलनवारी खपत होती. दिवसभर फूटबॉलच्या ''इनरी'' भरभरून हातभट्टी येत होती. तिला कोणी ''रानबा स्पेशल'' म्हणत; तर कोणी ''वाळवा स्पेशल'' म्हणत. या दारूचं वैशिष्ट्य असं, तिला हातभट्टीचा उग्र दर्प येत नसे. शिवाय ती घेताना जिभेला लागायची पाण्यासारखी; पण किकला मात्र भारी होती. ''वाळवा स्पेशल'' एक-दोन ग्लास मारून बापूसाहेबांच्या ''हायवे वँâटिन मध्ये'' एक फुल ताट घेतलं की बेंगलोरपासून व्हीलवर बसलेला एखादा सरदारजी लिलँडच्या ड्रायव्हिंग सीटमागच्या बाकड्यावर गडप झोपी जायचा. दुसऱ्या दिवशी परत ''फ्रेश'' होऊन त्याचा ट्रक मुंबईच्या वाटेवर धावू लागे.

केवळ ट्रकवालेच तिथल्या जेवणावर खूष होते अशातला भाग नव्हता; खासगी गाड्याही! संध्याकाळच्या सुमारास त्या त्या रस्त्यावरून निघाल्या की तिथल्या खमंग वासानं ड्रायव्हरचे ब्रेकवर पाय दाबले जात.

बापूसाहेब दिवसभर गावात आणि गावच्या राजकारणात रमत असले तरी बरोबर सात वाजता ते न चुकता आपल्या हायवे कॅन्टीन मध्ये येऊन बसत. ते रात्री साडेअकरा तर कधी बारापर्यंतदेखील बसत!

बापूसाहेब हॉटेलातून परत येईपर्यंत लक्ष्मीबाई त्यांची वाट पाहत जेवायच्या थांबत.

पण आताशी बापूसाहेबांना हॉटेलातून यायला वेळ होऊ लागला. कधी कधी ते परत न येता फक्त निरोप येई आणि लक्ष्मीबाईंना हे कोडं उलगडेना. पण ते लवकरच उलगडलं. बापूसाहेब बाराच्या सुमारास पेठेतल्या नायकवाड्याच्या घरी जातात ही बातमी लक्ष्मीबाईंना समजली आणि मग सारा उलगडा झाला.

नायकवड्याची मुमताज ही पेठेतली एक चीज होती. मुमताजचं मूळ घराणं कलावंतिणीचं अन् तेही खानदानी कलावंत. शे-दोनशे रुपये जरी देऊ केले तरी ती गाण्या-बजावण्याला तयार होत नव्हती. किमान पाचशे रुपये टाकल्याशिवाय ती आपली माडी कुणाला चढू देत नसे. महिन्यातून एकादं गाणं झालं तरी त्या मुमताजला समाधान असे. पण आताशी असे गाणं-बजावण्यासाठी शे-पाचशे रुपये खर्च करणारे फार कोणी शिल्लक नव्हते. घरात बुढ्ढा बाप-दाऊद-दम्यानं बेजार झालेला आणि माँ - फातिमा - डोळ्यांनी अधू झालेली. मुमताजची आर्थिक ओढाताण कमालीची होऊ लागली. कुणाचा तरी आश्रय, कुणाची तरी मदत हवीशी वाटू लागली. पण असा आश्रय आणि मदत देणारा त्या भागात बापूसाहेबांशिवाय दुसरा कोणी असेल असं मुमताजला वाटेना. पण बापूसाहेबांच्यापर्यंत पोहोचायचं कसं हा मोठा प्रश्न होता.

दिवसभर मुमताज माडीच्या खिडकीत बसून विचार करीत होती, "काय करावं, कसं करावं? बापूसाहेब माणूस दिलदार आहे. माझी गरज त्यांना पटली तर नक्कीच ते मदत देतील; पण असे दुसऱ्याकडून पैसे घेऊन तरी चरितार्थ किती दिवस चालवणार?"

मुमताज अशी खिडकीत उभी राहून विचार करीत असतानाच लंगडा ताजुद्दीन खालून निघालेला दिसला. हा ताजू म्हणजे पेठेत कुठंही कुणाच्याही घरी दादा, मामा करीत घुसणाऱ्याच्या जातीचा होता. ज्यावेळी मुमताजची चलती होती, तेव्हा हा ताजू मुमताजच्या माडीवर पडून असायचा. शेठलोकांच्यासाठी पानसुपारी, सिगारेटी आणण्याचं काम हा ताजू तत्परतेनं करी. तसेच काही गाण्याच्या शौकिनांना गाणं ऐकताना मद्य घेण्याची सवय असे. त्यांच्यासाठी सोड्याच्या बाटल्या, शेव, चिवडा, गाठिया अशा वस्तू नाक्यावरून आणण्याचं काम ताजू मोठ्या हौसेने करी. त्या मोबदल्यात शिल्लक राहिलेला एखादा "पेग" जरी मिळाला तरी ताजूच्या श्रमाचा परिहार व्हायचा! काही शौकिन मंडळी मुमताजच्या हातचं सामिष भोजनही मोठ्या आवडीने खात आणि असा एखादा जेवणाचा बेत असला की ताजूला नेमकं बोलावणं जाई. अशा दिवशी ताजूला कितीही वेळा बाहेरची किरकोळ कामे सांगितली तरी तो टाळाटाळ करीत नसे.

पण आताशी मुमताजची आर्थिक घडी बिघडल्यापासून ताजू तिच्याकडे फारसा फिरकत नसे. आज मुमताजला तो अचानक दिसताच तिनं टाळी वाजवून त्याला वर बोलावलं.

"ताजू ऽऽ, मेरा एक काम करेगा?"

"बोलो!"

"बापूसाब को जानता है ना?"

"बापूसाब होटेलवाला?"

"हां ऽ ऽ हां! वोही!"

"क्या उनको बुलाके लाने का?"

"नहीं रे, खाली उनसे...!"

मुमताजला प्रश्न पडला की ताजूकडून काय निरोप द्यावा? क्षणभर ती विचार करून म्हणाली, "ताजू, मुझे पैसे की जरूरत थी!"

"हां ऽ ऽ ऽ अभी समझ मे आया. जाता हूँ- जाता हूँ!" मुमताजला आणखी काहीतरी

सांगायचं होतं, तोवर ताजू लंगडत निघून गेलादेखील!

घोडा छाप सिल्कचा गुडघ्यापर्यंतचा नेहरू शर्ट, शुभ्र तलम धोतर, पायात काळे कुळकुळीत पंपशू घातलेले बापूसाहेब आपल्या हायवे कॅन्टीनमध्ये नुकतेच आले होते. त्यांना पाहून ताजुद्दीन म्हणाला, ''सलाम बापूसाब!''

''रामराम! काय ताजू, काय काम काढलंस?''

''काम है! लेकीन मेरा नहीं है!''

''मग कुणाचं वकीलपत्र घेऊन आलास?''

''वकी ऽ ऽ ल? कैका साब?''

''बरं बोल! कुणाचं काम होतं? कसलं?''

''आपको मुमताज मालूम है?''

''मुमताज? त्या अमीना कलावंतिणीची लेक?''

''हां ऽ ऽ वोही मुमताज! अभी वो बहोत तकलीफ में है बापूसाब!''

''काय झालंय? आजरी-बिजारी आहे की काय?''

''वो बीमार नही. उसके माँ-बाप बीमार रहते हैं हम्मेशा के लिये!''

''बरं, मग?''

''उसको थोडी मदद की जरूरत थी!''

बापूसाहेब मध्येच हसले. केसावरून हात फिरवून म्हणाले, ''अरे, जगात असंख्य माणसं आहेत की ज्यांना पैशाची अत्यंत निकड असते. मी एकटा कुणा-कुणाची म्हणून गरज भागवणार?''

''नहीं, नहीं... वैसा नहीं साब! वो कभी माँगनेवाली औरत नही. परेशान होकर पडी है इसलिये मैं आपके पास आया हूँ!''

''बरं, हे दोनशे घेऊन जा. काही झालं तरी ती मोठी कलाकार आहे म्हणून देतो; पण परत मात्र मागू नको म्हणावं.''

बापूसाहेबांनी दोनशे रुपयांच्या नोटा ताजूच्या हातावर ठेवल्या. ताजू परत सलाम करून निघून गेला.

मुमताज त्याची वाट पाहतच दारात उभी होती. ''क्या हुवा ताजू?'' अधीरतेनं तिनं विचारलं.

''जब मैं जाता हूँ तो काम फत्ते करके आता हूँ मुमताजबी. लो. दो सौ हैं.''

''क्या बोले साब?''

''साब बोले, और कभी जरूरत लगी तो जरूर आना! हूँ ऽऽ!''

ताजू अशी उगीचच थाप ठोकून निघून गेला. मुमताजला ते पैसे महिनाभर पुरले आणि परत गरज उभी राहिलीच. ताजूच्या म्हणण्यावर विश्वास ठेवून मुमताजनं परत बापूसाहेबांना निरोप धाडला; पण यावेळी पैसे येण्याऐवजी स्वत: बापूसाहेबच आले.

मुमताजला यत्किंचितही कल्पना नव्हती की बापूसाहेब असे स्वत: येतील याची. आल्या आल्या त्यांनी नायकवड्याच्या तब्येतीची विचारपूस केली.

मुमताजचा बाप नायकवडी नमाज पडल्यासारखा गुडघे पोटाखाली दुमडून तक्क्यावर डोकं ठेवून हां ऽ ऽ हुं ऽ करीत होता. तिची आई संपूर्ण आंधळी झालेली! तिला कोण आलंय हेदेखील दिसणं शक्य नव्हतं. पण बापूसाहेब तिच्यासमोर उभे राहून म्हणाले, ''हे काय अमिनाबी, पार थकून गेलीस की!''

''क्या करना बाबा, आँखो से दिखता नही. मौतबी आती नहीं!''

"मरण काय असं मागून येतं थोडंच? यायच्या वेळी मात्र ते चुकत नाही! मुमताज कुठं आहे?"

"है उप्पर! तुम इतने बडे होकर भी गाने-बजाने का शौक करते नहीं? हम लोगों ने वैâसे जीना अब?"

बापूसाहेब हसले आणि म्हणाले, "अमिना, अगं, हा धंदा आणि राजकारण यातून गाणं-बजावणं ऐकायला केव्हा सवड मिळणार?"

"बहुत नाम कमाया बेटा, आँखो से दिखता नहीं; लेकीन बार बार सुनती तो हूँ!"

"चालायचं! केवळ पोटासाठी म्हणून जगण्यात काय अर्थ आहे?"

"मुमताज! ए मुमताज" अमिनानं हाक मारली; पण मुमताज खाली आली नाही. बापूसाहेब सरळ वर आले. पांढरी शुभ्र साडी आणि तसलाच ब्लाऊज घातलेली मुमताज त्यांना पाहून उठून उभी राहिली. बऱ्याच वर्षांनी ते आज प्रथमच मुमताजला पाहत होते. तिची उमर आता तिशी ओलांडून पुढं गेली होती; पण चेहरा, बांधा अजूनही इतका सतेज होता की कुणालाही ती वीस-पंचवीस वर्षांची असावी अशी दिसत होती. गुढघ्यापर्यंत लांब आलेली वेणी चाळवीत मुमताज म्हणाली, "बहोत शरम लगती है!"

"कसली?"

"बार बार पैसे माँगने की!"

"पण ताजूकडून तुला एकदा सांगितल्यावरही तू पैसे मागितलेस ते का?"

"क्या कहा था आपने ताजू को?"

"सांगितलं नाही त्यानं तुला?"

"हां ऽ ऽ कहा था... लेकिन...!"

"हे बघ मुमताज, सरळ लग्न करून घेतलं असतंस तर सुखानं संसार केला असतास!"

"और ये माँ-बाप को छोडकर कहाँ जाऊँ ऽ?"

"तेही खरंच आहे म्हणा! गाणं म्हणतेस ना अजून?"

"अभी छे महिने से बंद कर दिया!"

"का?"

त्यावर मुमताज अधिक काही बोलली नाही; पण तिचे डोळे मात्र पाण्यानं डबडबले. बापूसाहेबांना वाटलं, की बायकांची ही नेहमीची सवय आहे- एखादं ढोंग करायचं झालं की अगोदर डोळ्यांत पाणी आणायचं! राजकारणात पडल्यापासून बापूसाहेबांचंही एकेकाळचं हळवं मन आता घट्ट झालं होतं. कुणाच्या भुलथापांना ते सहजासहजी दाद देत नसत. आता या मुमताजच्या डोळ्यांत अश्रू दिसताच त्यांचा तसाच ग्रह झाला.

"हे बघ मुमताज, हा म्हातारा आणि म्हातारी यांच्यासहित तुझा स्वीकार करणारा एक नवरा शोधतो तुझ्यासाठी. खूप ओळखी झाल्या आहेत या हॉटेलमुळं माझ्या इथं. जेवणाला आले की रात्रीची सोय आहे का, म्हणून बेधडक विचारतातही. बरीच पैसेवाली माणसं ओळखीची झाली आहेत. तुझी संमती असेल तर तुझ्याच जातीचा "सल्लामहा" शोधून काढतो, बोल !"

पण मुमताज काहीएक न बोलता निश्चल उभी राहिली. या सूचनेला संमती नाही असं समजून बापूसाहेब खुर्चीवरून उठता उठता म्हणाले, "याउपर तुझी मर्जी. पण असं वेळोवेळी कुणाकडून मागून जीवन जगण्यात अर्थ नाही!"

बापूसाहेब निघून गेले.

त्यानंतर फार तर तास-दोन तास झाले असतील, ताजुद्दीन रडत ओरडत आला. "बापूसाब, चलो चलो, जल्दी करो. मुमताजने टिक-ट्वेंटीकी बोतल खतम कर दी. अब वो एक घंटातक भी जी नहीं सकेगी!"

बापूसाहेब ज्यावेळी धावत आले, तेव्हा मुमताजच्या भोवती दहा-बारा बायका जमल्या होत्या. मुमताजचे डोळे पांढरे पडले होते. बुढ्ढी अमिना ती मेल्यातच जमा धरून गळा काढून रडत होती. म्हातारा नायकवडी आता पुढं काय पाहावं लागणार आहे, या भीतीनं अधिकच धास्तावला होता.

बापूसाहेबांनी तिला तात्काळ तालुक्याच्या दवाखान्याला नेलं. तिथं डॉक्टरनी तिच्या नाकातोंडात रबराच्या नळ्या घालून "स्टमक वॉश" दिला, ग्लुकोज चढवलं, ऑक्सिजन दिला. मध्यरात्र उलटल्यावर मुमताज शुद्धीवर आली. मग चारकोलच्या गोळ्या दिल्या. रात्रभर बापूसाहेब आणि ताजू तिच्या कॉटशेजारी बसून होते.

पहाटेच्या सुमारास डॉक्टरांनी ती धोक्यातून बचावल्याचं सांगताच बापूसाहेबांनी सुटकेचा नि:श्वास सोडला; पण अजूनही त्यांना समजत नव्हतं की तिनं आत्महत्येचा प्रयत्न का करावा?

सकाळी ते ताजूला घेऊन दवाखान्याच्या आवारातून बाहेर आले नि त्याला त्यांनी विचारलं, "ताजू, ते तुझं मुसलमानीत बोलणं बंद कर यापुढं आणि सांग, हिनं असं का केलं?"

"आता मी तरी कसं सांगू साहेब?"

"का?"

"तुमाला सोपानबुवा ठाऊक होता न्हवं?"

"सोपानबुवा?"

"हां ऽ ऽ ऽ सोपानबुवा जाधव. हिला गाणं शिकवायला यायचा तो कराडचा!"

"हां ऽ ऽ ऽ, तो मोटरसायकल ॲक्सिडेंटमध्ये सहा महिन्यांपूर्वी वारला तो?"

"हां ऽ ऽ बघा! तो सोपानबुवा आणि मुमताज यांचं जमलं होतं!"

"काय सांगतोस?"

"माँ कसम! सच कहता हूँ!"

"अरे, सरळ बोल! अस्सं होतं होय? मग माझ्या कसं कानावर आलं नाही?"

"तुम्हाला तुमची जमीन, त्यातली विहीर, राजकारण आणि "हायवे हॉटेल" या व्यापातनं या पेठेत काय चाललंय हे ऐकायला सवड आहे का?"

"हे मात्र खरं. गेल्या दोन-तीन वर्षांत कोणाची भानगडीची चौकशी म्हणून केली नाही. बरं, सोपान जाधवचं आणि हिचं जमलं होतं तर?"

"होय! पण सोपान म्हणायचा, तू धर्म बदल. ती म्हणायची, "माझी तयारी आहे; पण बाप आणि आई जुन्या वळणाची आहेत. धर्म बदलल्याचं समजताच हबक्यानं मरतील. ही भयंकर दुबळी आहे आपल्या आई-बापाच्या बाबतीत! तो म्हातारा एवढा दम्यानं बेजार आहे; पण लवकर काही मरत नाही. म्हातारीचे डोळे गेले; पण खूट वाजलं की कान टवकारते. ह्या बिचारीचे मात्र हाल!"

"अरे, पण इतके दिवस ही गात होती, बैठका करीत होती आणि हे सर्व माहीत असून तो सोपान हिच्या लफड्यात कसा सापडला?"

"कसा नि काय? साहेब, रोज तीन तास हिचा रियाज चालायचा. दोघंही माडीवर. तरणीताठी... जमायला वेळ लागतो होय?"

"अरे, पण त्या सोपानचं लग्न झालंय, मुलंही आहेत वाटतं. मग कशावर भाळली रे ही?"

"त्याच्या गळ्यावर! साहेब, तुम्ही त्याचं गाणं ऐकलंय का नाही मला ठाऊक नाही; पण त्याचं गाणं ऐकायला लागलं की तहानभूक हरायची. ते रेडिओवर भजन लागतं बघा, "इंद्रायणी काठी..." कोण गातं हो ते?"

"अरे, ते भीमसेन जोशी!"

"हां ऽ ऽ अगदी तसा सूर! उगळ निगळ! मेला बिचारा सोपान!"

"पण काय रे, असा कसा मेला तो?"

"ही धर्म बदलायला तयार होत नाही म्हटल्यावर तो तिच्याकडं यायचा बंद झाला. प्यायलाही शिकला; आणि कोयनेच्या पुलावर बेंगलोरला कोणसं मोटारसायकलवरून चाललं होतं त्याच्या आडवा आला. पार डोकं फुटून गेलं!"

"पण काय रे, हिच्या बैठकीला येणाऱ्या इतक्या माणसांपासून ही अगदी "कोरी" राहिली असेल असं वाटतंय तुला?"

"ते आता मी कसं सांगू? काय झालं असलं तर ते माझ्या समोर करणार हे थोडंच? मला आपलं खायला-प्यायला मिळालं. एक वेळ बाहेर पडली की संपलं. मी कशाला जाऊ खोलात? आधीच एक पाय लंगडा!"

"अस्सं आहे तर एकूण?"

बापूसाहेब विचारमग्न झालेले असतानाच समोरून पेठचा हेडकॉन्स्टेबल आला. बापूसाहेबाना सलाम करून म्हणाला, "जिवंत आहे का खलास झाली?"

"का हो?"

"का हो म्हणजे? ती मेली तर सुटली, जिवंत असली तर खटला भरावा लागणार आहे आम्हाला!"

"खटला? आणि तो कशासाठी?"

"बापूसाहेब, माणसांना जसा दुसऱ्याचा जीव घेता येत नाही, तसा स्वत:चाही जीव देता येत नाही!"

"म्हणजे?"

"अहो, आत्महत्येचा प्रयत्न करणे हा पिनल कोडात गुन्ह्याचा प्रकार मानला गेला आहे! आत्महत्येचा प्रयत्न हा गुन्हा होतो; पण तो प्रयत्न यशस्वी झाला तर मात्र गुन्हा होत नाही!"

"ते का?"

"अहो, प्रयत्न यशस्वी झाला तर खटला कुणावर दाखल करायचा? तो माणूस मरूनच गेलेला नसतो का?"

"अरेच्या! असं आहे तर! पण हवालदार, आता यातून मार्ग?"

मग मात्र हवालदार दिलखुलास हसला आणि म्हणाला,

"बापूसाहेब, मार्ग नाही असं कधी होईल का?"

"पण कोणता?"

मग हवालदारानं तो मार्ग बापूसाहेबाच्या कानात सांगितला आणि बापूसाहेब म्हणाले, "पण आता माझ्याजवळ तेवढे नाहीत. पेठंला गेल्यावर देतो-"

"चालेल-चालेल! तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे आमचा. पण जबाबात मात्र काय सांगायचं तेवढं सांगा मुमताजला-"

"हेच ना, घरात औषधाच्या बाटलीशेजारी ढेकूण मारायच्या औषधाची बाटली होती आणि चुकून औषधाऐवजी ते घेतलं गेलं?"

"हां ऽऽऽ, बरोबर! अगदी तस्संच! मग तसा जबाब घेऊनच जातो मी."

"ते बघा, डॉक्टरना विचारा. आता कुठं तिला जरा बरं वाटायला लागलंय. तुम्ही उगाच लांबड लावत बसाल तर आणखी तिला त्रास होईल!"

"ठीक! ठीक! काही वांदा नाही. मी उद्यापर्यंतसुद्धा इथं थांबायला तयार आहे!

0-0-0

आठ

बापूसाहेब आणि मुमताज यांचे संबंध पेठेत किंवा ढालगावात समजायला वेळ लागला नाही. फक्त काहीसं उशिरा कळलं ते लक्ष्मीबाईंना! बऱ्याचजणांना माहीत असूनही ते लक्ष्मीबाईंच्या पर्यंत पोहोचायला वेळ लागला; याचं कारण लक्ष्मीबाई गावातल्या इतर बायकांत सहसा मिसळत नसत आणि जरी त्यांच्याकडं चुकून-माकून येणाऱ्या बायकांना ठाऊक असलंच, तर ते त्या दोघांत निष्कारण बेबनाव होईल म्हणून सांगावंसं वाटलं नसेल.

पण बायका कमालीच्या धूर्त असतात असल्या बाबतीत! बापूसाहेब वेळानं घरी येत तेव्हा प्रथम काही दिवस लक्ष्मीबाईना विशेष असं काही वाटलं नाही. पण नंतर काही दिवस ते बाहेरच मुक्कामाला राहतात असं पाह्यल्यावर मात्र लक्ष्मीबाई त्यांच्या हालचाली काहीशा संशयानं न्याहाळू लागल्या.

डोळ्याला डोळा न भिडवता बापूसाहेब हॉटेलात फार काम असतं अशी तक्रार करू लागले तेव्हा लक्ष्मीबाई म्हणाल्या, "पेठेतच एकादं घर घेतलं तर नाही का चालायचं?"

"ते आणि कशाला?"

"येण्या-जाण्यात वेळ जातो, तो नाही का वाचायचा?"

"असं किती लांब आहे म्हणा!"

"लांब नाही; पण तुम्हाला तिथं मुक्कामाला राह्यला भाग पाडणारं असं कोणतं महत्त्वाचं काम असतं हे निदान मला तरी समजेल!"

"काय म्हणालात?"

"मला काय म्हणायचं होतं ते समजलंय तुम्हाला. उगाच वेड नका पांघरण्याचा प्रयत्न करू!"

"लक्ष्मी, आपल्या घराण्यातल्या बायकांनी असं जादा बोलणं बरं नाही!"

"हो! चांगलं ठाऊक आहे मला. पण वेळ पडल्यास स्वस्थ बसणेही चांगलं नाही अशीही प्रथा आहे आमच्या घराण्याची!"

"तुझ्या घराण्यात असेल; पण आता तुझा तुझ्या घराण्याशी संबंध उरलेला नाही हे लक्षात ठेव!"

"पण असं एकदम एकेरीवर येण्याचं कारण नाही समजलं मला!"

"समजलं, समजलं! तुला तुझ्या इनामदार घराण्याचा एवढा अभिमान होता, तर का माझ्याशी लग्नाला तयार झालीस?"

"आता तुम्हाला भांडणच काढायचं असेल तर खुशाल भांडा; पण माझ्या घराण्याचा उल्लेख करण्याचं कारण नाही!"

"लक्ष्मी, बस्स! जास्त बोलू नको. समजलो मी तुझी पात्रता काय आहे ती!"

"आणि मलाही कळून चुकलंय!"

"काय कळलंय तुला?"

"कळायला जे काय हवं होतं, ते कळलंय. थोडं उशिरा कळलं एवढंच!"

"बरं झालं. मग आता उगीच माझ्याशी तंडत राहू नकोस. आणि भांडायची खुमखुमी असेल, तर मी आता चार-दोन दिवसांनी इकडे येतो, ते आठ-आठ दिवस येणार नाही!"

"नकाच येऊ. मोठी लावण्यवती अप्सरा भेटली आहे ना तुम्हाला? सगळं जग थुंकतंय अशा जागी जाता. लाज वाटायला हवी.

किती झालं तरी बोलून चालून वेश्या ती!"

"लक्ष्मी..." बापूसाहेब ओरडून एकदम पुढं आले आणि त्यांनी लक्ष्मीबाईच्या गालावर फाडकन् मुस्कटात मारली.

लक्ष्मीबाईच्या डोळ्यांत अंगार फुलला. सर्वांग क्रोधानं थरथरू लागलं. गालावर हात ठेवून त्या म्हणाल्या, "मला इथं राहायचं नाही!"

"ठीक आहे. कुठं जायचं असेल तिकडं जाऊ शकतेस तू!"

"इकडं-तिकडं कुठं जायचं कारण नाही मला. माझं माहेर मरेपर्यंत सांभाळायला समर्थ आहे!"

"जा! आत्ताच्या आता तोंड काळं कर. पण लक्षात ठेव, इथून एकदा माझ्याविरुद्ध गेलीस तर परत तोंड बघणार नाही."

"मला तरी तुमचं तोंड बघायची कुठं इच्छा आहे?"

"अस्सं ना? ठीक! पिऱ्या... ए पिऱ्या..."

"जी...!"

"टांगा जुंप आणि बाईसाहेबांना रेठऱ्याला सोडून ये!"

लक्ष्मीबाईंनी जाऊन बाळाला उचलून घेतलं तेव्हा बापूसाहेब पुढं येऊन म्हणाले,

"त्याला कुठं नेतीस?"

"मूल माझं आहे!"

"तसंच ते माझंही आहे!"

"पण घर टाकून जाणाऱ्या आईशी त्याचा संबंध राहत नसतो!"

"घर टाकून जाणाऱ्या बापाशीसुद्धा नसतो. दूर व्हा; नाहीतर डोकं आपटून प्राण देईन इथं तुमच्यासमोर!"

आज लक्ष्मीनं खरोखरच कडकलक्ष्मीचा अवतार धारण केला होता. मग बापूसाहेबानी थोडं नमतं घेतलं. नाहीतरी त्या निघून गेल्यानंतर मुलाची उसाभर करायची कोणी, हा प्रश्न होताच!

लक्ष्मीवैनी इनामदारांच्याकडं आपल्या माहेरी अशा तडकाफडकी आल्याचं पाहून इनामदारांना काहीसं आश्चर्य वाटलं. त्या रात्री त्यांना इनामदारीणबाईच्याकडून सारी हकीगत समजली. तेव्हा ते म्हणाले,

"असं आहे तर एकूण कंत्राट! पण लक्ष्मीनं एवढा त्रास करायचं कारण नव्हतं!"

"ढळढळीत नवरा वाईट चालीच्या बाईच्या नादी लागला तर बायकांनी काय हसत बसावं?"

"हसायलाच पाहिजे असं नाही; स्वस्थ बसावं!"

"चांगलं सांगताय की!"

"नाहीतर काय! बापूसाहेब कर्तबगार माणूस आहे. धंद्यात अफाट पैसा कमावतो. गावात त्याचा शब्द खाली पडू देत नाहीत. सगळी सूत्रं त्याच्या सल्ल्यानं हलतात. आणि अशा माणसानं विरंगुळा म्हणून असा एखादा छंद केला, तर त्याचा एवढा बाऊ करण्याचं काही कारण नाही. तुम्हा अडाणी बायकांना समजायचं नाही ते!"

"तुम्हाला मंजूर आहे म्हणा, मग ते त्यांचं वागणं?"

"अर्थात! कर्तबगार माणसाच्या खासगी जीवनात कुणी अशी लुडबूड केल्याचं मला

आवडत नाही!''

''मग असं करा, आणखी एक-दोन बाजारबसव्या गाठून द्या त्यांना. अहो, लेकीच्या सुखाची जरा तरी चाड बाळगा!''

''सुख! तिला काय कमी पडलं होतं? खायला कमी होतं, का प्यायला कमी होतं? कपड्यालत्त्याची, दागदागिन्याची कधी उणीव भासली होती? पोटाला मूल म्हणावं तर तेही झालेलं आहे. मग उगाच नवऱ्यानं झापड लावलेल्या टांग्याच्या घोड्याप्रमाणं चालत राहावं असं समजणाऱ्या बायकांची कीव करावी नाहीतर काय?''

''तुम्हाला समजायचं नाही ते! बायकांचं दु:ख बायकांनाच ठाऊक ! म्हणजे खायला-प्यायला मिळालं, कपडेलत्ते, दागिने मिळाले की बायकांनी नवऱ्यांना कसंही बेताल वर्तन करू द्यावं?''

''हे बघा, पूर्वीपासूनचा इतिहास आहे. उगाच मला शिकवण्याचा प्रयत्न करू नका. माझ्या दृष्टीनं बापूसाहेब काडीमात्र चुकलेले नाहीत. तुम्हाला काय वाटत असेल ते वाटू दे. त्या पोरीला उगाच प्रोत्साहन देऊन भडकवून ठेवू नका. चार समजुतीच्या गोष्टी सांगा आणि द्या पाठवून---''

''आल्या आल्या आता पाठवू म्हणता?''

''तसं नाही म्हणत मी! आल्यासारखी चार-आठ दिवस राहू द्या. मग सावकाश द्या पाठवून. पण समजूत घाला. असा नवरा हवा असेल तर थोडंसं दुर्लक्ष करायला शीक म्हणावं! एखादा शाळामास्तर किंवा कारकून असता कुठंतरी तरी कशाला पडला असता अशा फंदात?''

''माझ्याजवळ बोललात तेव्हढं पुरे झालं. मेहरबानी करा आणि निदान लक्ष्मीसमोर तरी अशी वायफळ बडबड करीत बसू नका! म्हणे कर्तबगारी!!''

इनामदारीणबाई फणकाऱ्यानं तिथून निघून गेल्या. जाता जाता त्या म्हणाल्या, ''असली कर्तबगारी कधीतरी अंगाशी येईल. चार पैसे मिळाले. हाती सत्ता आली, म्हणजे माणसानं कमरेचं सोडून कधी डोक्याला गुंडाळायचं नसतं!''

इनामदारसाहेब ते बोलणं ऐकून हसत सुटले.

लक्ष्मीला रेठऱ्याला येऊन आता चार महिने होत आले. या मुदतीत बापूसाहेब एकदाही तिकडं फिरकले नाहीत. त्याबरोबरच इनामदारसाहेब आपल्या कन्येला समजावून सांगत असत, ''पुरुषाची जात आहे. उगाच बंधनात ठेवण्याचा प्रयत्न आपण करू नये. ज्याचं त्याला आपण कुठं चुकतो ते कालांतरानं कळत असतं. आपण मन:स्ताप केला की मात्र स्वत:लाच त्रास होतो.''

इनामदारांच्या सल्ल्यामुळं लक्ष्मीबाईची समजूत पटली नसली तरी त्यांनाही आताशी वाटू लागलं की, माहेरी जन्म काढू असं त्या भांडणाच्या वेळी वाटलं खरं; पण ते अशक्य आहे. उलट आपण असे हट्टाला पेटून इकडं राहिलो तर ते अधिकच अनिर्बंध वागू लागतील. डोळ्यांसमोर आपलं मूल सतत दिसत राह्यलं तर कधी ना कधी त्यांना वाटेल, आपण वागतो हे बरं नाही!

असा विचार करून लक्ष्मीबाईंनी बॅग भरली. हा पराभव होता हे खरं; पण तोदेखील एका सद्हेतूनं पत्करलेला. इनामदार स्वत: पोहोचवायला गेले. सुदैवानं बापूसाहेब ढालगावातच होते.

लक्ष्मीबाईना बाळासह परत आल्याचं पाहून त्यांना काहीसं आश्चर्य वाटलं. चार महिन्यांच्या कालावधीनंतर तेही तो प्रसंग विसरले होते. आल्या आल्या त्यांनी बाळाला त्यांच्या

कडेवरून उचलून घेतले. इनामदारसाहेबांना हे अपेक्षित होते. ते गालातल्या गालात हसले.

दोन दिवस राहून ते रेठऱ्याला परतले. या दोन दिवसांत बापूसाहेब रोज अकराच्या आत परत येत होते.

लक्ष्मीबाई आलेल्या रात्रीचा तो प्रसंग-

जेवणं आटोपून दोघंही वर झोपायच्या खोलीत आले होते. बाळ आता जवळ जवळ वर्षाचा झाला होता; तरी अजूनही पाळण्यातच होता. त्याच्या पाळण्यावरची मच्छरदाणी व्यवस्थित करून लक्ष्मीबाई सरळ कॉटवर भिंतीकडं पाठ करून झोपल्या.

बापूसाहेब कॉटवर येऊन बराच वेळ झाला तरी कोणी काही बोलत नव्हतं.

"लक्ष्मी...!"

"...!"

"लक्ष्मी?"

"अं...?"

"राग गेला नाही अजून?"

"...!"

"बोलणार नाहीस?" तिच्या पाठीवरून हळूच हात फिरवीत बापूसाहेब आणखी थोडे पुढे सरकले.

पण लक्ष्मीबाई आणखीन जरा भिंतीकडं सरकल्या.

"लक्ष्मी, अगं, त्या दिवशी मी बोललो ते रागाच्या भरात. आता माझ्या मनात काहीसुद्धी शिल्लक नाही!"

"आणि माझ्यात तरी कुठं आहे? पण तुम्ही फार दुष्ट आहात?" लक्ष्मीबाई पाठ वळवून बापूसाहेबांच्या दंडाला चिमटा काढत म्हणाल्या.

"अरे! अरे! अगं, पण मी असा कोणता दुष्टपणा केला तो सांगशील तरी का नाही?" लक्ष्मीचा चिमटा काढणारा हात कुरवाळत बापूसाहेब म्हणाले.

"चार महिने झाले मला जाऊन. निदान मला नाही, बाळाला बघायला म्हणून तरी यायचं होतं!"

"खरं वाटणार नाही तुला. यावं असं वाटलं; पण विचार केला, मामासाहेब काय म्हणतील? यासाठीच का घराण्यातल्या इतर लोकांचं न ऐकता मुलगी तुम्हाला दिली?"

"अहो, त्यांना काय वाटलं हे आता सांगितलं तर तुम्ही शेफारून जाल!" बापूसाहेबांच्या मांडीवर डोकं टेकवून लक्ष्मीबाई म्हणाल्या.

त्यांच्या केसातून हात फिरवत बापूसाहेबांनी विचारलं, "काय म्हणाले ते?"

"ते सगळं काही सांगत बसत नाही; पण त्यांना तुमचा जरादेखील राग आलेला नाही!"

"खरं सांगतेस की काय?" लक्ष्मीबाईचा गालगुच्चा घेत बापूसाहेब म्हणाले.

"खरंच! माझं वागणंच चुकलं. मी उगीच नको नको ते बोलले!"

"तू नाही, मीच बोललो. लक्ष्मी, अगं, तू माझी पत्नी, माझ्या मुलाची आई. हे जाणूनच मी काय करायचं ते करत होतो. मला माझी जबाबदारी पूर्ण समजत होती. बाहेरख्यालीपणा मला प्रथमपासून मंजूर नव्हता. पण कळत म्हण, अगर नकळत म्हण, माझे आणि तिचे संबंध जमले ही गोष्ट सत्य. पण त्यामुळं तुझ्यावरंच प्रेम तिळाएवढंदेखील कमी झालेलं नाही. विश्वास ठेव माझ्यावर-"

आता बापूसाहेबांनी उशाचा दिवा मालवला. चार महिन्यांच्या प्रदीर्घ विरहानंतरची ती

रात्र कशी सरली हे लक्ष्मीला कळलंदेखील नाही.

असा समेट घडला.

त्यानंतर पुढं दोन दिवसांनी इनामदार परत रेठऱ्याला गेले. बापूसाहेबांनी यापुढं लक्ष्मीबाईशी समझोत्यानं वागायचं ठरवलं होतं असं त्यांच्या वागण्यावरून दिसू लागलं. घरचं जेवण ते चुकवत नव्हते. बाराच्या आत घरी परतू लागले; पण आठवड्यातून एक दिवस-म्हणजे शुक्रवारी ते कुठंतरी बाहेरगावी जात. तेव्हा लक्ष्मीनं विचारण्याआधीच ते म्हणाले,

''हे बघ, परवा एका डॉक्टरांची झाली ओळख-''

''बरं मग?''

''सहज गप्पा मारता मारता ते म्हणाले, तुमचा सुट्टीचा दिवस कोणता?''

''मग?''

''मग काय? मी सुट्टी घेतच नाही म्हणालो. तर त्यावर डॉक्टरानी सांगितले, प्रकृती चांगली राहायची असेल तर आठवड्यातून एक दिवस संपूर्ण विश्रांतीची गरज आहे. तिकडं इंग्लंड-अमेरिकत म्हणे अशी पद्धत आहे आणि त्यामुळे तिथली माणसं आठवडाभर परत दुप्पट वेगाने काम करतात!''

''मग तुम्हीही सुट्टी घेण्याचं ठरवलं आहे तर?''

''हो!''

''साहेब, तुम्हाला काय वाटलं मी आपली खेड्यात जन्मले म्हणून खेडवळच राहिले काय?''

''काय म्हणायचंय तुला?''

''तुम्ही दर शुक्रवारी कुठं जाता नि काय करता हे सर्व मला समजलेलं आहे. उगाच आता मी त्या बाबतीत लक्ष घालायचं नाही, असं ठरवून टाकल्यानं अधिक वाडेचार लावत नाही झालं. तुम्ही दर शुक्रवारी कऱ्हाडला जात असता. तिथं तुम्ही मुमताजला तिच्या आईसमवेत नेऊन ठेवलं आहे. तिला घर घेऊन दिलंय. त्या घरात राहून दीडशे रुपये भाडं येतंय, ते तिच्या खर्चासाठी ती घेत असते. अशी सर्व व्यवस्था बिनबोभाट माझ्या चार महिन्याच्या गैरहजेरीत तुम्ही करून टाकलेली आहे. तेव्हा हे सुट्टी घेणं, डॉक्टरनं सांगितलं वगैरे वगैरे थापेबाजी बंद करून टाका. समजलं?''

बापूसाहेब अवाव्â होऊन त्यांच्याकडं पहात राहिले.

बापूसाहेबांच्या राजकारणात आता राजकारण उरले नव्हते. अशा राजकारणात गंमत नसते, असं प्रत्यक्ष बापूसाहेबांना वाटू लागलं. गावची प्रगती झपाट्यानं चालली होती. ''जो का रंजला गांजला'' त्याला बापूसाहेब आपला म्हणत होते. आताशी बापूसाहेबांच्याविषयी माघारीसुद्धा लोकांना टीका करावी असं वाटत नव्हते. कोणी त्यांना दयावान समजे, तर कोणी त्यांना देवदूताची उपमा देई. गावची खटली कोर्टापर्यंत जायची थांबली.

पूर्वी कुणी कुणाच्या जमिनीत शिरला, अतिक्रमण केलं, की मारामारी व्हायची. कोणी चुकून नांगर मारताना दुसऱ्याच्या हद्दीवर खुणेचा दगड हलला तर डोकी फुटायची. कुणाचे चार पैसे कुणी देणं लागत असेल आणि त्याची मागणी झाली तर एकदम प्रकरण एकेरीवर येऊन झोंबाझोंबीवर प्रकरण जायचं. पण बापूसाहेब सरपंच झाल्यापासून असे घडलेले प्रकार पंचायतीवरच मिटले जाऊ लागले.

वेळ साधारण संध्याकाळची. सहा वाजून गेले होते. बापूसाहेबांना पेठेतल्या हॉटेलवर जायला अद्याप एक तासाचा अवधी होता. इतक्यात पंचायत ऑफिससमोर भीमनगरातला रंगा लिंगाडे आणि सात-आठ नवबौद्ध आले. त्यांनी कसली तरी तक्रार आणली होती.

"बापूसाहेब!" रामराम करून बाहेरूनच रंगा लिंगाडे म्हणाला, "दोन मिनटं भाईर यिता?"

"बाहेर का? तुम्हीच आत या की! ही गाव-पंचायत आहे. इथं कुणालाही यायची परवानगी आहे. बोल रंगा, काय भानगड आहे?"

"भानगड म्हणजे आमच्या आपसा-आपातलंच प्रकरण आहे. हा कृष्णा कांबळे!"

"ठाऊक आहे मला. याचा पोरगा तालमीत जातो. चांगला खेळतो कुस्ती."

"हा बघा, त्यानं आता कुस्ती बंद केलीय. घरात म्हातारा एकटा आणि त्याची आई दोघंच आहेत. दोन एकर "म्हारकी" जमीन होती तोवर कसंतरी भागत होतं; पण ती तळ्यात बुडाली. नुकसानभरपाई मिळाली ती वर्षभरदेखील पुरली नाही. पोर व्यायाम करत होतं म्हणून माझ्यासारखी चार माणसं दहा-पाच रुपये महिन्याला पट्टी काढून खुराक देत होती. पण आता सगळेच या महागाईनं तंग झालेत. या कृष्णाच्या पोरानं-सोमानं-कुस्तीही सोडली. कुठं रोजगार मिळाला तर करतो. आता माझी लेक यशोदा - तुम्ही बघितली आहे."

"हो, हो, पाह्यली आहे. पण अजून तिचं लग्न केलं नाहीस?"

"थांबा तरी! त्या लग्नाच्या प्रकरणापासून हे लफडं निर्माण झालंय."

रंगराव आपल्या शहरी संस्कारामुळं बापूसाहेबांशी इतक्या स्वच्छ भाषेत बोलत होता. सोबत आलेले नवबौद्ध त्या दोघांच्याकडे फक्त पाहत होते.

"बरं, मग लग्नावरून काय झालं म्हणतोस?"

"माझी यशोदा मी या कृष्णाच्या सोमाला द्यायची असं ठरवलं. मुलीला मुलगा पसंत आहे. मुलाला मुलगी पसंत आहे. आमची पोरगी जास्त म्हणजे सातवीपर्यंत शिकलीय. त्यानं सातवीतनं शाळा सोडली. पण म्हटलं, असेना का! एकमेकांचा एकमेकांवर जीव जडल्याची मला कुणकुण लागली. प्रथम जरा वाईट वाटलं; कारण लेकीला चांगलं शिकवलं-सवरलं मास्तर, क्लार्क बघून द्यावा ही इच्छा होती. कुणीही नाचत करून घेईल असं रूप आहे तिचं! पण करणार काय? मला समजायच्या आधीच मनं एक झालेली!"

"बरं, मग आता अडचण कसली आलीय त्यात?"

"सांगतो की - सुदाम माहीत आहे नव्हं?"

"सुदाम? सुदाम? हां ऽ ऽ तो गाणारा, नाचणारा, लोकनाट्यवाला!"

"हां ऽ त्योच बघा! भीमनगरात नवीन दुमजली घर बांधलंय. जमीन चार एकर खरेदी घेतलीय. चार पैसे खुळखुळताहेत. तो म्हणतो, यशोदाचं लग्न दुसऱ्याशी होऊ देणार नाही. झालं तर माझ्याशीच!"

"ते का?"

"पैशाची मस्ती! हिजड्यावानी तमाशात नाचतो म्हणून काय माझ्या लेकीनं त्याला पसंत करावा?"

"असं आहे तर!"

"एवढंच नव्हे, तर भर मांडवातून तिला पळवून न्यायची धमकी देतो आहे!"

"अरेच्चा! एवढा पुढं गेलाय?"

"हे बघा बापूसाहेब, कुठले कुठले टगे जमा करून आणले आहेत त्यानं. त्या म्हसोबाच्या खिंडीतला रानबा रामोशीदेखील एक-दोन वेळा त्याच्या घरात बघितल्याय लोकांनी. तुम्ही याच्यात लक्ष घाला; नाही तर मी डी. एस. पी. ला अर्ज देणार आणि पोलीस बंदोबस्तात लग्न करणार!"

हसून बापूसाहेब म्हणाले, "इतका पुढं जाईल याची कल्पना नव्हती रे मला!"

"तुम्ही त्याचं कौतुक केलं, पाठीवर थाप दिली त्यापासून तो अधिकच शेफारलाय !"

"लग्नाची तिथी निश्चित झाली का?"

"हो! येत्या वैशाखात!"

"म्हणजे अजून दीड-दोन महिने अवकाश आहे. तू अर्जबिर्ज काही देऊ नकोस. मी त्याला बोलावून घेतो आणि समजावून सांगतो. मग तरी झालं?"

"पण त्याचा बंदोबस्त पुरा व्हायला पाहिजे. नाही तर उद्या लग्न लागल्यावर सूडबुद्धीनं माझ्या जावयाला आणि लेकीला त्रास द्यायला लागला तर मग काय खरं नाही!"

"तू ती चिंता करू नकोस! मी त्याची समजूत पटवतो. तो काहीही त्रास देणार नाही!"

"बघा हं, नालायक आहे ते कार्ट! मला म्हणतो कसा, लग्न झाल्यावर सोम्या तिला बारा तास पिंजऱ्यात कोंडून ठेवणार आहे काय?"

"असं? ही तरणी पोरं खरंच डोकं भडकल्यासारखी वागतात कधी कधी. पण तू चिंता करू नकोस. मी त्या रानबालाही बोलावून घेतो!"

रंगा आणि त्याच्याबरोबर आलेले त्याचे जातभाई परतले.

0-0-0

नऊ

भीमनगरात सोमा आणि यशोदाच्या लग्नाला खुद्द बापूसाहेब आणि लक्ष्मीबाई उपस्थित होते. पंचायतीचे इतर सदस्य, रंगाच्या ओळखीची काही जहागीरदार मंडळीही खास लग्नासाठी आली होती. कारण रंगा अजूनही त्या सत्याची पेन्शन खात होता. संस्थानं विलीन झाली असली तरी संस्थानिकांची दानत विलीन झाली नव्हती. ज्यांनी इमाने-इतबारे आपली सेवाचाकरी केली, त्यांच्या कार्याला काहीशी मदत, बाहेर पाठवायला संस्थानिक विसरले नव्हते. त्यांनी आपल्या खासगी कारभाऱ्यामार्फत पाचशे रुपये रंगाला पाठवले होते.

लग्नसमारंभ मोठ्या थाटात पार पडला. हरिजनवाड्यात आजवर इतकं थाटामाटात कोणाचं लग्न झालं नव्हतं; अशी बडीबडी माणसं जमली नव्हती. सुदाम सोडून सर्व भीमनगर त्या कार्याला उपस्थित होतं. हे कार्य व्यवस्थित पार पाडल्याबद्दल रंगानं बापूसाहेबांच्या पायावर डोकं ठेवून म्हटलं, "बापूसाहेब, फार उपकार झाले गरिबावर. केवळ तुम्ही होता म्हणून हे लग्न निर्विघ्न पार पडलं-" बापूसाहेबांच्या समवेत वधू-वरांचं टिपलेलं छायाचित्र रंगानं आपल्या घरात दर्शनी भागातच प्रâेम करून लावलं.

भीमनगरातली ही सुस्वरूप हरिजन-कन्या सोमा कांबळेची वधू झाली. सुदाम सूडबुद्धीनं काही लफडी करतोय की काय, याकडं बापूसाहेबांचं अगदी बारकाईनं लक्ष होतं. रंगा लग्नाआधी येऊन गेल्यानंतर बापूसाहेबांनी रानबाला बोलावून घेतलं होतं आणि त्याला चांगलाच दम भरला होता आणि रानबानं खिडकीतल्या म्हसोबाची आण घेऊन सांगितलं होतं, "आपण सुदामाच्या बाजूनं हे लग्न मोडेल असं काही करणार नाही!" आणि खरोखरच रानबानं आपण दिलेला शब्द तंतोतंत पालन केला होता.

सोमाचं लग्न होऊन उणेपुरे चार महिने होतात न होतात, तोच रंगा लिंगाडे बापूसाहेबांकडं रडत आला.

"काय रे? परत काय झालं?"

"काय होणार? तो सुदाम आलाय भीमनगरात!"

"आला असेल?"

"कामधंदा सोडून दिलाय. दाढी वाढवलीय त्यानं आणि म्हणतो,"म्हणे यशोदेला उचलून नेईन तेव्हाच दाढी काढीन! आता सोमा माझा जावई झाला आहे. पैलवान गडी. अर्ध्या डोक्याचा. त्याला हे समजलं आणि रागाच्या भरात जाऊन डोक्यात कुऱ्हाड घातली तर काय करू? कुठं निस्तरत बसू?"

"खरं आहे तुझं! मी बोलावलंय म्हणून निरोप दे त्या सुदामाला. बघू, सामोपचारानं ऐकला तर ठीक!"

संध्याकाळी बापूसाहेबांना भेटायला सुदाम पेठंवर हॉटेलात गेला. बापूसाहेब

हॉटेलसमोर वेताच्या खुर्चीवर बसले होते. दारात एक लांबसडक शेव्हरोलेट गाडी उभी होती. त्यातली माणसं बापूसाहेबांसमोर बोलत बसली होती. त्यातले एक होते सिनेमा-दिग्दर्शक, एक होते निर्माते आणि तिसरे स्टोरी-रायटर. सुदाम आलेला पाहताच बापूसाहेब त्या लोकांना उद्देशून म्हणाले, ''तुम्हाला नवीन कथानक हवं असेल तर या आमच्या सुदाम कांबळेला विचारा. या भागातल्या बऱ्याच भानगडीची याला माहिती आहे! काय रे सुदाम, यांच्या चित्रपटाला एखादी झक्कपैकी गोष्ट हवी. सांग एखादी, मग हे साहेब लिहून काढतील.''

सुदामा त्या सर्वांना नमस्कार करून हसून अदबीनं बाजूला उभा होता. तेव्हा निर्माते म्हणाले, ''प्लीज सीट डाऊन यंग मॅन. बिला, डु यू नॉट थिंक, दॅट धिस यंग चॅप हॅज ब्यूटिफुल पर्सनॅलिटी?''

''यस सर्टनली! दॅटस वॉट आय वॉज थिंकिंग?''

''नाव काय म्हणालात तुमचं?''

''सुदाम कांबळे!''

''आमच्या गावचाच आहे. गातो चांगला. भजनं म्हणतो सोंगाची. तमाशातही सोंगाड्याचं काम करीत होता. चार पैसेही कमावून बसला आहे!'' बापूसाहेबांनी मोजक्या शब्दांत सुदामाची ओळख करून दिली.

''बापूसाहेब, हा आमच्या कंपनीत येतो का विचारा. आम्ही त्याला सिनेमात घेऊ. याच्या दहा वर्षांच्या तमाशातल्या कमाईपेक्षा एका वर्षात सिनेमात तो अधिक कमावेल!''

''ते खरं; पण एका नाजूक प्रकरणामुळं तो थोडासा निराश झालेला आहे!'' बापूसाहेबांनी परत यशोदाच्या लग्नप्रकरणाचा वृत्तांत सांगितला.

त्यावर बिलीमोरिया मोठ्यानं हसून म्हणाले, ''अरे यार, छोड दो! पोरी काय सुंदर असतात, ते मुंबईला चला म्हणजे बघायला मिळेल! एकापेक्षा एक खुबसूरत! जरा तुझं नाव तर होऊ दे. आणि त्यात तुला अभिनयाची आवड आहे म्हणजे ते होणारच! मग पोरींचा तांडा तुझ्यामागे लागेल! मग आज तरी डोक्यात काय असेल ते सगळं काढून टाक!''

इतक्यात बापूसाहेबांच्या नोकरानं ''हायवे''च्या माडीवरून सांगितलं, ''साहेब, तयारी झालीय!''

सर्व मंडळी उठली, तेव्हा सुदाम बाहेरच थांबला. त्याच्या पाठीवर हात ठेवून बिलीमोरिया म्हणाले, ''काम ऑन यंग मॅन. डोन्ट बी नर्व्हस. वुई वुईल मेक यू ऑल फर्गेट!''

''हायवे''च्या माडीवर एक खास खोली होती, ती बड्या गिऱ्हाईकांच्यासाठी. सन्मायकाचे फिक्कट निळसर टेबल, तसल्याच खुर्च्या आणि बाजूच्या भिंतीवर उमर खय्यामचे मद्याची सुरई एका हातात व दुसरा हात अर्धनग्न युवतीच्या कमरेभोवती असे चित्र होते. खोलीत दिवाही मंद निळ्या रंगाचा. सुदाम इतकी वर्षे पेठेला येत होता; पण बापूसाहेबांच्या या हॉटेलात अशी एखादी आलिशान खोली असेल याची त्याला कल्पना नव्हती.

सुदामला हाताला धरून शेजारच्या खुर्चीवर बसवून बिलीमोरिया आपल्या ''स्टोरी-रायटर'' ना म्हणाले, ''भैय्या, मी मघाशी वर येण्यापूर्वी या गृहस्थाला काय सांगत होतो?''

''डोक्यात काय असेल-नसेल, ते सगळं काढून टाक.'' स्टोरीरायटर आठवण करून देत म्हणाले.

''हां ऽ ऽ ऽ ! बरोबर.'' आणि ते जात नसेल तर घालवण्याचं औषध आमच्याजवळ आहे. असं म्हणून त्यांनी आपल्या हँड बॅगेतून स्कॉच व्हिस्कीची बाटली काढून तिचं सील खोललं. टेबलावरच्या ग्लासात पेग भरले. सुदामासाठीही ग्लास भरला तेव्हा तो हात जोडून विनयानं म्हणाला, ''साहेब, मला नको. मी कधी घेत नाही!''

त्याचं काही एक न ऐकता बिलीमोरिया म्हणाले, "कसली ही तुम्ही वारणाकाठची माणसं? हे मालक बापूसाहेब, एवढ्या वेळ आग्रह केला तरी घेत नाहीत, तूही घेत नाहीस. तुम्ही लोकांनी सरकारची दारूबंदी यशस्वी करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे की काय?"

"तसं काही नाही; पण...!"

"चल घे-" ग्लास त्याच्यासमोर धरून बिलीमोरिया म्हणाले, "तुझ्या डोळ्यांतील निराशा एका घोटातच विरघळून जाईल, अरे, यू आर यंग. यू मस्ट ड्रिंक इट ॲन्ड बी हॅपी !" साला, दुनियेत आहे काय? मेलं की संपला! कम ऑन... चिअर्स-"

मग सुदामला इतका वेळ हातात धरून ठेवलेला ग्लास ओठाला लावावाच लागला.

दुसऱ्या महिन्यात "रसभंग" मध्ये बातमी आली होती, "के. सुदाम एस. बिलीमोरिया यांच्या चित्रपटात महत्त्वाची भूमिका करणार!"

बापूसाहेबांना सुदामाची समजूत काढावी लागली नाही; ती आपोआपच निघाली.

अशा रीतीनं सुदाम प्रकरणावर एकदाचा पडदा पडला. रंगानं सुटकेचा नि:श्वास सोडला. पण दुर्दैव जणू त्याच्या मागेच लागलं होतं.

लग्न झाल्यानं वास्तविक पाहता सरळ कामधंदा करून पोट भरून खावं हे सोडून सोमाला मधूनमधून कुस्त्या बघण्याची लहर यायची. कुठंही कुस्त्याचा फड असला की सोमा आपली भाकरी बांधून दोस्तांसमवेत जायचा. यशोदाही त्याला आवरू शकत नव्हती. ढेबेवाडीच्या जत्रेला सोमा गेला असताना दोस्तांनी त्याची चेष्टा केली, "सोम्या लेका, आता कुस्त्या कसल्या बघतो नुसत्या ?"

"का रे, बघू नये का त्यानं ? - दुसरा.

"त्यानं आता मैदानातली कुस्ती बघून काय उपेग? - तिसरा.

"तेनं आता निस्ती हातरुणातली कुस्ती खेळावी!" - चौथा. त्यावर सगळेजण खो खो हसत सुटले.

सोमा म्हणाला, "बेट्यांनो, लग्न झालं म्हणून कुस्ती बघू नये, असं कुठल्या शास्त्रात सांगितलंय? लग्न होऊनसुद्धा कुस्त्या खेळणारे लोक नाहीत?"

"लेका, काय तरी गाडवावानी बोलू नगं. लगीन झालं का पैलवानकी संपली!"

"तुला बगायचं हाय का?" सोमा इरेला पेटून म्हणाला.

"काय, धरणार कुस्ती?"

"हो! हो!" उठून उभं राहून शड्डू ठोकून सोमा म्हणाला.

आणि बघता बघता त्यानं अंगावरचे कपडे उतरले. फक्त लंगोटावर तो उभा पाहून एकानं आपली लांग त्याला दिली, ती चढवून तो दोस्तांच्या समोर उभं राहून म्हणाला, "काढा जोड मला!"

मैदानात कुस्त्या सुरू होत्या. पंच फिरत होते. नवीन नवीन जोड्या पैलवानांच्या आकारांप्रमाणं शोधत होते. इच्छुक पैलवान लांगा कसून शड्डू ठोकीत आपण झुंजायला तयार असल्याची ग्वाही देत उभे होते. पंचानी सोम्याला हाताला धरून मैदानात आणलं. त्याला योग्य अशी जोड ते भोवतालच्या पैलवानांतून शोधू लागले आणि शेवटी बार्शीच्या एका तरुणानं सोमाशी लढायचं आव्हान स्वीकारलं.

प्रथम काही मिनिटं खडाखडी झाली. बार्शीचा पैलवान ताकदवान होता; पण डावपेचात सोमा तयार असल्याचं दिसत होतं. बराच वेळ कोणी कोणाला दाद देत नव्हतं; पण अचानक सोमानं छडी टांग मारल्यानं बार्शीकर कोलमडला आणि सोमानं चित्त्याच्या चपळाईनं त्याच्या पाठीला विळखा घालून त्याला खाली घेतलं. "सवारी" करून तो त्याची पाठ

जमिनीला लावण्याचा प्रयत्न करू लागला; पण हात आणि पाय ताणवून बार्शीकर बसल्या जागचा हलता हलेना. त्यानं ओळखलं होतं की हा ढालगावकर डावपेचात तयार आहे. चटकन् संधी साधून हा एखादा डाव करून आपणाला लोळवणार. बराच वेळ सोमा खटपट करीत होता. त्याचे मित्र ओरडून त्याला प्रोत्साहन देत होते. सोमाला स्फुरण चढत होतं. त्यानं बार्शीकरला "घुटना" देऊन त्याची दमछाक करण्याचा प्रयत्न केला आणि त्याच वेळी एकदम हिसडा देऊन सोमाचा पाय पकडून त्याला बार्शीकरनं खाली खेचला. सोमानं पाय सोडवण्याचा प्रयत्न केला; पण बार्शीकरानं इतका वेळ आपणाला हैराण करणाऱ्या सोमाचा पाय मगरमिठीसारखा घट्ट धरून ठेवला होता. सोमा धडपडत होता आणि त्याच वेळी कटदिशी आवाज आला आणि सोमा ओरडला. पंच पुढं धावले. सोमाचा उजवा पाय वाटीतून निखळला होता. कुस्ती तात्काळ सोडवण्यात आली. सोमाचे दोस्त धावतच मैदानात आले. त्यांनी त्याला उचलून मैदानाबाहेर नेले. एकानं पायावर मसाज करण्याचा प्रयत्न केला; पण सोमाला असह्य यातना होत होत्या.

मिरजेला नेऊन सोमाच्या पायावर प्लॅस्टर बांधण्यात आलं. तीन महिन्यांचं प्लॅस्टर आणि त्यानंतरदेखील सोमाला अवजड असं काम करता येणार नाही असं डॉक्टरनी बजावलं. यशोदा त्याच्या सेवेला दीड महिना मिरजेला राहिली. रंगाही येत-जात होता. खुद्द बापूसाहेब पाच-सहा वेळा येऊन चौकशी करून गेला. दोन महिन्यानंतर प्लॅस्टर सोडेपर्यंत सोमाला गावी घेऊन जायला परवानगी देण्यात आली.सोमाला गावाला आणलं त्या रात्री सुदाम मुंबईहून आला होता. त्याच्यात एकदम विलक्षण फरक पडला होता. यावेळी तो येताना "होंडा" मोटारसायकल घेऊन आला होता. "स्टेट एक्सपे्रस" शिवाय सिगारेट ओढत नव्हता. बोलताना एकसारखा "आयला, साला, वैताग, फिरकी" असे खास मुंबईच्या बोलीभाषेतले शब्द वापरत होता. सुदाम आल्याचं रंगाला कळलं, तेव्हा तो म्हणाला, "येऊ दे बिचारा. पैसा त्याच्यामागे धावतो आहे!" अन् योगायोग असा विलक्षण की त्याच वेळी रंगाला "आढळायला" सुदाम आला.

"रामराम रंगामामा!"

"रामराम! ये, केव्हा आलास?"

"रात्रीच आलो. पण साला, हे सोमानं काय लफडा करून घेतला?" सिगारेट शिलगावून तो म्हणाला.

"चालायचंच! कुस्ती खेळायला गेला सराव मोडलेला असताना आणि पाय निखळला गुडघ्यातून!"

"आयला ! कुस्ती खेळायला कुणी सांगितलं त्याला?"

"कुणी नि काय?"

"यशोदा कुठं आहे?"

"आहे पलीकडं. त्याला चार-दोन दिवसाला गरम पाण्यानं स्पंज करावं लागतं. पायामुळं आंघोळ करता येत नाही."

"रंगामामा, मी आलो होतो एवढ्यासाठी की, या सोमाच्या पाय मोडण्यात तुमचा बराच खर्च झाला आणि अजूनही तुम्ही पैशाच्या अडचणीत आहे असं समजतंय. तेव्हा जी काय गरज लागेल, ती द्यायला मी समर्थ आहे. आता तुमच्या पायाच्या पुण्याईनं चांगला पैसा मिळतो आहे मला!"

"सुदाम, तुझ्या सदिच्छेबद्दल आभारी आहे मी! मला पैशाची कितीही गरज लागली तरी तुझ्याकडून घेता येत नाही मला!"

"रंगमामा, अहो, यशोदा माझ्या नशिबी नव्हती. ती जिथं असेल तिथं सुखी राहावी एवढीच माझी इच्छा आहे. मी आलो इथंपर्यंत, याचा गैरसमज करून घेऊ नका!"

"गैरसमज माझा होणार नाही सुदाम, तो सोमाचा होईल; साऱ्या जगाचा होईल!"

"मग नाईलाज आहे माझा! पण काही गरज लागली तर माझी आठवण राहू द्या!" यशोदाला किंवा सोमाला न भेटताच सुदाम निघून गेला. दुसऱ्या दिवशी तो परत मुंबईला गेल्याचे समजले.

सोमाच्या पायाचे प्लॅस्टर तीन महिन्यांनंतर काढण्यात आले. पाय बसला होता; पण किंचित् तिरका! आता सोमाला आयुष्यात कुस्ती खेळता येणार नव्हती किंवा जोरात धावतादेखील येणार-नव्हतं. शारीरिक कष्टाची हलकीसलकी कामं करण्यासारखी होती; पण अशी हलकीसलकी कामं करण्यासाठी त्याला संबंध दिवसाची मजुरी कोण देणार, हा प्रश्न होता.पण तो सुदैवानं सुटला.

बापूसाहेबांनी सोमाला आपल्या शेतावर राखणदार म्हणून नेमून घेतला. महिन्याला दीडशे रुपये पगार; पण सोमानं रात्रं-दिवस तिथंच रहायचं! सोमा तिथं राहिल्यानंतर बापूसाहेबांनी जनावरांसाठी एक शेड उभी केली. हॉटेलला लागणारं दूध विकत घेण्यापेक्षा चार जाफराबादी म्हशी घेऊन घरचंच दूध निर्माण करण्याची योजना त्यांना सुचली. ती सोमा रानात राहायला लागल्यापासून.

यशोदा सोमाचं जेवण घेऊन रानात जायची.

बापूसाहेबांनी तीन वेळा काढलेल्या विहिरीचे खड्डे बुजवून टाकलेले होते; पण चौथ्यांदा काढलेला विहिरीचा खड्डा मात्र अद्याप तसाच होता. या कोरड्या विहिरीजवळच जनावरांसाठी शेड उभी करण्यात आली होती.

रानात सोमा राहात होता; पण त्याच्या मदतीला पिरा धनगरही जाऊन-येऊन होता. हा पिरा धनगर बापूसाहेबांच्या खास विश्वासातला. पिराचं वय पन्नास-एकावन्न; पण या पिरानं लग्न केलेलं नव्हतं, बरं; लग्न न करण्यासारखं एखादं सबळ कारणही त्याच्याजवळ नव्हतं. एखाद्या उदात्त हेतूनं आजन्म ब्रह्मचर्याचं पालन करावं, अशी प्रगल्भ बुद्धिमत्ताही त्याच्याजवळ नव्हती. त्यानं आपलं सर्वस्व बापूसाहेबांच्या सेवेला वाह्यलं होतं हे मात्र उघड सत्य होतं. ज्यावेळी लक्ष्मीबाई त्राग्यानं माहेरी निघून गेल्या होत्या, तेव्हा बापूसाहेबांचं जेवणदेखील पिराच बनवायचा. बापूसाहेब पिराला नोकरासारखा कधीच वागवत नव्हते. तो त्यांच्या कुटुंबीयांपैकीच एक होता. त्याला जगात एकच व्यक्ती जिव्हाळ्याची होती आणि ती म्हणजे बापूसाहेब! या बापूसाहेबांच्या साठी कोणत्याही त्यागाला तो तत्परतेने तयार असे. सोमा आणि पिरा याच्या देखरेखीखाली बापूसाहेबांच्या जाफराबादी म्हशी चांगल्याच आकार धरू लागल्या. कडबा तोडून त्याचे बारीक-बारीक तुकडे करणे, सरकी-पेंडेचे अंबोण तयार करून वेळच्या वेळी जनावरांपुढे ठेवणं ही कामं सोमा करीत असे; तर सातवांच्या विहिरीवरून जनावरांसाठी कावडीनं पाणी आणण्याचं काम पिरानं आपल्यावर घेतलं होतं. कारण सोमाला अधू झाल्यापासून ओझं उचलता येत नव्हतं!

असे दिवस सुरळीत चालले होते आणि अचानक गेल्या शुक्रवारी मध्यरात्री कुणी चोरट्यांनी बापूसाहेबांच्या जाफराबादी म्हशी चोरून नेण्याचा प्रयत्न करीत असता सोमाला जाग आली आणि तो बाहेर गेला. चोरट्यांशी त्याची झटापट झाली आाणि झटापटीत चोरट्यांनी त्याची गर्दन साफ छाटून टाकली. कोरड्या विहिरीच्या तळाशी त्याची तुटलेलली गर्दन रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. सोमाचे आई, वडील, रंगा लिंगाडे आाणि चार महिन्याची "पोटुशी" असलेली यशोदा धाय मोकलून हंबरडे फोडत होते. त्यांचं दु:ख पाहून

भीमनगरातील लहानापासून थोरापर्यंत सर्वजण शोकाकुल होऊन अश्रू ढाळत होते.

0-0-0

दहा

सकाळी सहाच्या सुमारास ढालगावच्या पोलीस औटपोस्टसमोर बापूसाहेब मोठमोठ्यानं हाका मारीत होते. "हवालदार, अहो हवालदार, उठा, उठा. मी सरपंच बापूसाहेब आलोय. फिर्याद दाखल करायची आहे!" औटपोस्ट ऑफिसला आतून लावलेली कडी खळकन् निघाली. हेडकॉन्स्टेबल लक्ष्मण बाळा देसाई यांनी येऊन दार उघडलं आणि बापूसाहेबांना सलाम करून विचारलं, "तुम्ही कसली फिर्याद देता?"

"अहो, चेष्टेचा विषय नाही हवालदार. माझा गडी सोमा कांबळे याचा शेतात कुणीतरी अज्ञात चोरट्यांनी खून केला आहे- खून!"

"खू ऽ ऽ न?" "होय! भयंकर निर्घृण खून! सोमाचं शिर धडावेगळं झालं आहे. धड काठावर आहे आणि शिर विहिरीच्या आत पडलंय बघा!"

"पण विहीर नाही ना शेतात तुमच्या?"

"विहीर नाही हे खरं; पण विहिरीसाठी खोदलं होतं ना, त्या ठिकाणी हा भीषण प्रकार घडला आहे-" हवालदारांनी लगेच स्टेशन डायरीत "एन्ट्री" केली. कॉन्स्टेबल जयसिंग पाटील रात्रभर नाईट राऊंड करून उशिरा येऊन झोपला होता. त्याला उठवला आणि तात्काळ दुसऱ्या हेडकॉन्स्टेबलला बोलावून घेऊन त्याच्याकडे डायरीचा चार्ज दिला आणि वरिष्ठांकडे एक्सप्रेस रिपोर्ट पाठवून हवालदार बापूसाहेबांच्या सोबत कमता नावाच्या त्याच्या जमिनीकडं निघाले. जाता जाता हवालदार विचारत होते, "तुम्हाला केव्हा कळलं?" "मी काल मुक्कामाला कऱ्हाडला होतो. तिथं येऊन मला पिरा धनगरानं वर्दी दिली."

"पण त्या पिराला इथल्या इथं औटपोस्टावर येऊन अगोदर कळवता आलं नसतं?"

"आलं असतं; पण तो भयंकर घाबरून गेला होता. मला प्रथम सांगावं म्हणून कऱ्हाडला आला तो! त्यानं सांगताच टॅक्सी करून मी लगेच इकडं आलो."

"चोरट्यांनी खून केला हे कशावरून म्हणता?"

"गोठ्यातल्या दोन म्हशींची दावणं कापलेली आहे. म्हशी अजून सुटलेल्याच आहेत!"

"पिरा धनगर त्या वेळी कुठं होता?"

"तोही वस्तीला छपरातच होता; पण आरडबोंब ऐकून तो पुढं गेला नाही. शिवाय चोरटे सात-आठजण असावेत, असा अंदाज करून जिवाच्या भीतीनं तो पुढं गेला नाही,

झालं!''

''ते बरं झालं; नाहीतर त्याचाही खून व्हायचा!''

''नक्कीच तसं झालं असतं हवालदार. पण फार वाईट गोष्ट झाली हो! आता कुठ बिचाऱ्याचं थोडं सुरळीत चाललं होतं!''

''सोमा कांबळे म्हणजे त्या रंगा लिगाड्याचा जावई नव्हे काय?''

''होय! होय! तोच.''

''तुम्ही पुढाकार घेऊन लग्न केलंत तो?''

''होय हो! तोच सोमा. कृष्णा कांबळ्याचा मुलगा!''

''तो ढेबेवाडीच्या जत्रेत कुस्ती धरायला उतरला तेव्हा पाय मोडून घेतला होता तोच की! अरेरे ! पण पोरगा चांगला नेटका दिसत होता की हो बापूसाहेब !''

''तर काय हो! चांगला धड असता तर चार-पाचजणांना लोळवलं असतं त्यानं; पण पायानं अधू होता.''

बोलता बोलता ते बापूसाहेबांच्या कमता नावाच्या शेतापर्यंत आले. शेतावर एव्हाना चिक्कार गर्दी जमली होती. ढालगावचा हरिजन वाडा - ज्याला भीमनगर म्हणत तो - झाडून जमला होता. सोमाच्या प्रेतावर धोतर झाकून ठेवलं होतं आणि बाजूला सोमाचा बाप कृष्णा, आई चंद्रा, सासरा रंगा लिंगाडे आणि चार महिन्यांची गरोदर पत्नी यशोदा आक्रोश करीत बसले होते. हवालदार आणि बापूसाहेब आलेले पाहताच त्या लगतच्या नातेवाईकांनी पुन्हा मोठमोठ्याने आक्रोश करायला प्रारंभ केला. बापूसाहेब त्यांचं सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होते. पण ते जसे सांत्वन करीत, समजुतीच्या चार गोष्टी सांगत, तसे ते लोक अधिकच शोक करीत होते. त्यांचं दु:ख पाहून तिथं जमलेल्या अनेक इतर गावकऱ्यांनाही गहिवरून येत होतं.

हवालदारामागून दोन कॉन्स्टेबल्सही तिथं आले. त्यांनी प्रथम शेताजवळची ती गर्दी हटवली आणि बापूसाहेबांच्या जवळ येऊन अदबीनं म्हणाले, ''फौजदारसाहेब निघाले आहेत; सोबत इन्स्पेक्टरसाहेबही येत आहेत!''

''ठीक! मी तर म्हणत होतो डी. एस्. पी. साहेबांनी येऊन समक्ष पाहणी करून बघितली असती तर बरं झालं असतं नाही का! काही झालं तरी खुनी चोरट्यांचा सुगावा हा लागायलाच हवा! माझा तरणाताठा गडी मारला गेला आहे!''

''बापूसाहेब, आम्ही प्रयत्नांची शिकस्त करू. सोमाचे खुनी पाताळात दडून बसले तरी त्यांना शोधून काढू. आपण मुळीसुद्धा चिंता करू नये!''

''त्यासाठी शेकड्यानं नाही, हजारानं जरी खर्च झाला तरी करायची तयारी आहे माझी.'' बापूसाहेब हवालदाराकडं पाहत म्हणाले.

तासाभरात जाग्यावर दोन जीप्स आल्या. एकीतून फौजदार व इन्स्पेक्टर उतरले; दुसरीतून स्वत: डी.एस.पी. रामकृष्णन् उतरले.

बापूसाहेबांनी त्यांना नमस्कार करून थोडक्यात सर्व वृत्तांत सांगितला अन् शेवटी ते म्हणाले, ''साहेब, या खुनी लोकांचा तपास हा लागायलाच हवा. त्यासाठी कितीही खर्च करायला माझी तयारी आहे!''

''खर्चाचा प्रश्न नाही बापूसाहेब; पण काही ''क्ल्यू'' मिळायला हवा ना?''

''काहीही करा साहेब; पण या तरण्याताठ्या माणसाचे खुनी कायद्याच्या कचाट्यातून निसटता कामा नयेत!''

फौजदारांनी साहेबांचे समक्ष प्रेताचा ''इन्क्वेस्ट'' (प्रेताच्या स्थितीचा) पंचनामा केला. विहिरीच्या खड्ड्यात पडलेलं सोमाचं शिर वर आणून त्याचाही पंचनामा केला आणि ते दोन्ही

एकत्र घोंगड्यात बांधून उत्तरीय तपासणीसाठी तालुक्याच्या मेडिकल ऑफिसरकडे आले. बैलगाडीसोबत एक कॉन्स्टेबल गेला. तेव्हा रंगा लिंगाडे पुढं येऊन म्हणाला, "साहेब, प्रेत आम्हाला दहन करायला मिळणार नाही?"

"मिळेल; पण पोस्ट-मॉर्टेम झाल्यावर!"

"ते नाही केलं तर चालणार नाही का साहेब?" बापूसाहेबांनी अदबीनं साहेबांना विचारलं.

"असं कसं होईल बापूसाहेब? प्रत्येक खुनाच्या केसमध्ये प्रेताची उत्तरीय तपासणी ही झालीच पाहिजे. तसा कायद्याचा दंडक आहे. मृत्यू कशामुळं आला आहे हे डॉक्टरांच्या पोस्टमॉर्टेम नोटस्वरूनच ठरवायचं असतं!"

"पण इथं सरळ कुऱ्हाडीनं किंवा विळ्यानं त्याचं शिर धडवेगळं केलेलं दिसत असताना त्याच्या मृत्यूचं आणखी काय दुसरं कारण असू शकणार आहे?"

"तसं तुम्हाला वाटणं साहजिक आहे; पण कायद्याची चाकोरी सोडून जाता येणं शक्य नाही आम्हाला!"

"मग आमचं काही म्हणणं नाही!"

फौजदारांनी त्या सर्व जागेची कसून पाहणी केली. विहिरीच्या खड्ड्यात दगडांवर रक्त सांडलेलं होतं, असे काही दगडही जप्त करून, सील लावून ताब्यात घेतले. गोठ्यात ज्या दोन जाफराबादी म्हशींच्या गळ्याचे दावे चोरट्यांनी कापले होते, ते तुकडेही जप्त करून घेतले. कंदिलाचे तुकडे, कंदील आणि एक भालाही त्या जागी मिळाला. असा सविस्तर पंचनामा दोन-अडीच तास चालला होता.

त्यानंतर पिरा धनगराचा जबाब घेण्यात आला. पिरा म्हणाला, "काल रातचं दूध पोचती करून येताना सोमाचं जेवान घिऊन आलो. मी गावातच जेवलो. सोमा हितं मी भाकरी आनल्यावर जेवला. त्यो जेवल्यावर आमी दोगांनी पान खाल्लं. माज्यापसली तंबाकू संपली हुती, तवा सोमानं आपल्यापसली मला दिली. मग जरा वेळ बोलत बसलो आनि मग झोपलो. सोमा दाराच्या तोंडाला झोपला; मी तितं आतल्या अंगाला झोपलो.

मध्यान् रातीला सोमानं मला हलवून जागं केलं. मी घाबरून इचारलं. "काय रं?" माज्या तोंडावर हात ठिवून सोमा म्हणाला. "च्वॉर हैत. म्हस हांबरली. दिवा लाव आन् मी बलम घिऊन फुडं जातो. तू लगोलग ये मागनं-"

"बलम म्हणजे?" डी.एस.पी. नी विचारलं.

"बलम म्हणजे भाला सर!" फौजदार शिक्र्यांनी खुलासा केला.

"यस! आस्क हिम टू नॅरेट फर्दर-"

"हां, पुढं काय घडलं सांग पिरा-" फौजदार म्हणाले.

"मी दिवा लावला आनि दार उघडलं आनि सोमा बलम घिऊन "कोन हाय रं- तुमच्या आयला-रांडेच्यांनो" म्हणत गोठ्याकडं निगाला. तंवर का माज्या दिव्यावर धाड करून काठी बसली. दिवा फुटला आन् इजला. सोमा ज्यो म्होरं गेलता, तो आंदारात मला दिसंना. मातोर चोरटं सात-आठजन दिसलं गोठ्यासमोर. तसा मी मागारी परतलो आणि छपरात जाऊन दार लावून बसलो. भ्यानं मी दारच उघडलं नाही."

"चोरटे सात-आठ होते म्हणतोस, मग तुझ्या दिव्यावर काठी मारली ती कोणी?"

"ते वळीकलं न्हाई जी. माज्या मागनं हेरून काठी हानली आणि त्यो म्होरं सोमाकडं सटकला-"

"सोमावर वार केलेला पाह्यला नाहीस?"

"न्हाईजी. त्यो वरडला दिकून न्हाई!"

"मग तू काय केलंस?"

"मी छपरात जाऊन मोठमोठ्यानं बोंब मारायला लागलो, तसा सातव आपल्या वस्तीवरनं आला! त्येचा पोरगा शिवाबी आला. शिवाजवळ ब्याटरी हुती. ब्याटरी पाडली तर काय उजेडात सोमाचा मुडदा दिसला; पण त्येला मुंडकं न्हवतं. मग शिवानं हिकडं-तिकडं ब्याटरी फिरविली. मुंडकं दिसंना, हिरीच्या खड्ड्यात ब्याटरी पाडली तर काय शिवाचं मुंडकं दिसलं!

तसा मी गावात आलो. वैनीस्नी सांगिटलं. मालक घरला आलं नव्हतं. मग पेठंवर गेलो. ततनं ट्रकातनं कराडला गेलो. मालकास्नी सांगिटलं आनि लगोलग मालक आन् मी ट्याक्सीतनं गावाकडं आलो.

पिरानं सर्व हकीगत सुसंगतवार सांगितली. फौजदारांनी त्याचा जबाब कागदावर उतरून घेतला. त्यानंतर त्यांनी त्या रात्री पिराचं ओरडणं ऐकून बापूसाहेबांच्या वस्तीवर आपल्या मुलासह धावत आलेल्या हरीभाऊ सातवांचा जबाब घेतला. बॅटरी घेऊन येणारा त्यांचा मुलगा शिवा याच्याकडेही विचारपूस केली. त्या दोघांनीही पिराच्या म्हणण्याला दुजोरा दिला.तेव्हा मध्यरात्री गोठ्यातून म्हशी चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या चोरट्यांना अडवायला गेला असताना सोमा कांबळे याचा खून झाला या निर्णयाबद्दल शंका उरली नाही.

वरिष्ठ पोलीस अधिकारी फौजदार रामनाथ शिर्वेâ यांना काही महत्त्वाच्या सूचना देऊन निघून गेले. साऱ्या ढालगावावर विषण्णतेची दाट छाया पसरली. पोलिसांचा मुक्काम ढालगावच्या पंचायत ऑफिसात पडला. लोकांचं जेवण बापूसाहेबांच्या वाड्यातून जात होतं.

गुन्हेगारांची एक प्रथा असते. घरफोडी करणारा गुन्हेगार कधी जनावराची चोरी करणार नाही किंवा फसवा-फसवीचे गुन्हे करणारा कधी घरफोडी करण्याचं धाडस करणार नाही. तेव्हा ज्या कुणाला या आधी जनावरचोराच्या कामात शिक्षा झालेल्या आहेत अशा लोकांचे ठावठिकाणे पोलिसांना ठाऊक असतात. असे दहा-वीस, विशेषत: दलित समाजातील लोक आणून त्यांच्याकडं कसून चौकशी केली. काहीजणांना संशयावरून अटक करून चांगलं झोडपूनही काढलं; पण काही "ट्रेस" लागण्याचा संभव दिसेना.

दिवस उलटत होते. पोलिसांची सुरुवातीची धांदल, धावपळ आताशी थोडी थंडावली; पण बापूसाहेब वारंवार फौजदार शिर्क्यांना भेटून बजावीत होते, "काही झालं तरी या गुन्हाचा तपास हा लागयलाच हवा!" ढालगावातल्या भीमनगरातल्या रंगा लिंगाडे आणि कृष्णा कांबळे यांना वाटत होतं, बापूसाहेब सोमाच्या खुन्याला कधीही सैल सोडणार नाहीत.

यशोदाला वाटत होतं की, माझ्या उदरात वाढणाऱ्या मुलाच्या बापाचा खून करणारा एक ना एक दिवस सापडल्याशिवाय राहणार नाही. सारेजण त्या आशेवर जगत होते! पण पोलीस खातं मात्र हताश आणि निराश होत होतं. दिवसेंदिवस जंग जंग पछाडले; कर्नाटक, म्हैसूरपर्यंत पोलिसांना या गुन्ह्याची खबर देऊन जर का जनावरचोरीचे काही प्रकार उघडकीला आले तर या ढालगावच्या गुन्ह्याशी त्याचा काय संबंध पोहोचतो की काय हे पाहावे अशा सूचना देण्यात आल्या.

तीन महिने उलटले आणि फौजदार रामनाथ शिर्क्यांनी वरिष्ठाकडं रिपोर्ट धाडला, "सर्व प्रयत्नांची शिकस्त केली; पण सोमा कांबळे याचा खून कोणी केला याचा उलगडा होत नाही."

डी.एस.पी नी शिर्क्यांच्याकडून तो तपास काढून घेतला अन् इन्स्पेक्टर उमेश सेन या अत्यंत बुद्धिमान अशा तरुण सी.आय.डी. ऑफिसरकडे त्या गुन्ह्याच्या तपासाची जबाबदारी सोपवली.

इन्स्पेक्टर सेननी माहिती जमवायला सुरुवात केली. त्या प्रकरणात त्यांनी सुरुवात केली ती प्रत्यक्ष त्या जमिनीत सोमाचा खून झाला त्या जमिनीचे मालक, गावसरपंच बापूसाहेब चौगुले यांच्यापासून. बापूसाहेब हे कोण? ढालगावात कसे आले नि केव्हा?

बापूसाहेबांच्या विषयीची सर्व माहिती घेतल्यानंतर इन्स्पेक्टर सेन आपल्या दोन सहकाऱ्यांना घेऊन मुंबईला रवाना झाले. त्यांना सुदामचा त्या गुन्ह्याशी काही संबंध आहे की काय हे पडताळून पाहयचं होतं.

0-0-0

अकरा

सी.आय.डी. ऑफिसर उमेश सेन यांनी "सोमा मर्डर" केसचे कागदपत्र आपल्या हाती घेतले आणि त्यांनी त्या गुन्ह्याचा तपास लावण्याचा जणू निर्धारच केला.

प्रथम त्यांनी ढालगावात सुदाम कांबळे यांची माहिती घेतली. यशोदाशी आपला विवाह झाला नाही म्हणून तिचं लग्न ज्याच्याशी झालं, त्या सोमाच्या खुनाचा प्रकार त्यानंच घडवला नसेल कशावरून, याचा खुलासा त्यांना करून घ्यायचा होता.

त्यानंतर मुंबईला सुदामाच्या ब्लॉकवर इन्स्पेक्टर उमेश सेन गेले, तेव्हा सुदाम "अभिनय" नावाचं चित्रपटविषयक पुस्तक वाचत बसला होता. प्रथम त्यानं इन्स्पेक्टरसाहेबांना ओळखलं नाही.

दाराचं बोल्ट काढून त्यानं साहेबांना आपादमस्तक न्याहाळून विचारलं. "कोण हवंय तुम्हाला?"

"तुम्हीच! के. सुदाम ढालगावकर! मी सी.आय.डी. इन्स्पेक्टर उमेश सेन! मी इथं का आलो असेन याचा तुम्हाला अंदाज असेलच!"

"होय! सोमाच्या खुनासंबधी काही विचारपूस करायची असणार! एकदा शिर्के फौजदारही करून गेले. आपण परत आलात. काही हरकत नाही. या, काय घेणार? चहा, कॉफी, गोल्डस्पॉट, कोला?"

"थँक्स! मिस्टर सुदाम, त्या सोमाच्या खुनाचा तपास करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली आहे. आपलं सहकार्य हवंय मला!"

"साहेब, आपण केव्हाही माझ्याकडून त्या सहकार्याची अपेक्षा करू शकता. त्या शिर्वेâ फौजदारांनी सरळ सरळ मला अटक करून नेण्यापर्यंत तयारी केली होती. इकडं त्या रात्री मी "राजकमल" मध्ये सेटवर होतो. हा पुरावा होता म्हणून तरी बचावलो-" सुदाम स्टेट एक्सप्रेसची डबी इन्स्पेक्टरसाहेबांसमोर धरून म्हणाला.

इन्स्पेक्टरसाहेबांनी त्यातली एक सिगारेट घेतली. ती शिलगावून नाका-तोंडातून मनसोक्त धूर सोडून ते म्हणाले, "तुम्ही त्या दिवशी स्टुडिओत सेटवर होता यावरून तुम्ही प्रत्यक्ष खून करण्याच्या वेळी तिथं नव्हता, एवढाच अर्थ होऊ शकेल!"

"म्हणजे? आणखी ही काही तर्क त्यातून निघतात की काय?"

"अर्थात्! बरं, ते तूर्तास राहू दे. आपण मला प्रथम सांगा, यशोदावर आपण प्रेम करीत होता की नाही?"

"जरूर! माझं तिच्यावर प्रेम होतं. मला ती माझी बायको व्हावी असं वाटत होतं. पण मला नंतर कळलं की, मी तिला आवडत नाही. तसा मी तिचा नाद सोडला. तिचा बाप रंगा लिंगाडे हा स्वत:ला आमच्या जमातीत फार प्रतिष्ठित समजून घेतो. त्याचाही माझ्या मागणीला

नकार होता.''

''ते का?''

''मी त्या वेळी तमाशात काम करीत होतो!''

''पण तुमच्याजवळ भरपूर पैसा आणि प्रसिद्धी होती!''

''होय- होती. पण माझ्या पैशाच्या आणि प्रसिद्धीच्या बळावर मी यशोदावर माझा प्रभाव पडावा, असं काहीच केलेलं नव्हतं!''

''मग मिस्टर सुदाम, आपण ढालगाव आणि पेठ भागातला कुप्रसिद्ध डाकू रानबा याला कशासाठी हाताला धरलं होतं?''

''वा ऽऽ! साहेब, आपण खरोखरच सी.आय.डी. खात्याचे अधिकारी शोभता हं! बरीच सखोल माहिती आपण जमवलीत यात वाद नाही. अहो, प्रेमात पडलेला माणूस आपली प्रेमपूर्ती करण्यासाठी कधी कधी आणि त्याची तीव्रता किती आहे हे दर्शविण्यासाठी अशी नाटकं करतो. आपण कधी कुणाच्या प्रेमात पडला असाल तर हे सर्व सांगण्याचं कारणच नाही.''

किंचित स्मित करून सेन म्हणाले, ''मिस्टर सुदाम, इतकं होतं, तर यशोदाचं लग्न होतांना अगर ते झाल्यानंतर गप्प कसे काय बसलात?''

''साहेब, रोगी जिवंत आहे तोवर त्याचे नातेवाईक त्याला जगवण्याची खटपट करतात. एकदा का तो संपला की, घाई करतात. का कसली? तसंच झालं माझं. मी यशोदाचं सोमाशी लग्न होण्यापूर्वी काही केलं. तिच्या बापाला भीती घातली, सोमाच्या बापाला भीती घातली; पण कोणीच दाद दिली नाही. आणि एकदा तिचं लग्न झालं म्हटल्यावर मग काय शिल्लक राहिलं? नाद सोडून द्यावा लागला, झालं! लग्न झाल्यावर माझ्या काही दुष्ट कारवाया आपल्या निदर्शनाला आल्या आहेत का?''

''होय! मिस्टर कांबळे, सोमाचा पाय जेव्हा कुस्तीत मोडला तेव्हा तुम्ही रंगा लिंगाडेकडे गेला होतात. त्याला पैशाची काही गरज आहे का तुम्ही विचारलं होतं! खरं ना?''

''अगदी खरं! पण तुम्ही ही दुष्ट कारवाई समजता? अहो, ज्या यशोदावर मी एकेकाळी प्रेम केलं, तिच्या वैवाहिक आयुष्यात काही अडी-अडचणी निर्माण झाल्या अन् त्या मला दूर करता येण्यासारख्या असल्या तर मदतीचा हात पुढे करावा, असं मला नेहमीच वाटायचं. अजूनही वाटतंय!''

''सोमाचा खून झाल्याचं केव्हा कळलं?''

''मला सोमवारी पत्र आलं तेव्हा मी लगेच ढालगावला गेलो. फार फार वाईट वाटलं मला.''

''पण काय हो. आता यशोदा विधवा झाली, तरी पण अजून तरुण आहे. तेव्हा तिनं जर तुमच्या आधाराची अपेक्षा बाळगली तर तुम्ही विचार कराल का?''

''अशक्य! साहेब, आता यशोदा विधवा असली तरी एकटी नाही. सोमाचा अंश तिच्या उदरात वाढतो आहे. तिनं त्या मुलासाठी आता परत दुसरा घरोबा करू नये!''

''पण अजून तिनं आपली विशीदेखील ओलांडली नाही!''

''ते खरंय, पण मला वाटतं म्हणून म्हणतो!''

''राईट यू आर!'' सुदामच्या हातात हात देत इन्स्पेक्टर सेन म्हणाले, ''मला यापुढं या गुन्ह्याच्या तपासाच्या कामी तुमची मदत हवी आहे. तुमचा त्या गुन्ह्याशी काडीमात्र संबंध नाही, याची मला पुरेपूर खात्री पटलेली आहे!''

''कशावरून म्हणता?''

"आज वीस वर्षे मी सी.आय.डी. खात्यात काम करतो आहे. भले भले गुन्हेगार मी शोधून काढलेत. मी हा देखील शोधल्यायशिवाय राहणार नाही. तुमचे डोळे मला सांगताहेत, तुमचा गुन्ह्याशी संबंध नाही."

"पण शेतावर जनावरांची चोरी करायला आलेल्यांनी सोमाचा खून केला ना?"

"दॅट इज ऑल फॉल्स! सगळं खोटं आहे ते!"

"काय, म्हणता काय साहेब?"

"यस. सगळा बनाव आहे मिस्टर कांबळे!"

"पण कशावरून म्हणता हे?"

"हे पाहा, जनावरांची चोरी करायला आठजण कशाला येतील? जनावरं डोक्यावरून उचलून न्यायची नसतात! शिवाय "कॅटल लिफ्टर्स" जे असतात, ते सर्वसाधारण एक किंवा जास्तीत जास्त दोन! जनावरांचे दावे कापले की निघाले घेऊन. इथं तो पिरा म्हणतो, आठजण होते. हा विसंगत वाटणारा पहिला भाग. दुसरा असा की, वस्तीवर आपली चाहूल लागली म्हटल्यावर जनावर चोरी करणारे लोक जनावरं सोडून पळत सुटले असते. सोमानं त्यांना पकडण्याचा प्रयत्न करणं अशक्य आहे. पिराचं म्हणणं खरं मानलं तर एकटा किंवा दोघे आठजणांना कसे काय पकडणार?"

"बरोबर, अगदी बरोबर!"

"बरं, चोरट्यांची चाहूल लागल्यावर पिरा म्हणतो, "सोमा म्हणाला, तू दिवा लाव अन् एकदम दार उघड. मी भाला घेऊन एकदम हल्ला करतो!" एक पाय अधू झालेला सोमा असं म्हणाला असेल असं मला वाटत नाही. शिवाय दुसरी गोष्ट ही पाहा. चोरटे जास्त आहेत हे पाहिल्यावर त्या दोघांनी आरडाओरडा केला की नाही? शेजारचे सातव वगैरे वस्तीवाले सुरुवातीलाच नसते का धावून आले? हा पिरा आरडाओरड करतो; पण सांगतो केव्हा? सोमाचा मुडदा पडल्यावर!"

"मग यावरून काय वाटतं आपणाला? त्याचा सोमाच्या खुनाशी संबंध असावा असं वाटतं आपणाला?"

"असं वाटायला लागलंय खरं! पण मी आता एक नाटक करायचं म्हणतोय!" टेबलावरची आणखी एक सिगारेट शिलगावून इन्स्पेक्टर सेन म्हणाले.

"कसलं?"

"खऱ्या संशयित लोकांची दिशाभूल करायची. पण त्यासाठी मला तुमची साथ हवी!"

"साहेब, सोमाचा खुनी पकडण्यासाठी मी कोणतीही मदत करायला एका पायावर तयार आहे."

"मिस्टर कांबळे, मी तुम्हाला या आरोपाखाली अटक केल्याचे नाटक करणार! तुम्हाला गावाला घेऊन जाणार, तुमची पोलीस कस्टडीची रिमांड घेणार आणि हे सर्व करीत असतानाच मी मला ज्यांची या प्रकरणात शंका आहे, त्यांच्या हालचालीचं निरीक्षण करणार. बोला, आहात का तयार?"

"केव्हाही! अटक झाल्याचा अभिनय करायचा ना? तो तर आपला धंदा. पण एक गोष्ट, एवढा आठवडा मी शूटिंगच्या डेट्स दिल्या आहेत. तेवढ्या संपल्या की एक महिनाभर मी रिकामाच आहे."

"दॅट"स फाईन! पण लक्षात ठेवा हं, तुमची काही प्रमाणात बदनामीही होणार!"

"त्याची चिंता आपण करू नका. सत्य उजेडात आणण्यासाठी अशी खोटी बदनामी शिरावर घ्यायला तयार आहे मी!"

"के. सुदाम यास सोमाच्या खुनात संशयावरून अटक!" ही बातमी ढालगाव, पेठ, कऱ्हाड या भागात वाऱ्यासारखी पसरली. लोकांना आश्चर्य वाटलं. म्हैसचोरीच्या प्रकरणातून सोमाचा खून झालेला; मग सुदामला अटक का व्हावी?

पोलीस जीपमधून हातकड्या घातलेल्या सुदामला जेव्हा इन्स्पेक्टर सेन ढालगावात घेऊन आले, तेव्हा एकच हाहाकार उडाला. कोणी म्हणाले, "सुदामावर खोटा आळ आहे, आपण मोर्चा काढू-" कोणी इन्स्पेक्टर सेन यांच्याविरुद्ध वरिष्ठांकडं तारा ठोकल्या.

इन्स्पेक्टर सेन यांचा मुक्काम गावच्या पंचायतीत असला तरी जेवणाला-चहाला ते बापूसाहेबांच्या वाड्याकडे जात. तिथंच त्यांची सोय करण्यात आली होती.

दुपारी इन्स्पेक्टर सेन वाड्यात आले ते अचानक. त्यावेळी बापूसाहेबांचे अन् लक्ष्मीबाईचे कडाक्याचे भांडण चालले होते.

"मी म्हणतो, तू जायचं नाही !"

"मी जाणार! जाणारऽऽर!"

"एकदा गेलीस; परत नाक घासत घरात आलीस-"

"पुन्हा तशी येणार नाही. तुमची लायकी काय आहे ती समजली. मला अडवू नका. अडवाल तर निष्कारण पस्तवाल!"

आणि लक्ष्मीबाई निघल्या तेव्हा बापूसाहेब म्हणाले, "पिरा ऽऽ जा रे टांगा जुंप-"

पण या वेळी लक्ष्मीबाई म्हणाल्या, "आज माझ्यासोबत पिरा नको आहे मला!"

"मग एकटी जाणार आहेस काय?"

"रेठऱ्याच्या गाड्या आल्या आहेत आज बाजाराला. सांगावा पाठवलाय मी!"

"लक्ष्मी, तुझं लक्षण काही ठीक दिसत नाही!"

"कुणाचं लक्षण ठीक नाही हे ज्यानं-त्यानं विचार करून ठरवावं!"

यावर बापूसाहेब काही न बोलता सोप्यातून बाहेर आले तोच इन्स्पेक्टर सेन हसत-हसत त्यांच्यासमोर काही न ऐकल्यासारखा चेहरा करून उभे!

"अरेच्चा! आपण येऊन किती वेळ झाला?"

"आता हाच येतो आहे!"

"तुम्ही काय त्या सुदामला अटक केलीत म्हणे!"

"हां ऽऽ! त्याचा त्या गुन्ह्याशी संबंध असावा अशा आशयाची दोन निनावी पत्रं मिळालीत मला!" इन्स्पेक्टरसाहेबांनी चक्क ठोकून दिली.

"मला नाही वाटत, त्याचा या प्रकाराशी संबंध असेल!"

"बरं बापूसाहेब, पिराबद्दल आपलं मत काय?"

"तो माझा अत्यंत विश्वासू आणि प्रामाणिक नोकर आहे. का? त्याची शंका येतेय, काय?"

"तसं काही नाही; सहज विचारलं!"

"तुम्ही त्याचा थोडासुद्धा संशय बाळगू नका!"

"बरं! बरं!"

"मग त्या सुदामला का पकडलात?"

"ती निनावी पत्रं! एका पत्रात स्पष्ट म्हटलंय, "यशोदाशी लग्न झालं नाही म्हणून त्यानंच मारेकरी घातलेय्त!"

"खरंच! काही सांगता येत नाही. माणसाची बुद्धी केव्हा नि कशी फिरेल याचा नेम नाही बुवा!"

"अगदी बरोबर बोललात! ज्याचं आयुष्य संशयातीत आहे, अशासुद्धा माणसांना कधीकधी दुर्बुद्धी सुचते!"

"बरं पण साहेब, तुम्ही त्या सुदामचं काय करणार आहात आता पुढं?" बापूसाहेबांनी खुर्चीवर बसत विचारलं.

"रिमांडवर घेणार आहे!"

"म्हणजे ठोकणार आहे!"

"जरूर पडली तर थोडंस ते देखील करावं लागेल."

"पण त्याला इथं ढालगावात मात्र मारू नका हं!"

"का?"

"अगोदरच नवबौद्धांवर अन्याय-अत्याचार होतो, अशा रोज बातम्या येत आहेत. त्यात आणखीन एक भर!"

"बरं-बरं! बापूसाहेब, आम्हाला एक माहिती हवीय!"

"बोला की!"

"सोमाच्या लग्नात आपण पुढाकार घेताला होता. सुदाम त्रास देतोय असं कळल्यावर त्याचा बंदोबस्त केला. त्याला नोकरीला लावून मुंबईला पिटाळला. एवढा आपला सोमावर लोभ का होता?"

"पोरगं गरीब होतं हो ते! भोळसट होतं. मला त्याच्याविषयी प्रथमपासून आपुलकी वाटायची!"

"आता यशोदानं पुढं काय करावं असं वाटतं आपणाला?"

"अहो, हे लोक खालच्या जातीचे. ती पोर मुळातच नटरंगी आहे. कुणाचा तरी हात धरून जाईल, झालं!"

"पण तुमच्या नोकरीत असताना सोमा मारला गेला, तेव्हा तिच्या पोटापाण्याची, पोटगीची काही व्यवस्था आपण स्वीकारावी असं नाही वाटत आपणाला?"

"तुम्हाला तसं कोण म्हणालं काय?"

"छे! कोणीच नाही ! मी आपलं मला काय वाटतंय ते बोललो!"

"खरंच! आजवर मी तसा काही विचार केला नव्हता. आता मात्र मला त्या बाबतीत विचार करावा लागेल-"

इतक्यात कुणा रेठरेकराची गाडी दारात आली आणि लक्ष्मीबाई मुलाला कडेवर घेऊन एक हातात कापड्याची पिशवी घेऊन बापूसाहेब आणि इन्स्पेक्टर यांच्या समोरून दारातल्या गाडीकडं झपाट्यात निघून गेल्या.

बोलता-बोलता बापूसाहेब क्षणभर अडखळले; पण दुसऱ्याच क्षणी जणू काही झालंच नाही अशा आविर्भावात साहेबांना म्हणाले, "मी तिच्या पोटापाण्यासाठी समजा काही दिलं तरी ती कुणाशी तरी "पाट" लावून घेतल्याशिवाय राहणार नाही! शिवाय मी तिला दर महिन्याला पैसे देत राहिलो तर इथले लोक त्यातून विपरीत अर्थ काढतील की नाही सांगा."

"हो! हो! तेही खरंच आहे म्हणा!"

इन्स्पेक्टर सेन बापूसाहेबांसहित सर्वांच्या प्रतिक्रिया सूक्ष्म नजरेनं न्याहाळत होते.

पिरा धनगरावर त्यांचा विशेष "वॉच" होता. साध्या वेषातले तीन विश्वासू पोलीस त्याची हालचाल न्याहाळत होते. पण आज दुपारी लक्ष्मीबाई अचानक बापूसाहेबांशी भांडून का निघून गेल्या, हे गूढ इन्स्पेक्टर सेन यांना उकलेना. त्या बैलगाडीतून रेठऱ्याला पोहोचण्याआधी इन्स्पेक्टर सेनना रेठरं गाठायचं होतं.

जीप धावत होती. धावत्या जीपमध्ये दोन पोलीस इन्स्पेक्टर सेन यांचा ''मेकअप'' करीत होते. टोकदार मिशा, सोनेरी प्रâेमचा चष्मा, इनामदारी फॅशनचा बंद गळ्याचा कोट, पायात पांढरी अचकन, किनखापी मोजडी, हातात काठी आणि आतल्या खिशात वेळ पडलीच तर स्वसंरक्षणासाठी भरलेलं सहाबारी रिव्हॉल्व्हर!

रेठरे गावाच्या अलीकडे दोन फर्लांगावर जीप इन्स्पेक्टरसाहेबांना सोडून परत मागे फिरली.

रेठरेकर इनामदारांना खानदानी लोकांबद्दल अतोनात पुळका होता. एखादा दूरचा इनामदार किंवा जहागिरदार त्यांच्याकडे आला की आपले वैभव दाखविण्यासाठी त्याची अशी बडदास्त ठेवतील की पाव्हण्यानं आपल्या गावी जाऊन वर्ष झालं तरी इनामदारांच्या वाड्यातल्या मसालेदार जेवणाची लज्जत विसरू नये!

''सरकार आहेत का?'' वाड्याच्या दारातून हाक आली. समोरच आरामखुर्चीत रेठरेकर पेपर वाचत बसले होते. ते पेपर बाजूला करून खुर्चीतून उठले.

यापूर्वी कधीही न पाहिलेल्या या खानदानी गृहस्थांना प्रश्नार्थक मुद्रेनं न्याहाळत इनामदार म्हणाले, ''या ऽ ऽ या ऽ ऽ'' येणाऱ्या गृहस्थानी चक्क दरबारी पद्धतीचा मुजरा ठोकला. मुजऱ्याचा स्वीकार करतानाच इनामदारसाहेब भलतेच खूष झाले; कारण आताशी इनामदार लोकांना त्यांचे रयत किंवा घरातली गडीमाणसं यांच्याशिवाय कोणी असले मुजरे करीत नसत. तेव्हा असा अस्सल मुजरा ठोकणारा खास खानदानी रक्ताचा असणार अशी त्यांची भावना झाली. पाहुण्यांना हाताला धरून बाजूच्या शेजारच्या कोचावर बसवीत इनामदार म्हणाले, ''मी आपणाला ओळखलं नाही!''

''कसे ओळखणार? पहिल्यांदाच मी आपल्याकडं येतो आहे. माझं नाव उदाजीराव गायकवाड. बडोद्याहून आलोय-''

''वा ऽ वा...! आमच्या नानासाहेब गायकवाडपैकी?''

''हो! नानासाहेब माझ्या वडिलांचे चुलत चुलत भाऊ!''

''अस्सं? अरे, कोण आहे आत? चहा ठेवायला सांग.''

''मी कोल्हापूरला गेलो होतो. तिथं आपली माहिती लागली. म्हटलं, जाता जाता भेटून ओळख करून घ्यावी.

झालंय काय सरकार, अलीकडं आम्हा लोकांचं एकमेकाकडे जाणं-येणं खुंटलंय. त्यानं पंचाईत येते ती मुलां-मुलींच्या लग्नाच्या प्रसंगी!''

''अगदी खरं! आमच्याकडे जहागीरदार अगदी साफ बुडाले हो ! सगळे रीति-रिवाजसुद्धा विसरलेत!''

''आपल्याला मुलं किती?''

''मुलगा नाही मला. मुलीच दोन. एक ढालगावच्या सरपंचाना दिली; दुसरी महांकाळ-कवठ्याच्या चव्हाण घराण्यात!''

''ढालगावातील आपल्या जावयांचं आडनाव काय?''

''ते मूळचे देशमुख; पण चौगुलेही म्हणतात त्यांना. काही नाही हो. जमीनजुमला सगळा घालवलान् या लोकांनी; पण आमच्या जावयानी हॉटेलाचं काम करण्यापासूनचे सर्व कष्ट केले आणि आज काय नाव कमावलंय म्हणता! पाच-सहा लाखांची असामी आहे. गेली पाच-सहा वर्षं ढालगावचे सरपंच आहेत. मी फक्त घराणं बघून लेक दिली बरं का! काहीजणांनी नाकं मुरडली; पण मी दाद दिली नाही! अहो, मुलीला सुख मिळालं, खायला-प्यायला मिळालं, दागदागिने मिळाले की आणखी काय हवं, बोला? आणि जमीन नाही म्हणून

आठ एकर जमीनही घेतली आहे.

"हाय-वे कॅन्टीन" नावाचं हॉटेल आहे. नाव ऐकलं असेल आपण! रोज पाच-सातशे रुपयांच्या पुढं गल्ला जमतो हो! हां, आता आपल्यासारख्याच्या जावयानं हॉटेलचा धंदा करणं बरं नाही हे पटतंय; पण मला तुम्ही सांगा, मोठ्या घराण्यातले म्हणून भातावर थेंबभर तूप नसलं तरी मिशीला तूप लावून फिरणारे काय कमी आहेत आपल्यात?"

"अगदी बरोबर बोललात! जमाना बदलतो आहे. केवळ खानदान-खानदान म्हणून भिकाऱ्याच्या गळ्यात मुली देण्यात काही अर्थ नाही !"

"आता कसं बोललात? द्या टाळी. तुमचे-आमचे विचार अगदी एक आहेत."

इनामदारसाहेबांना अशी कोणी मंडळी आली की बापूसाहेबांच्या आर्थिक स्थितीचा बडेजाव आवर्जून सांगण्याचा उमाळा येई. कारण तसं पाहिलं तर चौगुले हे खास करून इनामदारांच्यात मोडत नव्हते; पण आता त्याच्या अफाट पैशाकडं पाहून एकदा जोडलेली सोयरिक मागं घेता येण्यासारखी नव्हती. तेव्हा आपण जे काही केलंय ते रास्तच, हे तुणतुणं वेळोवेळी ते आल्या-गेल्यासमोर वाजवत.

"बरं मग येतो मी!" चहा घेतल्यानंतर बडोद्याचे ते गायकवाड म्हणाले.

"हॅ...! असं कधी झालंय काय? आल्यासारखं चार दिवस राहायचं, आमची जमीन बघायची, इथून पुनाळ डोंगरात लेणी आहे बघण्यासारखी, ती बघायची अन् मग जायचं!"

"एवढं जमणार नाही हं सरकार! फार तर आजचा दिवस राहू!"

"आज तर राहिलंच पाहिजे. आज कोंबडा कापायला सांगितलाय. वडं-कोंबडं झक्क बेत होईल. मग उद्या जा म्हणं!"

"पण माझी एक अडचण आहे!"

"बोला, अगदी नि:संकोच बोला. आपणाला ती लागते काय?" "माझ्यासोबत आहे. फक्त आपली परवानगी!"

"त्यात कसली परवानगी? आम्हीही घेतोच की; पण केव्हा तरी चुकून!"

"मग हरकत नाही!"

इतक्यात दारात बैलगाडी वाजली. गाडीचा आवाज येताच इनामदारांनी माडीवरच्या खिडकीतून ओणवून पाहिलं आणि आश्चर्याने म्हणाले, "आँ...! आक्का? आलो हं मी!" असं म्हणून इनामदार जिन्यावरून धपधप पावलं वाजवीत खाली उतरले.

इन्स्पेक्टर सेन आपल्या मिशा व्यवस्थित चापचप बसवत खिडकीतून पाहत होते.

लक्ष्मीबाईंनी गाडीतून उतरल्या-उतरल्या गळा काढून रडायला प्रारंभ केला, "आबा, तुम्ही माझा गळा कापला हो...!"

"अगं, अगं, आक्का, गप! वर पाव्हणे आलेत बडोद्याचे. काय, झालं काय ते सांगशील का नाही?"

"काय सांगू आता आबा?" हुंदका आवरून आक्का आत आल्या नि इनामदारसाहेब त्यांना सरळ आतल्या खोलीत घेऊन गेले.

इन्स्पेक्टर सेननी माडीच्या दाराला आतून कडी लावली अन् ते खाली ज्या खोलीत लक्ष्मीबाई, इनामदार आणि इनामदारीणबाई जवळ-जवळ बसून हळुवार आवाजात बोलत होते, तिच्या वरच्या खोलीत सहाणं होतं, त्या सहाण्याला इन्स्पेक्टर सेननी कान लावले. खालचे बोलणे स्पष्ट ऐकू येत होते. "आबा, मी जिवंत राहावी असं वाटत असेल तर मला यापुढं इथून घालवू नका!"

"अगं, पण झालं तरी काय?"

"तुम्ही आमच्या शेतावरच्या गड्याचा खून झाला म्हणून ढालगावाला आला होता ना?"

"होय. रात्री जनावरांची चोरी करताना चोरांना अडवायला तो पुढं गेला नि चोरांनी त्याची मान तोडली!"

"तसं घडलेलं नाही आबा ते!"

"मग?" "तो खून यांनीच केलाय!"

"काय, सांगतेस काय? खून बापूसाहेबांनी केला?"

"होय. आमच्याकडं एक पाणक्या आला होता. तो म्हणाला, असं वारंवार उकरूनही जर विहिरीला पाणी लागत नसेल तर त्या जमिनीला नरबळी द्यावा! मारलेल्या माणसाचं रक्त उकरलेल्या विहिरीत सांडावं आणि असा माणूस बळी द्यावा की त्याच्या मृत्यूबद्दल त्याची बायको, आई, सगेसोयरे धाय धाय रडतील. जसं-जसं त्यांच्या डोळ्याला पाणी येईल तसा पाषाणाला पाझर फुटेल!"

"आक्का आक्का, अगं, मी हे काय ऐकतोय?"

"आबा, माझ्या मुलाची शप्पथ घेऊन सांगते. हे सर्व खरं आहे हो! आणि त्या मेल्यानं-पिऱ्यानं हे काम स्वत: पत्करलं आणि बिचाऱ्या सोमाला फसवून त्याचा घात केला."

"अरे राम रे! आक्का, अगं, हे तू मला आधी तरी सांगायचं नाहीस?"

"पण मलाच हे आज दुपारी कळलं!"

"ते कसं?"

"तो पाणक्या यांच्याकडं आला होता दुपारी आणि विचारत होता, "विहिरीला पाणी लागलं की नाही?" या दोघांचं बोलणं चाललं होतं, ते ऐकलं आणि त्यांच्याशी भांडण करून निघाले. रक्तानं बरबटलेल्या हाताच्या माणसाशी आता मला संसार करायची इच्छा नाही. बाहेरख्यालीपणा खपवून घेतला, त्या मुमताजसारख्या आणखी चार बाया ठेवल्या असत्या तरी खपवून घेतलं असतं; पण मला आता त्या माणसाजवळ राहणं अशक्य आहे. अशा दांभिक, लोभी, क्रूर, खुनी ऽ ऽ ऽ ऽ."

इतकं बोलून लक्ष्मी पुन्हा धाय रडू लागली. इनामदार कपाळाला हात लावून बसले होते. त्यांची पत्नीही तोंडाला रुमाल लावून रडू लागली. रडता-रडता लक्ष्मी थांबली आणि म्हणाली, "सोमाची बायको चार महिन्यांची गरोदर आहे, बाप कृष्णा थकलाय, आई भागी जीर्ण झालीय; त्यांचं दु:ख मला पाहवत नाही हो. आता तुम्हीच सांगा आबा, मी कसा जन्म काढू?"

लक्ष्मीचं सांत्वन करून इनामदार जेव्हा माडीवर आले, तेव्हा बडोदेकर पाव्हणे तिथं नव्हते. ते केव्हाच निघून गेले होते.

त्याच रात्री पिरा धनगर आणि बापूसाहेब यांना इन्स्पेक्टर सेन यांनी अटक केली. सुदामची सुटका झाली.

समाजात लक्षाधीश आणि सत्ताधीश म्हणून वावरणाऱ्या बापूसाहेबांच्या हाताभोवती बेड्या पडल्या, तेव्हा त्यांना हे काय होतंय तेच कळेना. महाराष्ट्रातल्या वृत्तपत्रांनी इन्स्पेक्टर सेन यांच्या चिकाटीचे आणि हुषारीचे एकमुखाने कौतुक केले. शेड्यूल कास्टच्या लोकांनी निषेध सभा भरवून बापूसाहेबांचा जाहीर धिक्कार केला. विसाव्या शतकात जिथं मानव परग्रहावर कोणतं जीवन आहे याचा शोध घेण्याच्या प्रयत्नात असतात, तिथं इकडं भारतात विहिरीला पाणी लागत नाही म्हणून कोवळ्या तरुण जवान माणसाचा बळी देणाऱ्या नराधम बापूसाहेबाला कशाची उपमा द्यावी हेदेखील कुणाला कळेना.पिरा धनगराने कबुलीजबाब दिला.

लक्ष्मीबाईंनी कोर्टात येऊन आपण समक्ष त्या पाणक्याची झालेली चर्चा ऐकल्याचं सांगितलं. जनावरचोर आल्याचं नाटक बापूसाहेबांच्या सुपीक मेंदूतून निघालं होतं. स्थानिक पोलीस, फौजदार शिर्वेâ या त्यांच्या बतावणीला भुलले होते. पण शेवटी सोमाच्या खुनाला वाचा फुटायची होती, ती आशा तऱ्हेने!

ढालगावात मी जिवंत असेपर्यंत गावचा सरपंच राहणार, अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारे बापूसाहेब आज कोर्टासमोर नरबळी दिल्याचा आरोपाचा जाब देण्यासाठी उभे होते. आख्ख्या महाराष्ट्राचं या खटल्याकडं लक्ष लागून राहिलं होतं.

ज्या सरकारनं वेळोवेळी बापूसाहेबांचा सत्कार केला होता, त्यांच्या सार्वजनिक कार्याचा गौरव केला होता, तेच सरकार आज त्यांच्या विरुद्धचा खटला शाबित व्हावा म्हणून सर्व तयारीनिशी सिद्ध झालेलं होतं.

स्पेशल गव्हर्नमेंट प्रॉसिक्युटरांची नेमणूक करण्यात आली. आरोपी बापूसाहेब आणि त्यांचा साथीदार पिरा धनगर यांच्या वतीनं मुंबईच्या हायकोर्टातले प्रसिद्ध कायदेपंडित आणण्यात आले होते.खटल्याचं काम सतत आठ दिवस चालले. पिरा धनगरानं आपला कबुलीजबाब जबरदस्तीनं घेतल्याची तक्रार करून तो नाकारला. लक्ष्मीबाईची साक्ष झाली ती अत्यंत महत्त्वाची. एका खानदानी घराण्यातली स्त्री नवऱ्याच्या विरुद्ध साक्ष द्यायला कोर्टात उभी राहिली. आरोपीच्या वकिलांनी मुमताज प्रकरणापासून ती आपल्या पतीशी सूडभावनेनं वागते आहे असं सुचवलं. परिस्थितीजन्य पुरावा खूपच होता; पण शेवटी मानवनिर्मित न्यायव्यवस्था ही अपूर्ण आणि दुबळीच!

बापूसाहेबांनी आपल्या विहिरीला पाणी लागावं या हेतूनं सोमाचा खून केला ही गोष्ट 'विद्वान' न्यायाधीशांना पटली नाही.

बापूसाहेब आणि पिरा धनगर दोघेही निर्दोष सुटले.

पण ते सुटले म्हणून त्यांचं अभिनंदन करायला ढालगावातलं काळं कुत्रंदेखील सामोरं आलं नाही.

बापूसाहेबांनी आता मुमताजला ढालगावाला आपल्या वाड्यात आणून ठेवलेली आहे. तिचा वृद्ध बाप खटला चालू असतानाच पैगंबरवासी झाला आहे. डोळ्यांची भिंताडं झालेली अमिनाबी मात्र बापूसाहेबांच्या वाड्यात कोण येतंय का याची चाहूल घेत बसलेली असते. पण दिवस नव्हे, आठवडेच्या आठवडे तिकडं कोणी फिरकत नाही. सुदाम आता नट म्हणून नावारूपाला आला आहे. लग्न झालंय त्याचं. कधी कधी तो गावी येतो.

यशोदाचा मुलगा आता अडीच-तीन वर्षांचा झाला आहे. त्याला सुदाम दरवेळी कपडे आणतो. सुदामची बायको यशोदाला साड्या घेऊन देते. पण ते कपडे, त्या साड्या स्वीकारताना यशोदा धाय धाय रडते. रंगा आता खूपच थकलाय. कृष्णा जिवंत आहे; पण कृश झालेल्या अस्थिपंजरातून प्राण केव्हा निघून जाईल याचा भरवसा नाही.

पेठेच्या नाक्यावर अजूनही ''हाय वे कॅंटीन'' ही पाटी दिसते; पण आता तिथे कोणीही येत नाही. ओळखीची माणसं बापूसाहेब दिसले की पाठ फिरवतात. पिरा धनगराच्या बोटांना काय झालंय कुणास ठाऊक; तो सारखा हात लपवून ठेवीत असतो.

बापूसाहेबांच्या जमिनीतला तो विहिराचा खड्डा, सोमाचं रक्त प्राशन करूनही कोरडाच राहिला आहे. मधून-मधून बापूसाहेब जाऊन डोकावून पाहतात; पण पाण्याचा थेंबदेखील दिसत नाही. खाली दिसतो कोरडा ठणठणीत पाषाण!

0-0-0-0